
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६०५
१९६५



# चोंच असलेली माणसं

REFBK-0014395

-अंबादास देवळे

सुरस ग्रंथमाला, सोलापूर

प्र का श क :

न. गौ. व्होरा,
सुरस ग्रंथमाला,
सोलापूर.

• प्रथमावृत्ति, सप्टेंबर, १९५९

• मूल्य तीन रुपये

• सर्व हक्क प्रकाशकाधीन

मु द्र क :

ना. ह. कोल्हटकर,
महाराष्ट्र-मित्र मुद्रणालय,
७७, शुक्रवार, सातारा.

# दोन शब्द ...

**गेल्या** दीड तपात लिहिलेल्या अन् प्रकाशित झालेल्या माझ्या ललितनिबंधांचा हा पहिला संग्रह ! त्या संबंधानं लिहिण्याचं मी कटाक्षानं टाळीत आहे. परंतु एक गोष्ट मात्र सांगावीशी वाटते; ती ही की मानवी-वृक्षाच्या मुळाला कुठे तरी कीड लागली असल्याची शंका पदोपदी येतेय. जो वृक्ष प्रेम, समाधान देणारा कल्पवृक्ष म्हणून नियतीनं दिला, त्याला निवडुंगाचं मोल यायचं कारण ही 'चोंच!' याखेरीज दुसरं तिसरं कोणतंहि कारण गवसत नाही.

'चोंच असलेली माणसे' वाचताना वाचकाला अशी माणसं आपण कुठे तरी पाहिली आहेत, याची जाणीव होईल असं वाटतं.

आयुष्यात चालून आलेल्या झंझावाताला पुरून उरण्यासाठी ज्यांनी मला प्रकाशाची, धीराची वाट दाखविली, अशा साहित्यरसिक श्रीमंत श्री. मारोतराव ऊर्फ आण्णासाहेब धनवटे यांना ही ललितकृति सादर अर्पण करताना हार्दिक आनंद होत आहे.

नागपूर आकाशवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित झालेला 'पांगुळगाडा' संग्रहात समाविष्ट करण्यास संमति दिली, याबद्दल केंद्राधिकाऱ्यांचे हार्दिक आभार !

सुरस ग्रंथमाला प्रकाशनचे सूत्रधार श्री. हिरालालजी व्होरा ह्यांच्या अकृत्रिम, अनन्यसाधारण प्रेमामुळे, जिव्हाळ्यामुळे अन् आग्रहामुळेच हा निबंधसंग्रह प्रकाशित होत आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वापरावा लागणारा 'आभार' शब्द किती अपूर्ण आहे, याची मला जाणीव आहे–त्यांनाहि आहे. त्या भानगडीत न पडणं हेच ठीक.

ना ग पू र,
१९-८-६५

— अंबादास देवळे

## • अंबादास देवळे यांची प्रकाशित पुस्तके •

१. एरिक
२. घुंगरु
३. देवाचे नोकर
४. राणी दुर्गावती
५. हॉकी सम्राट् ध्यानचंद
६. चोंच असलेली माणसे
७. विस्तवाच्या भिंती

आ गा मी

१. धनी
२. माणूस नावाची विषवेल
३. ओंजळीतले नाणे
४. शिपाई झाला राजा
५. गुलाब कळी
६. सात डोमकावळे
७. आईची समाधि

८०७३६ वि. निबंध
९६०५ ... नों. दि. २८।१५६१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# चोंच असलेली माणसें ▲▲▲ : १ :

मी माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात किती तरी प्रदर्शनं पाहिली आहेत. चित्ररेखाटनाच्या अन् रंगविण्याच्या अगदी जुन्या तंत्रापासून तर पाश्चात्य चित्रकारांच्या अद्यावत् रंगसंगतीची अगणित चित्रं माझ्या नजरेखालून गेली आहेत. प्रमाणबद्ध अवयव असलेल्या स्त्री पुरुषांची, सायंकाळी मावळतीच्या क्षितिजावर पसरलेल्या रंगीबेरंगी ढगातून वाट काढीत अस्ताला जाणाऱ्या सूर्याची, कश्मीरातल्या नितांत रमणीय दलसरोवराची अन् आकाशाला हात लावण्याचा अट्टाहास धरणाऱ्या उत्तुंग हिमशिखरांची चित्रं जशी माझ्या स्मृतिपटलावरून नाहीशी झालेली नाहीत, त्याचप्रमाणे बेहोष झालेल्या सागरलाटांची, वृक्षवेलींवर किलबिल करणाऱ्या डौलदार पक्षांची अन् विविध फुलांनी खच्चून भरलेल्या बागेत निर्भय मनानं खेळणाऱ्या गोंडस बालकांची चित्रंहि विस्मरणाच्या मालिकेत समाविष्ट झालेली नाहीत.

तैलचित्रांचे, जलरंगांचे, नखचित्रांचे आणि रेखाचित्रांचे असंख्य नमुने मी पाहिले आहेत. परंतु कालच्या प्रदर्शनात पहिलं बक्षीस मिळालेलं ते चित्र पाहून मी अगदी थक्क झालो.

वास्तविक ते चित्र काही यौवनानं मुसमुसलेल्या तरुणीचं नव्हतं; बेफाम झालेल्या प्रपाताचं नव्हतं; न ते बालकाचं होतं, ना निसर्गोन्मादाचं ! तसं पाहिलं तर त्या चित्रातलं रंगकौशल्य काही वैशिष्ट्यपूर्ण नव्हतं. पण चित्राची जी मध्यवर्ती कल्पना होती ती अभिनव होती.

म्हणजे अशी — जमिनीवर पडलेल्या एका असहाय्य माणसाला पाचसात मारेकरी मारताहेत घायाळ करताहेत. कोणी त्याच्या डोक्यावर, कोणी पाठीवर, तर काही पोटावर प्रहार करीत आहेत. पण कशानं ? काठी, चाकू, भाला किंवा तलवारीच्या साहाय्यानं म्हणता का ? छे छे ! अशी कोणतीच बोथट किंवा तीक्ष्ण हत्यारं त्या मारेकऱ्यांच्या हातात नव्हती. त्यांऐवजी चित्रकारानं मारेकऱ्यांना लांब चोंची दाखविल्या होत्या नि त्या चोंचींनी ते जमिनीवर पडलेल्या माणसाला जायबंदी करीत होते.

मला कळेना की चित्रकारानं या मारेकऱ्यांना चोंची का दाखवल्या आणि परीक्षकांनीहि त्याच चित्राला प्रथम पारितोषिक का दिलं ? यापूर्वी पाहिलेल्या प्रदर्शनात असल्या मुलुखावेगळ्या कल्पनेचं चित्रं पाहिलं नसल्यामुळे मी ते प्रदर्शन अर्धंच पाहून घरी यायला निघालो. वाटेत उलटसुलट दिशांनी जाणाऱ्या स्त्रियांच्या अलंकारांकडे, शरीरसौंदर्याकडे किंवा पुरुषांच्या विविध पोशाखांकडे माझं लक्ष जात नव्हतं. उलट प्रत्येक स्त्रीपुरुषाला चोंच आहे की काय याचं मी निरीक्षण करीत होतो. या निरीक्षणातून माझी बालंबाल खात्री होऊ लागली की मारेकऱ्यांना चोंची दाखविणारा हा चित्रकार अन् त्याच्या चित्राला प्रथम पारितोषिक देणारे परीक्षक मूर्खच असले पाहिजेत.

या विचारात मग्न असतानाच माझा एक मित्र अचानक माझ्या पुढ्यात येऊन उभा राहिला अन् गजबजलेल्या रस्त्यावर (माझ्या किंवा) त्याच्या प्रतिष्ठेची तमा न बाळगता माझे दोन्ही खांदे गदगदा हलवून म्हणाला, " अगदी तुम्हालाच शोधीत होतो मी. पोटभर मिठाई खावी लागणार आहे आता तुम्हाला माझ्याकडून."

त्या मित्राच्या पाणीदार डोळ्यातून ओसंडणारा आनंद माझ्या नजरेतून सुटला नाही. अटीतटीच्या युद्धात मिळालेल्या अलौकिक विजयाचा आनंद सेनापतीच्या हृदयात सामावला जाऊ नये, तसं त्याचं झालं होतं. मी त्याला हसून विचारलं, " अरे पण मिठाई कशाबद्दल ? "

" तुम्हीच ओळखा..." तो उद्गारला.

क्षणभर विचार करून मी प्रश्न केला,

"तिसऱ्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी नवी देणगी कोणाकडून उपटलीस की काय ?"

आनंदानं नकारार्थी मस्तक हलवीत तो म्हणाला, "तसं नाही. पण तुम्हाला आठवत असेल की गेल्या जानेवारीत माझं दुसरं पुस्तक प्रकाशित झालं. त्याच पुस्तकाला इंदूरच्या ग्रंथोत्तेजक मंडळाकडून पारितोषिक मिळालं."

"होय ? मग आताच्या आत्ता मिठाई हवी बुवा आपल्याला." मी त्याचं अभिनंदन करीत म्हटलं अन् जवळच्याच मिठाईच्या दुकानात शिरून गोड पदार्थांचा समाचार घेऊ लागलो. हा अल्पोपहार चालू असता तो म्हणाला, "पारितोषिक मिळालं म्हणून मी ही मिठाई देतोय, असा समज करून घेऊ नका हं ! या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मला भली मोठी देणगी मिळाली. त्यामुळे माझ्या सहकाऱ्यांनी अन् अधिकाऱ्यांनी चोंचीनी टोचून घायाळ केलं होतं मला. आता ते विसरले आहेत ; पण पारितोषिकाची ही बातमी ऐकून पुन्हा ते चंचूप्रहार केल्याखेरीज राहणार नाहीत. परंतु ते सहन करण्याची शक्ति दुप्पट झाली म्हणून ही मिठाई देतोय् बरं का !"

मिठाईचा समाचार घेतल्यावर त्या विजयी मित्राला पुन्हा एकदा धन्यवाद दिले अन् मी घराची वाट चालू लागलो खरा. पण काही वेळापूर्वी आपण ज्यांची मूर्खात गणना केली ती आपली चूक झाली, हे लक्षांत आलं. काही वेळा असं होतं खरं माणसाचं. ज्या प्रश्नांची उत्तरं तो अट्टाहासानं शोधायला लागतो ती डोकं खाजवूनहि मिळत नाहीत. मग असंच काही घडतं की त्याला चट्कन् उत्तरं सापडतात.

अर्ध्या तासापूर्वी पाहिलेल्या प्रदर्शनातल्या त्या चित्रामुळे जी अस्वस्थता माझ्या मनात घर करून बसली होती, अन् चित्रकार व परीक्षक यांना मूर्ख म्हणायला लावलं होतं, ती घोडचूक झाली असं त्या विजयी मित्राच्या उद्गारातून मला समजून आलं.

साहित्याच्या क्षितिजावर तो अल्पकाळातच चमकू लागला होता. गेल्या दहा-बारा वर्षांच्या कालावधीत त्यानं केलेलं ललितलेखन ख्यातनाम

नियतकालिकातून अन् दीपावली अंकातून प्रसिद्ध झालं होतं. नभोवाणी-वरूनहि त्याच्या कथा ध्वनिक्षेपित झाल्या होत्या, तर काही ललितकृतींना पारितोषिकंहि मिळाली होती. भारताच्या राजधानीत झालेल्या साहित्य संमेलनात त्याची पहिली कादंबरी प्रकाशित झाली होती. अन् 'फडक्यांच्या भाषेसारखी सरल, डौलदार नि ओघवती भाषा' म्हणून वृत्तपत्रात तिच्याविषयी प्रशंसा झाली होती. पहिल्या पुस्तकाची शाई पुरती वाळते न वाळते तोच तो ज्या फर्ममध्ये नोकरी करीत होता, तिथल्या बड्या साहेबानं देणगी देऊन त्याचा कथासंग्रह प्रकाशित करण्यास बहुमोल मदत केली होती.

वास्तविक ही अनपेक्षित मदत मिळालेली पाहून त्याच्या सहकाऱ्यांनी अन् वरिष्ठांनी माझ्या मित्राची पाठ थोपटायला हवी होती. खुल्या दिलानं त्याच्या लेखनकृतीचं परीक्षण करायला हवं होतं.

परंतु जन्माला येतांना निर्मळ मन घेऊन येणारी माणसं जगात वावरताना इतक्या कोत्या मनाची, संकुचित वृत्तीची आणि हेवा करणारी का होतात, याचं निदान वैद्यकशास्त्रातून शोधायला मिळेल की नाही कोण जाणे.

आपल्यात जे गुण नाहीत अथवा ज्या कला आपणास अवगत नाहीत त्या दुसऱ्याला येताहेत, अन् कलागुणांच्या साहाय्यानं तो पुढे येतोय, हे पाहून प्रत्येकाच्या सहजसुंदर मनानं समाधान मानावं, त्याचं यश तें आपलं यश समजावं अशी विश्वनिर्मात्याची मूळ कल्पना असावी, हाच उदात्त हेतु असावा मानवनिर्मितीमागं.

परंतु जग दिसतं तसं नसतं हेंच खरं.

समानतेच्या आणि माणुसकीच्या नकली बुरख्याखाली माणसं वावरत असतात. मात्र असूया, द्वेष, पिळवणूक या एक ना अनेक विषवल्ली त्यांच्या अंतःकरणात अशा काही भरारा वाढत असतात की त्यांच्या हाल-चाली पाहून सज्जनानं शरमेनं मान खाली घालावी. ही माणसं तोंडाचा उपयोग राजरोसपणे करतील. पण आपल्या [अदृश्य] चोंचीनं ते प्रहार करायला कमी करणार नाहीत. बिचारं सावज मात्र पुरेपूर घायाळ होतं.

पक्षी तरी काय अस्संच करतात.

त्यांच्यातला बांधव काही काळ माणसात जाऊन राहिला अन् थोड्या दिवसांनी परतला की बाकीचे पक्षी चंचूप्रहार करून त्याला मरणोन्मुख करतात.

अर्थात् पक्षी तो पक्षीच.

परंतु आपल्या बुद्धीची अन् विद्वत्तेची घमेंड वारंवार मारणारा माणूस बऱ्याच वेळा सवाई पक्षी झाल्याचं आढळून येतं. कुठे तरी माणुसकीचा अंश शिल्लक असतो म्हणून तो दातांनी दुसऱ्याचे लचके तोडत नाही इतकंच. पण जे करता आलं नाही ते द्वेषानं अथवा सूडानं प्रेरित होऊन [नसलेल्या] चोंचीच्या साहाय्यानं जायबंदी करायला तो कमी करीत नाही.

घराचं दार उघडून मी आंत प्रवेश केला. तशी "आव जो" म्हणत पत्नी सामोरी आली अन् म्हणाली, "हे काय, इतक्या लवकर आलात प्रदर्शन पाहून? आवडलं नाही वाटतं?"

मी घाईघाईनं म्हटलं, "आधी तू पातळ बदलून तयार हो पाहू! प्रदर्शनातलं एक सुंदर चित्र दाखवणार आहे मी तुला. त्या चित्राचं नाव आहे— "चोंच असलेली माणसं"

* *

बालपणाचा तो एक माझा हव्यास होता, असं म्हटलं तरी हरकत नाही. आमच्या गावालगत एक विस्तीर्ण बाग होती. बाग आणि तिचं सौंदर्य, असं निसर्गप्रेमी लोक काही तरी बोलतात ना, ते मला त्यावेळी मुळीच कळत नव्हतं. परंतु बुचाच्या उंच झाडांची पसरलेली गर्द छाया, बागेच्या मध्यभागी एक दगडी मनोरा, त्यावर असलेल्या घड्याळात अर्ध्या तासाच्या अंतरानं पडणारे कर्णमधुर पण गंभीर ठोके, त्याच्या पुढ्यात असलेल्या कारंजातून थुईथुई उडणारा पाण्याचा फवारा – हे सारं माझ्या बालमनाला आकर्षून घेत होतं. त्या बागेत खेळायला जाण्यासाठी माझं मन नेहमीच धाव घेत असे. परंतु त्यापेक्षाहि सकाळच्या सहाच्या सुमाराला बागेत जायला मन कोण उतावीळ होत असे म्हणता ! ते तसं होई याला कारण घड्याळाचे ठोके किंवा हिरव्यागार वृक्षांची छाया ही नसून मनोऱ्यालगतच्या उजव्या बाजूला प्राजक्ताचा जो सडा पडत असे, त्याकडे माझं मन धाव घेई.

श्रावण-भाद्रपदात तर नेहमी असंच व्हायचं. रात्री झोपताना मी मनाला पुनःपुन्हा बजावीत असे की सकाळी प्राजक्ताची फुलं वेचायला जायचं. खूप खूप. अगदी रुमाल भरून ! नि गंमत अशी की सकाळी सहाला बरोबर जाग यायची. आई उठलेलीच असायची. अंगणात सडा घालीत असलेली, नाहीतर चूल पेटवीत असलेली दिसायची. पण तिच्याकडे न पाहता आणि चहासाठी न थांबता मी रात्री आठवणीनं टेबलावर काढून ठेवलेला रुमाल खिशात कोंबून बागेच्या दिशेनं धूम पळत सुटे.

परंतु पळताना माझ्या किती तरी कल्पना अधिक गतीनं धावत असायच्या. आज सारी प्राजक्ताची फुलं वेचायची. त्यांच्या सुंदर

माळा तयार करायच्या. पाठीमागे राहणाऱ्या राधाकाकू, माडीवरल्या मंगलावहिनी, कोपऱ्यातल्या घरात राहणाऱ्या आजी ह्यांना थोडी फुलं देऊन शाबासकी मिळवायची.

पुण्य शब्दाचा अर्थ त्यावेळी मला कळत नव्हता. परंतु देवाला वाहिलेल्या फुलांमुळे तो आपल्याला परीक्षेत पास करतो, ह्याच कल्पनेनं मी भारावून जात असे. बागेचं फाटक येईपर्यंत या कल्पनांच्या माळा गुंफणं चालू असायचं. पण सहाच्या ठोक्याला बागेचं फाटक उघडण्याचा नियम असूनहि ते न उघडणारा बागवान झोपडीसमोरच्या खाटेवर खुशाल डाराडूर झोपलेला पाहून मला चीड येई. मनोमनी मी एक दोन शिव्या-सुद्धा देत असे. पण हे घडत असतानाच दुसऱ्याहि कल्पना उमलू लागत.

ह्या झोपाळू माळ्याऐवजी जर आपल्याला बागेचं रखवालदार केलं तर आपण सहाऐवजी चारला उठून प्राजक्त गोळा करीत जाऊ. छे...यापेक्षा प्राजक्ताखालीच खाट टाकून झोपलो तर एकेक गळणारं फूल आपल्या पांघरुणावर पडेल अन् मग प्राजक्ताचं पांघरुण घेतल्याचा आनंद लुटता येईल.

थंड वाऱ्याच्या झुळुकीबरोबर त्या फुलांचा गंध अंगावरून गेला की मनाला अनमोल आनंद होत असे. पण बंद केलेलं फाटक डोळ्याला दिसलं म्हणजे मन अधिकच खट्टू होई. माळ्याला जागवून आणि त्याच्या दोन चार शिव्या खात अर्धवट उघडलेल्या फाटकातून कसाबसा प्रवेश करीत धावतच मी प्राजक्ताजवळ जाई. छोट्या छोट्या पाकळ्या आणि इवल्या इवल्या लालचुटुक दांड्या असलेल्या अगणित फुलांचा सडा पाहून मी बेभान होऊन जाई. भराभरा ती फुलं मी गोळा करीत असे. रुमालात त्यांचा ढीग जमल्यावरहि माझ्यातला हावरेपणा अधिकच जागृत होई. पण रुमालाची मर्यादा संपताच उरलेल्या फुलांकडे पुनः पुन्हा मागे वळून पाहत मी घरी परत येत असे.

प्राजक्ताच्या माळा गुंफताना तर मी अक्षरशः वेडावून जाई. परंतु चार-सहा तासांच्या घटकेनंतर ती फुलं कोमेजून जाऊ लागली की मला कसंसंच होऊ लागे. त्यांचा गंध आणि सौंदर्य माझ्या दृष्टीसमोर नष्ट होई. असं का व्हावं ह्याचा खूप विचार करूनहि मला उत्तर सापडत नसे,

उपाय गवसत नसे. इतक्या सुंदर, नाजुक नि सुगंधी फुलांनी केवळ चार-सहा तासांनी सुकून जावं, याचं वैषम्य मनाभोवती पिंगा घालत राही.

आता इतकी वर्षं उलटून गेलीत, पण लालचुटुक दांडी असलेल्या नाजुक, पांढऱ्या शुभ्र पाकळ्या असलेल्या व मंद गंध पसरविणाऱ्या प्राजक्ताच्या माळांना दीर्घकाल टिकविण्याची किमया मात्र एकालाहि अजून शोधून काढता आलेली नाही. उलट निरनिराळ्या कल्पनांच्या माळाच आपण आजपर्यंत गुंफीत आलो आहोत.

ते साध्य झालं नाही हे एका दृष्टीनं फार बरं झालं. अपुऱ्या कल्पना, अर्धवट योजना ह्या खरोखरच प्राजक्तासारख्या असतात. सकाळच्या थंड वेळी प्राजक्तांचा सडा त्या वृक्षाखाली पडतो आणि वायुलहरीबरोबर त्यांचा मंद सुगंध सुखवितो ना – तशा !

कल्पना ही प्राजक्ताची धाकटी बहीणच.

कल्पनांची साकारता होण्यात एक विशिष्ट सुख असतं किंवा अभिमान अथवा यश असतं हेच खरं. परंतु त्यांच्या साकारतेपेक्षा त्यांना जो फुलोरा येतो, त्या आनंदाची धुंदी निश्चित अवीट व अवर्णनीय आहे भविष्यातील निष्फलतेचं आवरण त्यांवर असेलहि कदाचित्; परंतु त्याची खंत बाळगता कामा नये. कारण कल्पनांच्या मनोऱ्याची बांधणीच इतकी झटपट चालू असते की काही वेळानंतर माणसाला कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं.

आणि हा आनंद काय कमी किंमतीचा असतो म्हणता ?

मनुष्य आयुष्यात सारं काही विकत घेऊ शकतो; परंतु कुठल्याहि दुकानात आनंद विकत मिळत नाही. विकत मिळायला तो का कलाकंद आहे?

पण असं असलं तरी कल्पनांच्या धुंदीचं सुख कलाकंदाइतकं मधुर निश्चित आहे. हेच पहा ना. माझ्या एका मित्राचं हॉटेल आहे. आपल्याच गिऱ्हाईकासाठी वाचायला म्हणून तो 'मराठा' घेत असतो. त्यातील शब्दकोड्यांवर सुरुवातीला त्याची नजर खिळली नव्हती. पण त्यातील पांच आकडी बक्षिसाची रक्कम पाहून प्रयत्न करून पाहायची कल्पना मनात आली मात्र. झालं ! ह्या कल्पनेच्या सुगंधानं तो मित्र असा भारावून गेला आहे की नेहमी कोडं सोडविण्यात आणि त्यातील विधानांवर विचार करण्यात त्याचा सारा वेळ तर जातोच–पण त्याच्या मनात निरनिराळ्या कल्पनांचा

अनुक्रम ................ दि: ..१........ नोंद दि ........

जो सुगंध दरवळत असतो तोहि मोठा मजेशीर असतो !

... तेवीस हजारांचं पहिलं बक्षिस मिळालं की असं सुंदर हॉटेल काढायचं की शहरात कुणीच स्पर्धा करू शकणार नाही. सुंदर आरसे, आकर्षक सजावट, अद्यावत् फर्निचर, रेडिओ, टयूब लाईटस् आणि विशेष म्हणजे हॉटेलात काम करायला छबकडचा मुली...

त्याच्या ह्या कल्पना कधी साकार होणार हे देवालाच ठाऊक. परंतु आताशी तो फार आनंदी असतो. नवीन कल्पनांची निर्मिति होतच असते; अन् ह्या हलाखीच्या परिस्थितीतहि तो सुखी आहे, या कल्पनांच्या — प्राजक्तांच्या — माळांच्या सुगंधामुळेच !

त्याला कोणी वेडयात अगर मूर्खात काढील तर काढोत. पण त्याच्यासारखा विद्वान् कोणी नाही, असं माझं मत आहे. सुचेल ती कल्पना साकार करण्याच्यामागे धावणाऱ्या आणि श्रमणाऱ्या माणसाला जीवनाचा अर्थच कळलेला नाही. काही फुलं दिसायला अतिशय सुंदर, नाजुक नि मोहक असतात, पण सुगंध म्हणाल तर मुळीच नसतो, परंतु मोगरा, जाईजुई किंवा प्राजक्तासारख्या फुलांना बहि:सौंदर्य मुळीच नसूनहि सारं जग सुगंधानं आपल्याकडे खेचून घेण्याची विलक्षण शक्ति त्यांच्यात असतेच की नाही ? कुठल्याहि मन:स्थितीत कसाहि मनुष्य असला तरी त्याला त्या सुगंधाचा काही क्षण विरंगुळा वाटतोच.

कल्पनांचं अगदी असंच असतं.

कांहीची साकारता न होण्यातच अवीट गोडी आहे. मला वाटतं सगळ्याच कल्पना सरूप होण्यात खरा आनंद नाही; परंतु तो आहे त्या निर्माण करण्यात — फुलविण्यात ! फुलांनी मनाला जसा विरंगुळा वाटतो ना, तसाच जीवनाला कल्पनांनी दिलासा वाटतो. फुलांचा सुगंध चिरंजीव करण्याचा जो प्रयत्न करील तो खरोखरच मूर्ख !

सहजतेनं कल्पना साकार होणं म्हणजे प्राजक्ताचा मंद गंध वाऱ्याच्या झोतानं अंगावरून जाताच मनानं तरतरीत होण्यासारखं आहे. परंतु त्यांच्या माळा गुंफून तो साठविण्याचा प्रयत्न करणारा अरसिक म्हटला पाहिजे. लहानपणी प्राजक्ताच्या माळा गुंफता गुंफता फुलांना येणारी मलूलता पाहून जी निराशा होत असे, त्याची आता मला मुळीच खंत वाटत नाही. ★ ★

उपाय गवसत नसे. इतक्या सुंदर, नाजुक नि सुगंधी फुलांनी केवळ चार-सहा तासांनी सुकून जावं, याचं वैषम्य मनाभोवती पिंगा घालत राही.

आता इतकी वर्षं उलटून गेलीत, पण लालचुटुक दांडी असलेल्या नाजुक, पांढऱ्या शुभ्र पाकळ्या असलेल्या व मंद गंध पसरविणाऱ्या प्राजक्ताच्या माळांना दीर्घकाल टिकविण्याची किमया मात्र एकालाहि अजून शोधून काढता आलेली नाही. उलट निरनिराळ्या कल्पनांच्या माळाच आपण आजपर्यंत गुंफीत आलो आहोत.

ते साध्य झालं नाही हे एका दृष्टीनं फार बरं झालं. अपुऱ्या कल्पना, अर्धवट योजना ह्या खरोखरच प्राजक्तासारख्या असतात. सकाळच्या थंड वेळी प्राजक्तांचा सडा त्या वृक्षाखाली पडतो आणि वायुलहरीबरोबर त्यांचा मंद सुगंध सुखवितो ना – तशा !

कल्पना ही प्राजक्ताची धाकटी बहीणच.

कल्पनांची साकारता होण्यात एक विशिष्ट सुख असतं किंवा अभिमान अथवा यश असतं हेच खरं. परंतु त्यांच्या साकारतेपेक्षा त्यांना जो फुलोरा येतो, त्या आनंदाची धुंदी निश्चित अवीट व अवर्णनीय आहे भविष्यातील निष्फलतेचं आवरण त्यांवर असेलहि कदाचित्; परंतु त्याची खंत बाळगता कामा नये. कारण कल्पनांच्या मनोऱ्याची बांधणीच इतकी झटपट चालू असते की काही वेळानंतर माणसाला कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं.

आणि हा आनंद काय कमी किंमतीचा असतो म्हणता ?

मनुष्य आयुष्यात सारं काही विकत घेऊ शकतो; परंतु कुठल्याहि दुकानात आनंद विकत मिळत नाही. विकत मिळायला तो का कलाकंद आहे?

पण असं असलं तरी कल्पनांच्या धुंदीचं सुख कलाकंदाइतकं मधुर निश्चित आहे. हेच पहा ना. माझ्या एका मित्राचं हॉटेल आहे. आपल्याच गिऱ्हाईकासाठी वाचायला म्हणून तो 'मराठा' घेत असतो. त्यातील शब्दकोड्यांवर सुरुवातीला त्याची नजर खिळली नव्हती. पण त्यातील पांच आकडी बक्षिसाची रक्कम पाहून प्रयत्न करून पाहायची कल्पना मनात आली मात्र. झालं ! ह्या कल्पनेच्या सुगंधानं तो मित्र असा भारावून गेला आहे की नेहमी कोडं सोडविण्यात आणि त्यातील विधानांवर विचार करण्यात त्याचा सारा वेळ तर जातोच–पण त्याच्या मनात निरनिराळ्या कल्पनांचा

जो सुगंध दरवळत असतो तोहि मोठा मजेशीर असतो !

... तेवीस हजारांचं पहिलं बक्षिस मिळालं की असं सुंदर हॉटेल काढायचं की शहरात कुणीच स्पर्धा करू शकणार नाही. सुंदर आरसे, आकर्षक सजावट, अद्यावत् फर्निचर, रेडिओ, ट्यूब लाईटस् आणि विशेष म्हणजे हॉटेलात काम करायला छबकड्या मुली...

त्याच्या ह्या कल्पना कधी साकार होणार हे देवालाच ठाऊक. परंतु आताशी तो फार आनंदी असतो. नवीन कल्पनांची निर्मिति होतच असते; अन् ह्या हलाखीच्या परिस्थितीतहि तो सुखी आहे, या कल्पनांच्या – प्राजक्तांच्या – माळांच्या सुगंधामुळेच !

त्याला कोणी वेड्यात अगर मूर्खात काढील तर काढोत. पण त्याच्यासारखा विद्वान् कोणी नाही, असं माझं मत आहे. सुचेल ती कल्पना साकार करण्याच्यामागे धावणाऱ्या आणि श्रमणाऱ्या माणसाला जीवनाचा अर्थच कळलेला नाही. काही फुलं दिसायला अतिशय सुंदर, नाजुक नि मोहक असतात, पण सुगंध म्हणाल तर मुळीच नसतो, परंतु मोगरा, जाईजुई किंवा प्राजक्तासारख्या फुलांना बहिःसौंदर्य मुळीच नसूनहि सारं जग सुगंधानं आपल्याकडे खेचून घेण्याची विलक्षण शक्ति त्यांच्यात असतेच की नाही ? कुठल्याहि मनःस्थितीत कसाहि मनुष्य असला तरी त्याला त्या सुगंधाचा काही क्षण विरंगुळा वाटतोच.

कल्पनांचं अगदी असंच असतं.

कांहीची साकारता न होण्यातच अवीट गोडी आहे. मला वाटतं सगळ्याच कल्पना सरूप होण्यात खरा आनंद नाही; परंतु तो आहे त्या निर्माण करण्यात – फुलविण्यात ! फुलांनी मनाला जसा विरंगुळा वाटतो ना, तसाच जीवनाला कल्पनांनी दिलासा वाटतो. फुलांचा सुगंध चिरंजीव करण्याचा जो प्रयत्न करील तो खरोखरच मूर्ख !

सहजतेनं कल्पना साकार होणं म्हणजे प्राजक्ताचा मंद गंध वाऱ्याच्या झोतानं अंगावरून जाताच मनानं तरतरीत होण्यासारखं आहे. परंतु त्यांच्या माळा गुंफून तो साठविण्याचा प्रयत्न करणारा अरसिक म्हटला पाहिजे. लहानपणी प्राजक्ताच्या माळा गुंफता गुंफता फुलांना येणारी मलूलता पाहून जी निराशा होत असे, त्याची आता मला मुळीच खंत वाटत नाही. ★ ★

## नवी भूपाळी ▲ ▲ ▲ : ३ :

वरं झालं त्यावेळी माझ्या हातात फक्त लाल पेन्सील अन् पुढ्यात उत्तर पत्रिकाच होती म्हणून जर त्याऐवजी वेताची छडी आणि ती उत्तरपत्रिका लिहिणारा मुलगा असता, तर त्याचे दोन्ही हात लाल होईपर्यंत फोडून काढलं असतं. प्रश्नाचं उत्तर लिहिण्याची ही काय रीत झाली ? हल्ली राजकारणाच्या आखाड्यात काय बोलावं, यापेक्षा काय बोलू नये हे व्याख्यात्यांना जसं कळेनासं झालं आहे, किंवा सौन्दर्योद्यानात शृङगारावं कसं यापेक्षा कसं शृंगारू नये, हे किशोरींना कळेनासं झालं आहे; तसंच उत्तरपत्रिकेंत काय लिहावं यापेक्षा काय लिहू नये हे विद्यार्थी-जगाला समजेनासं झालं आहे.

प्रश्नपत्रिकेत एक प्रश्न विचारला होता, तो असा. 'तुमची आवडती भूपाळी कोणती ?'

मंद बुद्धीच्या किंवा परीक्षेत यशाच्या काठावर येनकेन प्रकारेण येऊन पोहोचणाऱ्या मुलानं डोकं खूप खाजविलं असतं अन् काहीच सुचलं नसतं तर तो प्रश्न सोडून दिला असता.

चौकस बुद्धीच्या किंवा त्यापेक्षा थोड्या हुशार मुलानं चट्कन् उत्तर लिहिलं असतं– 'घनश्याम सुंदरा श्रीधरा ....'

परंतु या मुलानं अकलेचे तारे तोडले होते. त्यानं लिहिलं होतं–

–माझी आवडती भूपाळी, "काव काव आणि कुकू ऽऽ च कू ऽऽ"

माझ्या जागी जर तुम्ही परीक्षक असता आणि तुमच्या हातात लाल पेन्सिल असती तर रागाच्या आवेशात तुम्ही पानभर फुली मारली असती अन् शून्याचा गोलहि मोठ्यांत मोठा काढला असता.

मलासुद्धा असंच करावंसं वाटलं. त्यासाठी पेन्सील हातात धरली, तशी माझ्या मनात मानसशास्त्र डोकावलं. असं तऱ्हेवाईक उत्तर लिहिणारा

मुलगा निश्चित् मूर्ख नसावा. मी जसजसा त्याच्या बुद्धीचा आणि त्यानं लिहिलेल्या उत्तराचा समन्वय घडवून आणू लागलो, तसतशी माझी मति काम करीनाशी झाली. त्याच्या उत्तरपत्रिकेवर लाल पेन्सिलनं फुली मारण्याचं अन् शून्य काढण्याचं तसंच राहिलं.

तब्बल आठवडा जाऊनहि उत्तर काही माझ्या हाती आलं नाही. परंतु परवा पहाटे मला ते अचानक गवसलं.

माझ्या धाकट्या भावाच्या डाव्या पायाला दुर्दैवानं ऐन तारुण्यात गुडघ्याजवळ कॅन्सर झाला. त्या आजाराच्या चिंतेनं माझ्या तनमनधनाची अक्षरशः राख झाली. अखेरी शस्त्रक्रिया करावी लागली अन् मांडीच्या मध्यापासून खालचा पाय कापावा लागला. त्याच्या केविलवाण्या जीवन-स्थितीचं वर्णन फक्त नियतीच काय ती करूं शकेल.

अज्ञात अंगुलीनं ललाटी लिहिलेला आलेख फक्त काळच वाचू शकतो, मनुष्य नाही. आणि म्हणूनच दु.ख, यातना, संकटांचे चटके सहन करण्या-खेरीज माणसाच्या हातात काही नसतं.

भावाला त्या शस्त्रक्रियेच्या वेदना असह्य होऊ नयेत म्हणून सतत गुंगीत ठेवलं होतं, आणि आमच्यापैकी कुणी तरी त्याच्या अंथरुणाजवळ बसून होतं. रात्रीला मी होतो त्याच्या अंथरुणाजवळ. दिवसांचे क्षण हरिणाच्या गतीनं निघून जातात, परंतु रात्रीच्या क्षणांची गति मात्र अगदी कासवासारखी असते. निदान आजाऱ्याच्या अंथरुणाभोवती तरी ! ते क्षण संपून संपत नाहीत. जिकडे तिकडे निरवानिरव झालेली होती. एकेक क्षण मला युगासारखा वाटत होता. अधूनमधून त्याला मी वारा घालीत होतो. त्याच्या आयुष्यात असा दारुण प्रसंग यावा, यामुळे त्याची कीव येत होती, अन् माझं मन तीळ तीळ तुटत होतं – .झिजत होतं चंदनासारखं. निपचित पडलेली त्याची ती देहाकृति पाहून मनात उगाच भलभलत्या शंका येत होत्या. मला सतावीत होत्या. पोखरून काढीत होत्या. " राजा, वैऱ्याची रात्र आहे, सावध रहा," हें गडकऱ्यांचं वाक्य पुनः पुन्हा डोळ्यासमोर येत होतं.

नको असूनहि हे सगळं घडल्यामुळे मी उद्विग्न मनःस्थितीत पलंगा-जवळून उठलो अन् बाहेर अंगणात आलो. थंडगार वाऱ्याची झुळुक अंगाला

चाटून जाताच मला एकदम बरं वाटलं. दीर्घ आळस टाकीत असता माझी दृष्टि आकाशाकडे गेली.

चार-सहा तासांपूर्वी पाहिलेलं निळं गडद आकाश आता किंचित् फिकं दिसू लागलं होतं. परंतु लक्षावधि तारकांना त्याची खंत वाटली नव्हती. त्या मस्त होत्या, मग्न होत्या, धुंद होत्या. बेहोष होऊन जणू नाचत होत्या. माथ्यावरली आकाशगंगा आता किती तरी झुकली होती. तिच्या दोन्ही किनाऱ्यांना अनेक तारकापुंज अर्चनेत मग्न होते. शुचिर्भूत होऊन क्षितिजावर आलेला शुक्र एखाद्या तपस्व्यासारखा डौलदार पण गंभीर वाटत होता.

तेवढ्यात काय घडलं कुणास ठाऊक. पण जवळच असलेल्या पिंपळावरल्या फांद्यातून एकच फड्फड् झाली आणि पन्नास-पाऊणशे कावळे अस्सल खर्जात काव् काव् करीत आकाशात उडाले. त्यांचं अनुकरण दोन-चार झाडांवरील कावळ्यांनी केलं अन् निःशब्द वातावरणात तो काव् काव् ध्वनि बराच वेळ गुंजत राहिला. मला काही आगळाच वाटला तो. खर्जात असूनहि कानांना कटु भासला नाही. त्यातील नीरसता जाणवली नाही.

कावळ्यांची काव् काव् हवेत विरते न विरते तोच दुरून 'कुकूऽऽच कूऽऽ' अशी कोंबड्याची बांग ऐकू आली तिला जवळच्या कोंबडवाडीतील कोंबड्यांनी साथ दिली.

अन् काय जाणवलं ते लक्षात येण्यापूर्वीच मनावर पसरलेली चिंतेची दाट छाया एकाएकी नाहीशी होऊ लागली. बधीर शरीर अन् जड अंतःकरण कावळ्यांच्या काव्कावीमुळे अन् कोंबड्यांच्या कुकूऽऽ च कूऽऽमुळे एकदम हलकं झालं. चैतन्याचा नवा साक्षात्कार मला अचानक घडला.

कावळ्यांविषयी किंवा कोंबड्यांविषयी तुमच्याप्रमाणे मलाहि कधी आकर्षण वाटलं नव्हतं. काळी चोच नि काळं अंग प्राप्त झालेला एक निषिद्ध पक्षी याखेरीज मी त्याच्यासंबंधी विचार केला नव्हता. मुळातच छटाक अदपाव आकर्षण वाट्याला आलेलं असताहि त्याचं भलतंच भांडवल करणारा नखरेल पक्षी यापेक्षा कोंबड्याचीहि महति मला जाणवली नव्हती. या पक्षांना पूर्वी कुणी मानवाचे स्फूर्तिदाते म्हटलं असतं, तर मला हसूच आलं असतं.

किती तरी वेळ भान हरपून मी खुल्या जागेत उभा होतो. आकाशातल्या अमाप हिरकण्यांची शोभा, कावळ्यांची काव्‌काव्‌, कोंबड्यांची बांग मला ताजंतवानं करीत होती. सुन्न मनाला सचेतन करीत होती.

पहाटेपूर्वीच्या काळोखातील ही काव्‌काव्‌ आणि कुकूऽऽ च कूऽऽ मला अवीट भूपाळी वाटली आणि तिनं माझं लक्ष एका नव्या प्रकाशाकडे, नव्या संदेशाकडे आकर्षून घेतलं.

जीवन हे समरांगण असो नाही तर रम्योद्यान. कुणी त्याला प्रवास म्हणो, नाहीतर त्याची किंमत बुडबुड्याइतकी करो. एक गोष्ट खरी; ती ही की ह्या आयुष्यात सुखापेक्षा दुःख लवकर प्रकट होतं. उतारापेक्षा चढच हिमालयासारखे एकदम समोर उभे राहतात आणि गर्भगळित करतात; सत्त्वपरीक्षा पाहतात. जायबंदी होणं तर प्रत्येकाच्याच पाचवीला पुजलं आहे. एका डोळ्यात आसू ठेवून दुसऱ्यात हासू ठेवायची फार अवघड भूमिका प्रत्येकाला करणं अपरिहार्य असतं. यापैकी कोणत्याहि एका गोष्टीची वृष्टि अधिक झाली तरी माणसानं कांकू करण्याची किंवा कातावून जायची काही गरज नाही. कारण कावरंबावरं होऊन कर्तव्यात कांकू करणं किंवा कातावणं हा काही पुरुषार्थ नव्हे. पुरुषार्थ आहे परिस्थितीला सामोरं जाण्यात; पुरुषार्थ आहे नशिबी आलं ते स्वानंदे स्वीकारण्यात अन्‌ त्यावर मात करण्यात !

या गोष्टीचा माणसाला विसर पडला तर एका मिळती सगळ्यांचं जीवन उध्वस्त होऊ नये म्हणून पहाटेपूर्वीच्या काळोखात कावळे अन्‌ कोंबडे नवी भूपाळी आळवीत असतात. त्यांच्या ह्या भूपाळी आळविण्यात स्वार्थापेक्षा कर्तव्याचाच भाग अधिक असतो आणि म्हणून हे पक्षी केवळ निसर्गाचे भाट नसून मानवाचे स्फूर्तिदाते आहेत. पुरुषार्थाची अखंड जाणीव करवून देणारी ही भूपाळी हे केवढं मोठं वरदान आहे !

ह्या वरदानामुळेच माझ्याकडून एक सत्कृत्य झालं. ते म्हणजे गेल्या आठवड्यात ज्या उत्तरपत्रिकेवर लाल पेन्सिलनं मी पानभर फुली मारणार होतो अन्‌ शून्याचा गोल जास्तीत जास्त मोठा काढून त्या मुलाची मूर्खात गणना करणार होतो, त्याला मी दहापैकी दहा मार्क दिले आणि त्याला भेटायचा निश्चय केला. ★ ★

## आईची पंगत-वडिलांची पंगत ▲ ▲ ▲ : ४ :

**कळून** न सांगता येणाऱ्या अत्तराच्या नावासारखे काही प्रश्न असतात. त्या अत्तरांचे गंध परिचित असतात; पण 'हे कोणतं अत्तर हो ऽऽ?' असं विचारलं म्हणजे माणूस नाव सांगायला अडखळतो: तो आपल्या उजव्या हाताची अनामिका कानातल्या फायावर जरा दाबतो अन् अंगठ्यावर घासतो. मग बरेच क्षण ती बोटं नाकासमोर वरचेवर धरून 'हे अत्तर ना, मला वाटतं...'' असं पुन:पुन्हा म्हणतो. पण त्या अत्तराचं नाव काही त्याला सांगता येत नाही.

काही प्रश्नहि असेच असतात. त्यांची उत्तरं आपल्याभोवती अत्तराच्या गंधासारखी वावरत असल्याची जाणीव माणसाला असते; पण ती सांगायची वेळ आली की माणूस अवाक् होतो, भांबावून जातो. प्रश्न कळून न कळल्यासारखा चेहरा तो करतो.

असा प्रसंग माझ्यावर अचानक आला. नाही म्हटलं तरी आतापर्यंत मी शे-दीडशे व्याख्यानं सहज दिली असतील. शालेय पारितोषिक-वितरण-समारंभ प्रसंगी पाहावयास मिळालेल्या आनंदी, निष्पाप, निरागस कोवळ्या नजरा जशा माझ्या स्मरणात आहेत, त्याचप्रमाणे विश्वविद्यालयीन क्रीडा-स्पर्धेत विजयी ठरलेल्या स्वप्नाळु, धुंद अन् विजयानंदान चमकणाऱ्या नजराहि चांगल्या आठवणीत आहेत. तसंच साहित्य आणि रंगदेवतेच्या दरबारांतील वार्षिकोत्सवात पाहिलेल्या अनेक भाग्यशाली, भावनोत्कट व कलासक्त नजरा यत्किंचितहि पुसट न झाल्याची खात्री झाली आहे. त्यामुळे कोणत्याहि व्यक्तीच्या नजरेला बुजून न जाता योग्य ते उत्तर विचारलेल्या प्रश्नाला द्यायचा सराव झाला आहे, असं मला कालपर्यंत वाटत होतं.

एक तासापूर्वी मंगल व्याख्यानमालेत 'आमची दैवते' ह्या विषया-वर भाषण करताना आजच्या वाङ्मयीन प्रश्नांना समर्पक उत्तरं ठणकावून

दिल्यामुळे मी आगळचाच आनंदात मश्गूल होतो. व्याख्यानानंतर चहा-पाणी झाल्यावर घरी पोहोचविण्यासाठी आलेल्या कोऱ्या करकरीत मोटारीत मी बसलो अन् ती चालू होणार इतक्यांत एक नऊ-दहा वर्षांचा मुलगा जवळ आला नि हातातली नाजुकशी वही अन् पेन माझ्यासमोर धरून म्हणाला,

"मला संदेशासह स्वाक्षरी हवीय्."

धावत आल्यानं त्याला धाप लागली होती. परंतु त्याच्या स्वभावातली धिटाई त्याच्या नजरेतून निर्भयपणे ओसंडत होती. ओठांवरून जीभ फिरवीत मी काय संदेश लिहितो हे तो उत्सुकतेनं पाहू लागला.

"माता पिता या अशा दैवतांना
पुजावे तुम्ही अर्पुनि भक्तिसुमना"

असा संदेश लिहून खाली स्वाक्षरी करीत मी त्या मुलाकडे पाहिलं. संदेशासह स्वाक्षरी मिळाल्याचा आनंद त्याच्या स्मित हास्यातून प्रकट होत असतानाच एक प्रश्न त्याच्या मनात डोकावला अन् क्षणाचा विलंब न करता त्यानं मला विचारलं, "एक प्रश्न विचारू आपल्याला ?"

"विचार की"

माझ्या नजरेला नजर देत त्यानं प्रश्न केला,

"आपल्याला आईची पंगत आवडते की वडिलांची ?"

मी त्याच्याकडे पाहातच राहिलो. वरपांगी सामान्य दिसणाऱ्या प्रश्नात किती अवघड उत्तर सामावलं होतं. क्षणभर त्या प्रश्नाचं उत्तर मला कळून न सांगता येणाऱ्या अत्तराच्या नावासारखं वाटलं. 'आईची पंगत आवडते की वडिलांची ?'

केवळ वेळ मारून नेण्यासाठी मी चटकन् बोलून गेलो, "दोघांचीहि".

मला वाटलं तो मुलगा गप्प बसेल. पण छे ! त्याची धिटाई पराकोटीला पोचली होती. त्याच्या शब्दांना नि आवाजाला आत्मविश्वासाची धार होती. रागाभीतीच्या कुंपणावरून उडी घेता घेता त्यानं निर्भीड शब्दात प्रश्न केला, "आपणहि खोटंच सांगता आहात मला. खरं सांगा, नक्की कोणाची पंगत आवडते ? आईची की वडिलांची ?"

अकाळविकाळ ढगातून सर्पाकृति चमकणाऱ्या विजांना पाहून डोळे दिपून जावेत, सागराच्या पर्वतप्राय लाटांना पाहून हृदयाचा थरकाप उडावा अशी अवस्था त्या प्रश्नानं माझी केली. तो मुलगा मला विचारीत होता, 'कोणाची पंगत आवडते ? आईची की वडिलांची ?' याचं काही तरी उत्तर ओठापर्यंत येत होतं अन् पुन्हा मागे परतत होतं.

इतक्यात कुणी तरी त्या मुलाला म्हटलं, "तुला उत्तर हवं आहे ना? मग उद्या सकाळी हजुरकरांच्या बंगल्यावर ये हं !" असं म्हणून मोटार सुरू झाली. हिरमुसलेला मुलगा क्षणार्धात माझ्या दृष्टीआड झाला. परंतु भांबावलेलं माझं मन अधिकाधिक गटंगळ्या खाऊ लागलं.

ह्या अस्थिर मन:स्थितीचा विचार करीत असता मला माझं गतायुष्य आठवलं. प्रत्येक माणूस आपल्या आयुष्याची घडी बसविण्याचा जेव्हा कसून प्रयत्न करतो, तेव्हा अनेकदा त्याच्या लक्षात येतं ते असं की हे जग म्हणजे एक सोंगट्यांचा विशाल पट आहे, आणि सर्व थरातील माणसं ह्या सोंगट्या आहेत. या पटावरून जाण्यासाठी जे दान टाकायला हवं ते दैव टाकत असतं. कधी हे दैव खुल्या दिलानं, मोकळ्या हातानं दान टाकतं, तर कधी साऱ्या मुलुखाची कंजुषी उराशी बाळगून !

मग होतं काय ?... तर माणसाची ससेहोलपट !

मी जेव्हा आयुष्याची घडी बसविण्याच्या प्रयत्नाला लागलो तेव्हा नशिबानं नको ते दान माझ्यासाठी टाकलं. वास्तविक मातृछाया आणि पितृछाया म्हणजे कल्पवृक्षछायेच्या धाकट्या बहिणी. पण ह्या प्रतिकूल दानानं मला आईवडिलांपासून गावोगावी फिरायला लावलं. आज पुण्याला तर वर्षा-दीडवर्षानं मुंबईला. तिथला ऊन वारा, पाऊस अंगवळणी पडतो न पडतो तोच अहमदाबादसारख्या बुरसटलेल्या शहराचा आश्रय घ्यावा लागला. तिथल्या शामळू वातावरणात समरस होणार तेवढ्यात कोल्हापूरच्या शिवेतून आत प्रवेश करावा लागला. तिथल्या मातीतील कणखर, दिलदार अन् प्रेमळ माणसं आपलीशी करीत नाही तोच आसरा घ्यावा लागला तो नागपूरचा.

एक नाही, दोन नाही, तब्बल अर्धा तप, नको ते दान दैव माझ्यासाठी टाकीत होतं. अन् माझी जीवनसोंगटी त्यानुसार फिरत होती.

परंतु या काळात ज्या ज्या वेळी मी मातृछायेचा अन् पितृछायेचा आसरा घेत असे. तेव्हा एकाच रंगातून पण वेगवेगळ्या शैलीत तयार झालेली व मनाचा ठाव घेणारी चित्रं पाहावयाला मिळाली.

टांगा अंगणात थांबतो आहे. मुलगा खाली उतरत आहे, अन् घरात प्रवेश करायला तो अधीर होतोय, तशी माउली दूधपाण्याचा पेला घेऊन दाराच्या चौकटीत उभी असलेली पाहून लक्ष लक्ष आनंद-ऊर्मि मुलाच्या हृदयात उसळताहेत. एकीकडे त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलसर होत आहेत तर दुसरीकडे जन्मदेत्या माऊलीच्याहि! तिला म्हणायचं असतं 'ये बाळ' पण शब्द मुके होत अन् कृति बोलू लागत.

वडिलांच्या मायेचं चित्र असंच, पण आगळ्या शैलीतलं आढळे. मुलाचं सामान आत ठेवताना त्याची लडिवाळ नजर पाठीवरून हात फिरवीत असल्याचा भास निर्माण केल्यावाचून राहात नसे. त्यांच्याशी होणारा पहिला संवाद मोजक्या किरणांनी गडद अंधार फिकट करावा तसा राही. फारा दिवसांनी घरी आलेल्या लेकराला पाहून आईचं मन नव-नीताला चट्कन् मागे टाकी, अन् पाणावलेले डोळे पदराला वरचेवर पुसत तिचं पालुपद चालू होई. कशाचं? – तर 'किती सुकलास रे तूं?' – याचं!

तिच्या समाधानासाठी मी खानावळीची स्तुति करण्याचा अवकाश, ती ताड्कन् म्हणायची, "नाव नको काढू त्या खानावळीचं! त्याच ना त्या चामड्यासारख्या पोळ्या?"

एवढ्यात वडील बाहेर जायला निघत. ते स्वतःच्या कामासाठी म्हणता का? छे! छे! बऱ्याच दिवसांनी आलेल्या मुलासाठी. त्याच्या आवडत्या भाज्या अन् फळं आणण्यासाठी! ते परत येईपर्यंत आई शिके-काईचं पातेलं घेऊन न्हाणीघरात यायची अन् स्वतःच्या हातानं लेकराचे केस चोळून देत म्हणायची, "काय हा मळ... मातात का रे झोपतोस कोल्हापूरला?"

"छे ग! रोज दोनदा लक्स साबण लावत असतो!"

"इशी! आता जाशील तेव्हा कुटलेली शिकेकाई घेऊन जा हो.."

वडिलांच्या पंगतीला जेवायला बसताना ते जे बोलत, प्रश्न विचारीत, त्यात मोकळेपणा नसे, असं मुळीच नव्हतं. पण त्यातील अथांग वात्सल्याचा निश्चित शोध लागत नसे. चिंचवृक्षाखाली असलेल्या विहिरीचा थांग लागू नये, असा लळा त्यांत असायचा वरपांगी पाणी हिरवट-निळसर दिसे, पण नुसत्या त्या प्रेमजलाची चूळ भरावी तर अमृत प्राशनाची तृप्ति ! प्रत्यक्षात शब्दांनी प्रकट न होणाऱ्या किती तरी गोष्टी कृतीतून प्रकट व्हायच्या. उगवतीच्या ललाटी शोभून दिसणाऱ्या शुक्राचं दुधी तेज नकळत वडिलांच्या दृष्टीतून बरसत राहायचं.

आईचं वात्सल्य म्हणजे निरपेक्ष, निःस्वार्थी प्रपात ! त्याला कशाची तोड नाही. तिच्या पंगतीला मुलगा रमतगमत जेवत असला तरी त्या माऊलीला त्याचं जेवण कमी झाल्याचं दुःख बोचू लागे–

"पुरे बाबा गप्पा ! जेवशील का पोटभर ?

"इतकं तर जेवलो ग ! पोट फुटायची वेळ आलीय."

"हे... हे काय जेवण झालं ? अरे, वरच्या खिडकीतून येणाऱ्या चिमण्यासुद्धा तुला लाजवतील.."

शब्द आणि कृतीचा सुरेख संगमानंद आईच्या सान्निध्यात मनमुराद लुटता येतो. या संगमात गुप्त रूपानं येऊन मिळणारी वडिलांच्या स्निग्ध-प्रेमाची सरस्वती त्रिवेणी संगमाचं भाग्य साकार करते.

नितळ आकाशातल्या पूर्णिमेच्या दूधी चांदण्यासारखं आईचं वात्सल्य असतं. त्यात स्पर्शाची रातराणी मंद गंधानं जग विसरायला लावते. उलट याच जगाकडे पाठ न फिरविता सामना देण्याचा आदेश, आशीर्वाद वडिलांच्या कृतीत असतो. मध्यान्हीच्या सूर्याचं तेज अन् ओज त्यात ठासून भरलेलं असतं.

पोटी आलेल्यांच्याच नव्हे तर जो जो जगन्मातेच्या नजिक जाईल, अशांच्या दुर्गुणांकडे डोळेझाक करणारी, त्यांचा स्वतःला स्पर्श होऊ न देणारी आई म्हणजे एक महानदी ! सदैव दुथडी वाहणारी ! दोन्ही तीरांना कुरवाळीत जाणारी अन् सर्वस्व अर्पिणारी !

पृथ्वीचा त्याग, तारकांचा प्रकाश, वृक्षवेलींची छाया, फळांचा रस, आणि फुलांचा गंध यांचा अखंड वर्षाव आईच्या कृतीतून प्रकट होऊन जीवन समृद्ध करतो तर हिमालयासारखी धीरोदात्त वृत्ति वाढविणारी संजीवनी वडिलांच्या दृष्टीतून, वृत्तीतून अखंड प्राप्त होत असते.

आईच्या स्पर्शातला ओलावा, शब्दातली रसाळता आणि प्राजक्ताला शतपटींनी मागे टाकणारा सहवासगंध वडिलांच्या प्रेमातून उजळ माथ्यानं दुथडी वाहताना आढळत नसेलहि. जगाला वडिलांचं प्रेम भीतियुक्त आदरा मुळे आणि दराऱ्यामुळे फणसासारखं भासलं तरी त्याच्या आत सागर-मोत्यांच्या मूल्यापेक्षा अनंत पटींनी श्रेष्ठ असलेले रसाळ गरे साठविलेले असतात. जसजशी गोडी चाखावी तसतशी अभिलाषा वृद्धिगत होते अन् त्या स्वर्गानंदात फणसाच्या पाठीची आठवणसुद्धा होत नाहीं.

अशी ही आईची पंगत अन् वडिलांची पंगत !

ज्यांच्याकडे मी उतरलो होतो तिथं दुसऱ्या दिवशी तो मुलगा आला नाही, याचं एका परी मला बरं वाटलं. झाकली मूठ वाटली मला माझ्या ज्ञानाची, अहंकाराची नि लौकिकाची ! पण जर तो आला असता तर हे विश्व निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवालाहि निरुत्तराच्या कोंडीत पकडणाऱ्या त्या पोराला मी खाली वाकून नमस्कार केला असता, त्याच्या गालांवर हात ठेऊन त्याच्या कपाळाचा मुका घेतला असता, अन् त्याच वेळी माझ्या डोळ्यातून निखळलेले दोन बिंदु त्याच्या पायावर पडताच मी स्वतःला धन्य मानलं असतं.

★ ★

तशा रक्तबंबाळ स्थितीतहि पोट धरून हसावं की आसपास जमलेल्या लोकांच्या अंगावर सारी शक्ति एकवटून ओरडावं हेच मला कळेनासं झालं. क्षणाचा खेळ झाला होता; परंतु तमाशा चालू राहिला तो मात्र तब्बल अर्धा तास.

क्षणाचे खेळ! एक ते अनुकूल तरी असतात नाहीतर प्रतिकूल निश्चित्! या अनुकूल क्षणांना कुणी सद्भाग्य वा योगायोग म्हणतं, तर प्रतिकूल क्षणांना दुर्दैव. विश्वातल्या ज्या अनेक रहस्यांनी माणसाचे काळे केस पांढरे केले आहेत, त्यात क्षणांचा महिमा अगदी न्यारा आहे.

अंतराळात भ्रमण करू लागलेला आजचा माणूस एक वेळ विश्वाची सारी रहस्ये शोधू शकेल; पण क्षणांच्या खेळाचं रहस्य त्याला अनंतापर्यंत उलगडता येणार नसल्यामुळे मानवी जीवनाचे अनभिषिक्त राजे म्हणून या क्षणांपुढे नतमस्तक होण्याखेरीज त्याला गत्यंतर नाही; याला मी अपवाद कसा असेन?

असं असूनहि अर्ध्या तासापूर्वी माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगानं दुर्दैव आणि योगायोग यांच्या मिश्रणाचा सुंदर आविष्कार घडवून आणला होता. तो कसा?

तर असा—

पस्तीस हजार रुपये खर्च करून नुकताच जो माझा बंगला बांधून तयार झाला, त्याच्या आवारात कोणकोणती झाडं लावावीत, यावर माझा अन् माझ्या पत्नीचा कडाक्याचा वाद झाला. बंगल्याच्या दर्शनीय भागात देशीविदेशी गुलाबांचे वाफे, मध्यभागी उभारलेल्या कमानीवर कृष्णकमळीची वेल आणि बंगल्याच्या दोन्ही टोकांच्या खिडक्यांसमोर रातराणी आणि प्राजक्त – इत्यादि पत्नीच्या योजना मला स्तुत्य वाटल्या. त्यांना मी

दा. क. ..........

होकारहि दिला, परंतु संत्र्यांची आणि पेरूची झाडं लावायची माझी योजना तिला नापसंत वाटली. तिचं म्हणणं असं की हंगामात ही झाडं फळांनी लगडली की ती फळं चोरण्याचा मोह पोरासोरांना हमखास होणारच. मग फुलझाडं, वेली त्यांच्या पायाखाली तुडविल्या तर जातीलच; पण घरातल्या मूल्यवान् वस्तूंच्याहि चोऱ्या झाल्याखेरीज राहणार नाहीत. कशावरून ?

पत्नीला निरुत्तर करण्यासाठी मी तिला तारेच्या, विटांच्या कुंपणाची योजना सांगितली; परंतु संत्री-पेरू झाडं लावण्याच्या कल्पनेशी ती सहमत व्हायला तयार नव्हती. तिचा तीव्र विरोध होता. ह्या झाडांखेरीज इतर कोणतीहि झाडं लावायला तिची ना नव्हती.

या कडाक्याच्या वादाला कंटाळून मी अखेरीस त्रस्त मनानं बंगल्यातून बाहेर पडलो. परंतु कोणतं झाड लावावं हा प्रश्न मला काही सुचू देत नव्हता. इतक्यात एक अणकुचीदार दगड माझ्या कपाळावर मर्मी लागला. त्यामुळे अर्धाएक इंचाची खोक पडली अन् भळभळ रक्त वाहू लागलं. क्षणभर माझ्या डोळ्यापुढं अंधार पसरला अन् मी मटकन् खाली बसलो.

क्षणाचा खेळ झाला तो असा अन् तमाशा सुरू झाला तो हा की रस्त्यावरची पाचपंचवीस माणसं जमा झाली. एकानं पाणी आणलं, दुसऱ्यानं जखम दाबून धरली, अन् पिकलेली बोरं खाण्याच्या अभिलाषेनं ज्यानं दगड मारला, त्या पोराला दोन जणांनी घट्ट पकडून ठेवलं. डोळ्यापुढला अंधार हलके हलके कमी होत असता मला आढळून आलं की, कुणी त्या पोराला दटावीत होतं, कुणी त्याच्या डोक्यावर मधूनच टप्पू मारीत होतं. 'द्या लेकाला पोलिसाच्या ताब्यात ' अशी एकानं धमकी दिली तेव्हा तर त्या मुलाचा चेहरा अक्षरशः रडवा झाला.

हे सारं पाहून मला आसपास जमलेल्या लोकांच्या अज्ञानानं आतल्या आत अनिवार हसू येत होतं. उलट त्यांचे शब्द, त्यांच्या कृती अन् त्या पोराची दयनीय अवस्था पाहून माझ्या पोटात इतकी कालवाकालव झाली की शेवटी मी ओरडून म्हटलं,

" कशाला त्या मुलाला छळता आहात ? कुणीही त्याला पोलिसाच्या ताब्यांत द्यायचं नाही. त्यानं माझ्यावर केवढे उपकार केले आहेत."

उपकार शब्द ऐकून सभोवतालचे लोक चपापले असावेत. मी जखमी होतो म्हणून ते हसले नाहीत, नाही तर त्यांनी मला वेडं म्हणायला कमी केलं नसतं कदाचित् म्हटलंहि असेल ! कारण त्यांचे शब्द ऐकायला मी तिथं थांबलोच कुठे ? दवाखान्यात जाण्याच्या निमित्तानं मी रिक्षा केली अन् त्या मुलाला माझ्या शेजारी बसवून त्याच्या घराकडे चलायला रिक्षेवाल्याला सांगितलं.

क्षणांचे खेळ असतात ते हे असे. त्यांच्या अनुकूल प्रतिकूलतेची एकाच वेळी जडण घडण होणं म्हणजे केवढं आश्चर्य ! पत्नीशी झालेल्या कडाक्याच्या वादविवादाला त्रासून मी बाहेर पडतो काय, कोणतं झाड लावायचं ह्या प्रश्नात मग्न होतो काय, वाटेत अणकुचीदार दगड कपाळावर आदळून रक्तबंबाळ बनतो काय, अन् त्या निमित्तानं माझ्या प्रश्नाचं उत्तर हाती लागतं काय ..

आकाराच्या, रूपाच्या आणि तृप्तिदानाच्या बाबतीत परमेश्वरानं ज्याच्याबद्दल कृपणवृत्ति दाखविली, अशा बोराबद्दल मला उभ्या आयुष्यात वाटली नाही एवढी अमर्याद, अजोड अशी विलक्षण आलपुकी वाटू लागली.

पण छे ! त्यात परमेश्वराला दोष देण्यात तरी काय अर्थ आहे ? ज्या क्षणी विधात्यानं माणूस निर्माण केला, त्या क्षणी त्याला अलौकिक कृति निर्माण झाल्याचा दिव्यानंद प्राप्त झाला असेल पण तो क्षणिकच ! इतरांपेक्षा अधिक बुद्धि, वय, कल्पनाशक्ति, विचारशक्ति देऊनहि त्याचं निर्बुद्धतेचं, कोत्या वृत्तीचं, जड होत जाणारं तागडं पाहून तो मनातल्या मनात खजिल झाला. मग कलाकृतींतील वैगुण्य घालविण्यासाठी त्यानं निसर्ग कलाकृति अधिक सुंदर तयार करायला घेतली; अन् त्यांतून संकेतरूपानं ज्ञान प्राप्त करून द्यायची संधि दिली.

हे खरं नसतं तर आकाशाला माथा टेकवणारं नारळीचं बन तयार झालं नसतं. त्याच्या शेंड्याला झावळीच्या चवऱ्या बांधल्या नसत्या अन् बहिरंगाला कोणतंहि नाजूक, डौलदार, नयनरम्य रूप प्राप्त झालं नसताना आत दुधी खोबरं अन् अमृततुल्य पाणी देणारी नारळं लाविली नसती. संसाराच्या झंझावाताला पुरून उरावं अन् अस्तित्व कायम टिकवावं, याची जाणीव करवून देण्यासाठी परमेश्वरानं माणसाच्या हातात नारळ दिला.

अनुक्रम 80936 वि: निबंध २९/३३

दैवदुर्विलास असा की नारळातलं थंडगार पाणी पिऊन आणि दुधी खोबरं खाऊन होताच माणसानं करवंटी फेकून दिली. हे पाहून विधात्यानं कपाळावर हात मारला.

पण निराश न होता त्यानं आमराई निर्माण केली. उष्ण लहरींचा ताप सौम्य व्हावा म्हणून आम्रफलांची उधळण ठायी ठायी केली. अशासाठी की आयुष्याच्या नागमोडी रस्त्यावर असलेल्या चढउतारांना, खाच-खळग्यांना अन् काट्याकुट्यांना माणसानं तुच्छ मानावं अन् जीवन केवळ मधुर नसून आंबटगोड आहे, हे त्याच्या लक्षात यावं.

परंतु वर्षानुवर्ष या फळावर तुटून पडूनहि माणूस बुद्धीशी बेईमान झाल्याचं परमेश्वराच्या दृष्टोत्पत्तीस आलं.

मग विधात्यानं कलाकृति-निर्मितीचा मंत्र बदलला तंत्राला कलाटणी दिली अन् अवतारी पुरुषांच्या रूपानं तो जनताजनार्दनात सामील झाला. परंतु तपामागून तपं जाऊनहि आज्ञाधारक, शांत, संयमी, एक वचनी, एक-बाणी, एकपत्नि तत्त्वपालकाच्या निष्ठावंत, सोज्ज्वल व मांगल्यमय पत्नीच्या चारित्र्यासंबंधी संशय प्रकट करणारा माणूस जनसागरात जेव्हा त्याला आढळला तेव्हा बिचारी भूमिकन्या सीता धरतीमातेच्या कुशीत लपली ती कायमची. रामानं आसरा घेतला तो शरयू नदीचा; परंतु अवतार समाप्ति-नंतरहि निरपेक्ष सेवा, अलौकिक त्याग अन् एकात्मतेची शिकवण फल-भक्षणांतून माणसाच्या रक्तात भिनली जावी व कृतीतून ती उतरावी यासाठी त्यानं ज्या फळांची निर्मिति केली ती फळं म्हणजे रामफळ व सीताफळ !

आश्चर्य असं की शतकांमागून शतकं जाऊनहि अशा एक ना अनेक फळांचा आस्वाद घेऊनहि विधात्याला कळून आलं ते हे की माणूस ही त्याच्या निर्मितीची शोकांतिका आहे. प्रकाशाला अंधार बनविणारी, गंधाला दुर्गंध समजणारी, दया माया सहानुभूतीला नख लावणारी, अन्यायाला उराशी घट्ट धरून त्याचे वरचेवर मुके घेणारी अन् सत्याला पायाखाली तुडविण्यात मग्न झालेली मानवजात म्हणजे विश्वकलाकृतीवर स्वतःच्या हातानं उडालेले काळ्या रंगाचे अनंत शितोडे.

ह्या कलाकृतीतील वैगुण्य नष्ट करण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून त्यानं जं फळ निर्माण केलं ते म्हणजे बोर.

इवल्या इवल्या पानात, लहानमोठ्या फांद्यांना लागलेल्या, काट्यात निर्माण झालेल्या ह्या फळांचा - बोरांचा आस्वाद घेतानाया विश्वाशी आपलं नातं महासागरातल्या एका बिंदूइतकं किंवा मातीच्या कणाइतकंसुद्धा नाही, याचा प्रत्यय मनुष्याला यावा आणि ज्या सुख, अपेक्षा, स्वप्नांच्या खेळात तो धुंद झाला आहे, त्याचं खरं स्वरूप उभ्या आयुष्यात किती अत्यल्प आहे, याचा उमज पडावा हा हेतु विश्वनिर्मात्याच्या मनात होता. तो अर्थातच सफल होणार नाही, याची खात्री होती, म्हणूनच या चिमुकल्या फळाच्या आकाराच्या, रूपाच्या अन् तृप्तिदानाच्या बाबतीत जी कृपणवृत्ति त्यानं दाखविली, तिच्या मागचा इतिहास हा असा.

रिक्षा का थांबला म्हणून मी चपापून बाजूला पाहिलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की माझ्या शेजारी बसलेला मुलगा केव्हाच खाली उतरला होता. त्यानं घाईघाईनं घरात प्रवेश केला होता.

मी रिक्षातून खाली उतरलो अन् अंगणात उभा राहिलो. तेव्हा माझं लक्ष सहज वर गेलं. तिथं असलेलं झाड छोट्या छोट्या, पिवळ्या-लाल रंगाच्या फळांनी खच्चून भरलं होतं.

माझ्या विवाद्य प्रश्नाचं उत्तर एका क्षणात मला गवसलं. इतक्यात वडिलांचं बोट धरून तो मुलगा बाहेर आला. गळ्यात स्टेथास्कोप व पांढरे स्वच्छ कपडे असलेले ते गृहस्थ अपराधी पण मोकळ्या मनानं माझा हात हातात धरीत म्हणाले,

"माफ करा माझ्या मुलाच्या अपराधाबद्दल. त्याच्या वतीनं मी क्षमा मागतो आपली. आत या. मी आपली जखम बांधतो."

त्या मुलाच्या वडिलांच्या-डॉक्टरांच्या-तोंडून मोजके शब्द बाहेर पडताच माझा गळा भरून आला. पूर्वपरिचय नसताहि मी त्यांना कडकडून मिठी मारली अन् कशाबशा घोगऱ्या आवाजात पुटपुटलो,

"डॉक्टर...डॉक्टर...!"

★ ★

## नृत्य आणि अग्निनृत्य : ६ :

अर्धा अधिक लिहून झालेला अग्रलेख आणखी पंधरा मिनिटांनी पूर्ण झाला असता, अन् मग ' सुटलो बुवा आजच्या दिव्यांतून ' असं म्हणत आळस झटकून गरम चहाचा कप मी रिकामा करणार होतो. परंतु अडखळलो ते अनावश्यक विचारावर.

नेहमीचंच आहे माणसाच्या आयुष्याचं हे ! ज्या काही चमत्कारिक पण अधोगतीस नेणाऱ्या सवयी त्याला जडतात, त्यात अनावश्यक विचा-रावर अडखळण्याची मोठी वाईट सवय त्याला जडली आहे पहा. त्यातून लाभ मात्र शून्य. यामुळे जीवनात आवश्यक असलेली प्रगति तर होत नाहीच; उलट ज्या शांतीनं आणि समाधानानं त्याला दैनंदिन जीवनात विरंगुळा वाटेल, त्या शांतीला नि समाधानाला तो पारखा होतो. स्वतःच अशी परिस्थिति निर्माण करवून घेतो, अन् मग उसासे टाकीत कोणतंहि काम त्याच्याकडून नीटपणे होत नाही.

आता माझ्या अग्रलेखाचंच उदाहरण घ्या ना. अग्रलेखाला विषय छान मिळाला होता. त्याची सुरवात अन् मध्य मौलिक विचारांनी खच्चून भरला होता. चीड, त्वेष अन् जागृति हे तीन गुण पुरेपूर उतरले होते. उद्या सकाळी ज्या वाचकांच्या हातात अंक आला असता नि त्यांनी अग्रलेख वाचला असता त्यांना विचार करावा लागणार होता. परंतु हा अनावश्यक विचार मधेच एकदम उगवला. भरारा वाढला. पावसाच्या सरी कोसळल्यानंतर कावळ्याच्या छत्र्या उगवतात नि वाढतात ना, त्याप्रमाणे.

खरंच, अनावश्यक विचार म्हणजे कावळ्याच्या छत्र्याच. त्यांचा उपयोग होणार नाही, पण जागा मात्र व्यापून टाकतील. मनाच्या भूमीवर अनावश्यक विचारांच्या छत्र्या अशीच गर्दी करतात.

आज सकाळी मला बेळगावहून एक हृदयद्रावक बातमी फोननं कळविण्यात आली होती. धर्माच्या नावाखाली हैदोस घालणाऱ्या आणि सत्तेचा अमानुष उपयोग करून माणुसकीला काळिमा लावणाऱ्या पोर्तुगीज सरकारनं सत्याग्रही अमीरचंदला पोलादी खिळयांच्या बुटाखाली ठेचलं होतं, लाठीच्या मारांनी त्याची हाडं खिळखिळी केली होती, मोटारीच्या लोखंडी हॅण्डलसारख्या हत्यारानं त्याच्या छातीच्या फासळ्या तोडल्या होत्या आणि क्रूरपणानं त्याला हुतात्मा केलं होतं.

परंतु अमीरचंद गुप्ताला त्याचं काहीच वाटलं नसावं. कारण स्वातंत्र्याच्या यज्ञात अन् राष्ट्रध्वजाच्या इभ्रतीस्तव त्यानं उघड्या डोळ्यांनी उडी घेतली होती आणि अग्निनृत्यानं जीवन समाप्त केलं होतं.

जीवनाच्या व्याख्या थोड्याथोडक्या का झाल्या आहेत ? जीवन हे काव्य आहे, असं कवींनी म्हटलं तर आयुष्य हे बुडबुड्याच्या किंमतीइतकं आहे असं आत्मवाद्यांनी ठासून सांगितलं आहे. याला उत्तर म्हणून की काय, एक नाटककार म्हणाला, ‘ All world is a stage and we are the actors ’ आणखी कोणी कशीहि व्याख्या केली तरी एवढं मात्र खरं की जीवन हा एक प्रकारचा संग्राम आहे. त्यात कधी गनिमी पद्धतीनं लढावं लागतं तर कधी आमनेसामने लढा द्यावा लागतो. चार देऊन दोन घ्यायची सदोदित तयारी ठेवावी लागते. तरच निभाव लागण्याची, सुखाच्या ओहोळाजवळ पोहोचण्याची आशा असते.

परंतु सर्व संग्रामात श्रेष्ठ संग्राम म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीचा, गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचा ! स्वातंत्र्ययज्ञात जे प्राण पणाला लावून उडी घेतात, त्यांचीच देशभक्ति उत्कट असते. त्यांचा त्याग पराकोटीचा असतो. मागे काय राहील अथवा यापासून पदरात किती फायदा पडेल, याकडे त्यांचं लक्ष नसतं. अल्या गोष्टी त्यांना पापमय वाटतात. त्या विचारात अडकण्यापूर्वीच अग्निनृत्य करून आपलं जीवन त्यांनी असं काही उजळून टाकलेलं असतं की इतिहासात त्यांचं नाव अमर होतं. भूमीतला कण न कण अखंडपणे त्यांना श्रद्धांजलि वाहत असतो.

भगतसिंग, बाबू गेनू, वासुदेव बळवंत फडके यांनी अग्निनृत्य केलं. त्यांच्याच मालिकेत अमीरचंद गुप्ताला स्थान मिळालं. आजहि ह्या शूरांच्या पराक्रमाचा पोवाडा गायला जात आहे. भविष्यातहि असाच गायिला जाईल.

अमीरचंदानं केलेल्या दिव्य बलिदानावर मी अग्रलेख लिहायला घेतला होता. त्याला 'अग्निनृत्य' हे नाव द्यायचं ठरविलं होतं. वरील विचार तळमळीनं लिहिले होते आणि आणखी पंधरा मिनिटांनी हा लेख लिहून पूर्ण होणार होता. इतक्यात माझ्या खोलीत एक मित्र आला अन् वादाचा मुद्दा काढून तब्बल तासभर हुज्जत घातली.

(पिंजारलेले केस अधिक पिंजारून, हाताची मूठ कधी हवेत उडवून तर केव्हा टेबलावर आदळून व आवाज चढवून तो म्हणाला होता, ' मी जर मुख्य मंत्री झालो तर देशातील सर्व वर्तमानपत्रं बंद करीन किंवा ताब्यात घेईन. तुम्ही सारे संपादक सरकारचे निव्वळ भाट आहात. स्वतःच्या नातेवाईकांना किंवा पोराना मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळवून देण्यासाठी कुणापुढेहि लाळ घोटाल. किंवा पोरानं पैसा खाऊन तोंडाला डांबर फासलं तर हे पाप आतल्या आत धुण्यासाठी कुणाचेहि पाय चाटाल. हाच तुमचा ध्येयवाद! जनतेची दिशाभूल करणाऱ्या ह्या योजना, ही अंदाजपत्रकं आणि वारेमाप दिल्या जाणाऱ्या आश्वासनांचा काही तरी उपयोग झाला आहे काय? उलट, जनताजनार्दनाच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा हा एक अजब नमुना आहे! ह्या योजनांना, आश्वासनांना डोक्यावर घेऊन नाचणारे तुम्ही संपादक म्हणजे दुसरा नमुना! देशात बेकारी किती वाढत आहे, अन्न-वस्त्राचा प्रश्न कसा सुटेल, किती काळात सुटेल याकडे तळमळीनं, निःस्वार्थी हेतूनं कोणीच लक्ष देत नाही. वास्तविक कारखान्यांचं, बँकांचं राष्ट्रीयीकरण व्हायला पाहिजे; पण ते देखील होत नाही. हे असंच चालत राहिलं, तर जनता असंतुष्ट होत जाईल. प्रक्षोभ वाढत जाईल. मग तिनं केलेल्या तांडवनृत्यानं तुमची बोबडी वळेल, तेव्हा कळेल..."

ह्या महापुरुषाचं एक तास चाललेलं भाषण एकदाचं संपलं आणि तो तावातावानं निघून गेला. मी माझा अपुरा राहिलेला अग्रलेख लिहायला घेतला, लेखणीहि उचलली, पण मन काही केल्या स्फुरेना, हात चालेना..

अमीरचंद गुप्ताच्या बलिदानाचं चित्र माझ्या डोळ्यासमोर होतं. त्याच्या देहत्यागाचा पराक्रम हृदयात घर करून बसला होता. अन् ह्या पराक्रमाला मी 'अग्निनृत्य' नाव दिलं होतं. लेखात म्हटलं होतं–

"स्वातंत्र्याच्या यज्ञात अग्निनृत्य करणाऱ्या स्वर्गाची द्वारं खुली असतील वा नसतील. पण जनतेच्या अंतःकरणाची द्वारं मात्र सताड उघडी असतात. अशी माणसं ज्या समाजात, ज्या राष्ट्रात होतात, त्या देशाचं भवितव्य सूर्यासमान प्रभावी असतं. बाकीचे नेते अथवा सामाजिक चळवळीतील बाजारबुणगे पुढारी फक्त नृत्य करतात.."

या नृत्याचं चित्र मघा तावातावानं निघून गेलेल्या मित्रानं खरंच करून दाखविलं. जनतेची अनेक चित्रं मी माझ्या हयातीत काही कमी पाहिलेली नाहीत. परंतु जनतेला उलट दिशांनी मार्गदर्शन करून आपलंच अस्तित्व टिकवू पाहणाऱ्या नेत्यांचीच चित्रं अधिक पाहावी लागली.

जीवन, मग ते वैयक्तिक असो नाही तर सामाजिक ते संघर्षाशिवाय असूच शकत नाही. समाज अथवा राष्ट्र यांच्या बाबतीतहि असंच म्हणावं लागेल. परंतु संघर्षाचा खरा अर्थ फार थोड्यांना कळतो. ज्यांना कळतो तेच सर्वस्वाचं बलिदान करीत अग्निनृत्य करतात. बाकीचे आपल्या केसालाहि धक्का लावून घ्यायला तयार नसतात. त्यागाच्या झळीपासून ते चार हात सदैव दूर असतात. कारावासाचा अथवा हालअपेष्टांचा अंधार त्यांना नको असतो. फक्त मुठी आवळीत, कंठरवानं सभापरिषदा गाजवीत, ते मागण्या-निषेधांची पुडकी उधळतात. हेच त्यांचं नृत्य ! जातीय द्वेषानं पेटलेल्या भूभागात एकादाच महात्मा जाऊन शांतीचा प्रचार करतो किंवा हरेकाला जमीन मिळावी. यासाठी देशभर पदयात्रा करणारा एखादाच आचार्य सापडतो. हे महापुरुष अग्निनृत्य करतात ! बाकीचे सारे नुसते नृत्यवादी !!

* *

# सकाळचा चहा – दुपारचा चहा ▲ ▲ ▲ : ७ :

**जगातल्या** सर्वश्रेष्ठ पाकशास्त्रज्ञाला [ किंवा ती जर स्त्री असेल तर पाकशास्त्रज्ञीला ] हे सारं सांगून रहस्य हुडकून काढायची विनंती मी करणार आहे. त्याशिवाय माझ्या शंकेचं निरसन होणार नाही अन् त्यावर अवलंबून असलेलं समाधानहि मला मिळणार नाही. का कुणास ठाऊक, पण माझी तशी समजूत झालीय खरी. तसं पाहिलं तर माझी शंका अन् तिच्या मागे दडलेलं रहस्य फार भयंकर आहे, अशातला भाग नाही; अथवा त्यावर जगाचं फार मोठं भवितव्य अवलंबून आहे, असंहि नाही; किंवा त्यामुळे मानवजातीला अमाप आनंदाचा व एकमेव सुखाचा मार्ग गवसणार आहे, असं देखील नाही.

तसं पाहिलं तर माझी शंका अगदी सामान्य आहे. मी ज्या घरात संसार मांडला आहे ते घर फक्त दोन खोल्यांचं आहे, त्यांपैकी एकीचा बैठकीसाठी उपयोग करीत असतो अन् दुसरीचा स्वयंपाकघर म्हणून ! नित्याच्या संसाराला लागणाऱ्या वस्तू माझ्या पत्नीनं जशा विशिष्ट पद्धतीनं अन् ठराविक डब्यात घालून ठेवल्या आहेत, तसंच दिवसातून दोन वेळा होणाऱ्या चहाचं साहित्यसुद्धा ठराविक डब्यात ठेवलेलं आहे. स्टेनलेस स्टीलच्या उभट डब्यात लिप्टनचा चहा असतो. दूध तापविण्याचं भांडंहि ठरलेलं आहे; परंतु सकाळी उठल्याबरोबर जो चहा पत्नी मला करून देते, त्याची चव काही अवीट असते ! एका घोटात शरीर अन् मन ताजंतवानं होतं, क्षणात उल्हास वाटू लागतो; त्यामुळे मी पत्नीला शाबासकीहि देतो. पण हे शब्द हवेत विरून जातात. माथ्यावरला सूर्य पश्चिमेला झुकतो अन् दुपारची किरणं खिडकीतून खोलीत प्रवेश करू लागताच ती मला दुपारचा चहा करून देते. यावेळी त्या चहाला काही सकाळची चव येत नाही. त्याला ना धड स्वाद असतो ना गोडी.

वास्तविक दोन्ही वेळचा चहा माझी पत्नीच करते. चहा करण्याचं भांडं ठराविकच असतं. साखर-चहा पूर्वीच्याच डब्यातला असतो. मग सकाळच्या आणि दुपारच्या चहाच्या स्वादात अथवा गोडीत इतका फरक का पडावा ?

याच कारणावरून कितीदा तरी माझा अन् पत्नीचा खटका उडतो. 'तुला चहासुद्धा करता येत नाही ना ?' असं रागानं झटकन् म्हणून मी तिचा निषेध करायला भीत नाही; परंतु सकाळच्या अन् दुपारच्या चहाच्या चवीत फरक का पडावा याचा उलगडा माझा मलाच होत नाही. माझा राग अन् मी केलेला निषेध असह्य झाला म्हणजे पत्नी मला म्हणते,

" मग तुम्हीच करून पहा की दोन्ही वेळचा चहा."

तिच्या या आह्वानाचा मी कित्येक वेळा स्वीकार केला आहे. दार्जिलिंग, ऑरेंज पिको, निलगिरी, ब्रुक बॉन्ड इत्यादि जातींचा चहाहि वापरून पाहिला आहे; परंतु या दोन वेळच्या चहात असा फरक कशानं पडतो, याचं रहस्य न उलगडल्यामुळे एखाद्या पाकशास्त्रज्ञाला ते शोधून काढायला सांगण्याची वेळ आता आली आहे.

मनुष्य स्वभावाची काय विचित्र तऱ्हा ही !

एखादी गोष्ट आवडली किंवा पटली म्हणजे ती तशीच होत रहावी असं त्याला सारखं वाटत असतं. त्यासाठी तो प्रयत्नालाहि लागलेला असतो. इतकंच नव्हे तर ती तशी घडत नसली म्हणजे तो तिच्या साकारतेसाठी जिवाचा केवढा आटापिटा करतो.

आज सकाळी दिल्लीहून माझ्या एका मित्राचं पत्र मला आलं. बालपणापासून तो माझ्या शेजारी राहिलेला. आम्ही दोघांनी शालेय शिक्षण पुरं केलं ते एकाच वर्गात. हिंडलो, गप्पा मारल्या त्या देखील निकट सान्निध्यात. त्यामुळे त्याच्या आवडीनिवडी, आशाआकांक्षा मला पूर्ण कळून चुकल्या आहेत. तो बोलका होता, चुणचुणीत अन् कुशाग्र बुद्धीचा होता. आपल्याला अशीच मोकळ्या मनाची, कलाभिमुख नि विशाल दृष्टिकोन असलेली पत्नी संसारात लाभावी असं त्याला वाटत होतं. सुदैव की दुर्दैव म्हणतात ना– त्यानुसार त्याला एका तरुणीचा सहवास काही काळ लाभला.

आणि गंमत अशी पहा – ती खरोखरच त्याच्या आवडीनिवडीला अनुरूप अशीच होती. मनानं ती कवि होती, हृदयानं प्रेमळ होती. त्याच्या जीवनाला असलेले पैलू तिच्याहि जीवनाला होते. युगायुगांचे सहप्रवासी व्हायला ती दोघं अगदी लायक होती.. परंतु..

हा 'परंतु' शब्द मानवाच्या कुडंलीत नीचेच्या शनीसारखा आहे. नाही का? म्हणजे असं की शुक्रगुरूंची युति घडून आलेली असते. बासुंदीत चारोळ्यांची भर पडावी तसा बुधहि त्यात येऊन सामील होतो अन् मागून रवि पुढे ढकलीत असतो तो निराळाच. अशा वेळी नीचेचा शनि नेमका चोरपावलानं प्रवेश करतो अन् भवितव्याचा चक्काचूर करतो. निदान माझ्या मित्राच्या जीवनाचा नाश तरी ह्या 'परंतु'च्या शनीनं केला.

म्हणजे असं झालं की ती तरुणी विवाहित असूनहि माझ्या मित्राच्या गुणांवर प्रेम करीत होती.

आटोपला ना सारा खेळ? खरोखरच त्यांचा खेळ आटोपला होता.

तसं पाहिलं तर त्याचं आता लग्न झालेलं आहे. नाही म्हणायला बायकोहि सुशिक्षित मिळाली आहे; परंतु ज्या आवडीनिवडी आणि आशा-आकांक्षा तो उराशी बाळगून होता, त्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे साफ ढासळून पडल्या आहेत. लग्नानंतर उटकमंडला तो मधुचंद्राला गेला असताना त्यानं मला तिथून पत्र लिहिलं होतं,

"...अशा रीतीनं नलिनी जीवनातून निघून गेल्यानंतर सुनीतीशी संसार करण्याचं साहस मी करीत आहे. त्याची आद्य तयारी म्हणून या पहिल्या मीलनात तिला मी माझ्या जीवनपैलूंची कल्पना देणार आहे..."

मधल्या काळात तो कुठे बेपत्ता झाला होता, देव जाणे! परंतु मागल्या आठवड्यात तो दिल्लीला असल्याचं कळलं नि आज तर त्याचं पत्रहि माझ्या हाती पडलं होतं. ते फोडून वाचण्यापूर्वी माझ्या मनात विचार येऊन गेला– 'बिचारा आता तरी संसारात काहीसा सुखी झाला असेल.' पण त्या पत्राची एकेक ओळ वाचताना माझी अस्वस्थता भरारा वाढू लागली. त्यानं मोकळ्या मनानं लिहिलं होतं—

"...केवळ तू माझा बालपणचा सवंगडी आणि जिवाभावाचा मित्र म्हणून खुलासेवार पत्र तुला लिहीत आहे. तेवढ्यानं जरी माझ्या मनाला समाधान लाभले तरी पुष्कळ आहे; पण अर्ध्या तपाच्या संसारानंतर एक गोष्ट मला कळून चुकलीय ती ही की कोणे एके काळी जीवनात आलेल्या नलिनीची सर काही सुनीतीला येणार नाही. सकाळच्या चहात अन् दुपारच्या चहात फरक वाटतो ना? तस्संच!!"

सकाळचा चहा—दुपारचा चहा!

उरात बाळगलेलं ध्येय, एखादी आवड अथवा कल्पना आणि मोठे‧पणी त्यांना येणारी अनपेक्षित फळं म्हणजे सकाळच्या अन् दुपारच्या चहाच्या स्वादात पडणाऱ्या फरकासारखंच आहे. वास्तविक साखर-चहा तोच. फार काय चहा करणारी व्यक्तीसुद्धा तीच असते. असं असूनहि काही तासांच्या अंतरातील चहात एवढा फरक पडतो, तर मग मनात योजलेले बेत, आखलेल्या योजना अन् केलेले निश्चय वेगळ्या स्वरूपात साकार होणं अपरिहार्य आहे. त्यामुळे व्यक्तीला दोष देता येणार नाही की वस्तूला नावं ठेवता येणार नाही. फक्त त्या कालाकडे बोट दाखविता येईल इतकंच!

माझ्या धाकट्या भावाचंच उदाहरण पहा ना – त्यानं लहानपणापासून एक टुमदार बंगला बांधायचं ठरविलं होतं. अगदी आधुनिक पद्धतीचा. शय्यागृह, पाकगृह, स्नानगृह आणि बैठक स्वतंत्र. त्याला प्राइझ बॉण्डच्या जुगारात पंचवीस हजारांचं घबाड मिळालं अन् त्यापैकी अठरा हजारात त्यानं आपल्या अपेक्षेनुसार बंगला बांधला. परंतु दोन वर्षांपूर्वी जेव्हा तो बंगलोर, म्हैसूर, मद्रास पाहून आला, तेव्हा स्वतःचा बंगला त्याच्या मनातून एकदम उतरला. त्या भरात त्यानं तो विकून टाकला. पण अजूनहि त्याला पूर्वी ठरविलेल्या पद्धतीचा बंगला काही बांधता येत नाही. तो म्हणतो– 'छे! माझं कुठं चुकतंय तेच मला कळत नाही. नि ते कळत नाही तोपर्यंत नवा बंगला काही मी बांधणार नाही.'

चुकण्याचं कारण त्याला शेवटपर्यंत न कळलं तर फार बरं होईल, असं मला मनापासून वाटतं. त्यानंच काय कुठल्याहि माणसानं 'कारण' शोधण्याचा यत्न करू नये चुका होणं किंवा करणं हा मानवधर्मच आहे. मग झालेल्या चुकीचं कारण शोधणं म्हणजे नव्या चुकीच्या जन्माची पूर्वतयारी नव्हे काय? त्यापेक्षा ते न कळलं तर माणूस आहे त्याहून किती तरी सुखी होईल. त्याला तुम्ही 'अज्ञान' म्हटलं तरी चालेल. पण अज्ञानाचं सुख मानवी मनाला पोषक आहे.

घड्याळात चारचे ठोके पडले. ते ऐकून मी पत्नीला म्हटलं, "अग एऽऽ, दुपारच्या चहाची वेळ झाली की."

तशी ती फणकाऱ्यानं म्हणाली, "मी नाही करणार चहा. उगाच ते चिडणं नको. सकाळसारखा दुपारचा चहा जमत नाही, ही कुरकुरहि नको. तुम्हीच घ्या करून चहा आपल्या हातानं."

मला मनापासून हसू आलं. तिला स्वयंपाकघरात आणीत अन् स्टोव्हजवळ बसवून चहाचं सारं साहित्य तिच्या पुढ्यात ठेवीत मी म्हटलं, "ते काही नाही. तूच कर चहा. दोन्ही वेळचा चहा इतका फक्कड करतेस तू. आजपासून सकाळच्या अन् दुपारच्या चहात फरक नसतो असं मानायचं ठरविलंय मी!"

★ ★

# लाखांच्या नोटा ▲▲▲ : ८ :

केवळ त्या एका गोष्टीसाठी वर्षातून दोन चारदा तरी माझा अन् माझ्या पत्नीचा खटका उडतोच आणि प्रत्येक वेळी तो इतकं उग्र रूप धारण करतो की शेजारच्या अन् आसपासच्या लोकांची खात्री होते की आज हे (म्हणजे आम्ही दोघं) निश्चित् घटस्फोट घेणार. अर्थात् तसं काही अजून घडलेलं नाही. (कुणाजवळ बोलणार नसाल तर एक खास गुपित सांगू ? ह्या आयुष्यात चुकूनहि आमच्यापैकी कोणी त्याची अंमलबजावणी करणार नाही) परंतु चारचौघात तसं वाटावं इतक्या उघडपणे आम्ही त्या शब्दाचा उच्चार करतो. तो न करणं आमच्या हातात नसतं. कारण आम्ही दोघं प्रत्येकाचं म्हणणं खरं कसं हे ठरविण्याचा अन् पटवून देण्याचा यत्न करीत असतो. आश्चर्य असं की जवळजवळ एक तप उलटत आलं आहे; परंतु हे वादळ काही संपत नाही.

ह्या वादळाला सुरुवात होते कुठून तर एका लोखंडी पेटीवरून ! त्या पेटीत आम्ही पुष्कळ वस्तु ठेवल्या आहेत. जरीची पंधरा-वीस पातळं, त्याशिवाय रंगसंगतीच्या दृष्टिकोनातून साजऱ्या ठरलेल्या मुलायम बहुरंगी साड्या, त्यांच्या दीडपट पोलकी, निमपट साटीनचे पेटीकोट – हे झालं पत्नीचं धन. माझ्या वुलनच्या पँटस् अन् जुने तीन कोट, सातआठ चांदीची ताटं अन् ह्या ताटांच्या माहात्म्यात भर घालणारे चांदीचे पेले, वाट्या, तांब्े आणि चमचे. एवढ्यानं जशी पेटीतील बहुतेक जागा व्यापली जाते, त्याचप्रमाणे जी थोडीफार जागा राहते त्यात मी माझा एक छोटासा खोका ठेवला आहे.

दरवर्षी कधी लग्नप्रसंगाच्या निमित्तानं, तर कधी वाढदिवसासाठी, कधी दूरच्या प्रवासाची तयारी करण्यासाठी म्हणून, तर केव्हा कपड्यांना

ऊन दाखविण्यासाठी म्हणून ती पेटी उघडली जाते. सगळ्या वस्तूंना मोकळं आकाश, मोकळी हवा भरपूर उपभोगायला मिळते न मिळते तोच पुन्हा ती पेटी भरायला सुरुवात होते. त्याच त्या साड्यांचं कौतुक करण्यात, त्यातल्या काहींना अंगावर घेऊन गोंजारण्यात पत्नी अगदी गुंगून जाते. उलट मी तो पुठ्ठ्याचा छोटासा खोका पुढ्यात घेऊन बसतो अन् त्यातील एकेक निगेटिव्ह डोळ्यासमोर धरून बारकाईनं पाहतो. वरचेवर हूं हूं करून पत्नीच्या कौतुकात सहभागी असल्याचं भासवितो.

परंतु हे सारं नाटक असतं. फोटोग्राफीची जशी मला आवड आहे, त्याचप्रमाणे जपून ठेवलेल्या निगेटिव्हज् अधूनमधून पाहत स्वतःला विसरून जायचं, हा एक छंद आहे. त्या छंदानं मी केवळ त्या वेळेपुरता आनंदी होतो असं नव्हे, तर जी निगेटिव्ह माझ्या डोळ्यासमोर असते तिच्यातील काळंपांढरं विश्व मला त्या भूमीत घेऊन जातं. मग मला त्या स्थलभेटीचा पुनःप्रत्यय तर मिळतोच पण सहप्रत्ययसुद्धा.

कारवारच्या सागरदर्शनाची निगेटिव्ह समोर धरताच माझं मन विलक्षण उचंबळून येतं. सागराच्या मस्त आणि धुंद लाटा अज्ञात ओढीनं वेडावून जाऊन जेव्हा किनाऱ्याकडे झेप घेतात, तेव्हा मला त्या साऱ्या दुधी लाटांना उराशी घट्ट धरावंसं वाटतं. त्यांच्यावरून हात फिरवावासा वाटतो. त्यांची चुंबनं घ्यावीशी वाटतात. वास्तविक मानवी जीवनाचं प्रतीक असलेला सागर, पण भरतीच्या लाटांनी तो माणसाला सदैव चैतन्य-सागराचं दर्शन घडवितो. इथंच त्याचं कार्य थांबत नाही तर चांदण्या-रात्री अन् विशेषतः पूर्णिमेला तो प्रीतीच्या आविष्काराची रूपं दाखवितो.

किती गुणगान करावं या सागराचं ! पित्याचं विशाल अंतःकरण, आईचं वात्सल्य, प्रियतमेची अवीट प्रीति, पत्नीची जगावेगळी ओढ, विराणीचे जड निश्वास, बालकाचं हास्य, महात्म्याचा संदेश आणि योगी पुरुषांची समाधि अशी अनेक रूपं मला ह्या सागरदर्शनात आढळतात. जड अंतःकरणानं ती निगेटिव्ह खाली ठेवून दुसरी डोळ्यासमोर धरतो तोच हरिद्वार लक्ष्मणझुल्याजवळील निसर्ग मला साद घालतो.

हर की पेडीवरून समोर नजर टाकताच हिमालयाच्या कुशीतील पर्णराजी जशी देहभान विसरायला लावते, तशीच दूरवर असलेल्या अन्

आकाशमाथ्याला हात लावायचा हट्ट धरलेल्या हिमशिखरांकडे पाहून वाटतं, ' माणसाला पंख असते तर –'

–तर हिमशिखरावर बसून सूर्यस्नानाची आगळी मजा लुटायला मिळाली असती. हर की पेडीवरून खाली नजर टाकावी तर हिमालयाच्या अंगाखांद्यावर मनसोक्त खेळून तृप्त झालेल्या, त्याच्या प्रेमानं पावन झालेल्या अन् आता सागराच्या कुशीत तोंड लपवायला अधीर झालेल्या गंगेचा खळ्खळ् प्रवाह माणसाला स्नान करायला अधीर बनवतो. त्या प्रवाहात पावलं टाकताच देहाचा बर्फ तर होणार नाही ना अशी शंका मनाला पुरेपूर चाटून जाण्यापूर्वीच माणूस त्या हिमजलप्रवाहात स्वतःला झोकून देतो आणि मग बाहेर आल्यावर त्याला जी आगळी ऊब मिळते, तिचा अमाप आनंद लुटत असता तो स्वतःला सांगतो – ' जगन्मातेची ऊब म्हणतात ती हीच का ?'

या तृप्तीत दहा बारा मैलांचं अंतर कापून लक्ष्मणझुल्याजवळ तो केव्हा येऊन पोहोचतो हे त्याचं त्यालाच कळत नाही. पण झुलत्या पुलाच्या मध्यभागी येताच त्याची पावलं पुढं जायला तयार नसतात. समोर उंचच उंच, हिरव्यागार अन् गगनचुंबी वृक्षांनी भरलेली पर्वतमाला, पैलतीरावर संत, योगी, तपस्वी अन् तत्त्वज्ञ यांना आवाहन करणारा स्वर्गाश्रम आणि त्या झुलत्या पुलाच्या तीन चारशे फूट खोल अंतरावर हिरव्यानिळ्या पाण्यानं दुथडी वाहणारी अथांग गंगा व तिच्या प्रवाहातून इकडून तिकडे जाणाऱ्या नावा – सारं दृश्य कसं काव्यमय !

अजून न लिहिलेली अन् पुढे केव्हा लिहून होईल हे आता न सांगता येणाऱ्या कादंबरीची अखेरी मला लक्ष्मणझुल्याच्या मध्यभागी सुचली व ' प्रदक्षिणा ' शीर्षकहि ओठावर प्रथम आलं. प्रदक्षिणा हाच माणसाच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. अनेक ऋतु, अनेक पावसाळे तो बघतो. त्यातून निर्माण होणाऱ्या अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीला तो पुरून उरतो. ह्याचं कारण धीरोदात्त वृत्ति, हिंमत, सहनशीलता हे वरपांगी दिसणारे गुण असले तरी खरं कारण त्याचं मन अनाकलनीय प्राप्तीभोवती प्रदक्षिणा घालीत असतं. ह्या प्रदक्षिणाच त्याला जगायला शिकवतात.

अनुक्रम क्रमांक दि. नों. दि.

इतकी वर्षं झाली तरी न लिहिलेल्या कादंबरीबद्दल मला ना खेद होतो ना खंत. लक्ष्मणझुल्याची ही निगेटिव्ह मला त्या कादंबरीलेखनाचा अमाप आनंद बहाल करते. या आनंदाच्या बेहोषीत अचानक माऊंट अबूच्या ' सनसेट पॉइंट 'ची निगेटिव्ह माझ्या हाती येते, अन् मग माझं मस्तक झुकतं ते निसर्गाच्या जादुगिरीकडे पाहून.

नाना देशातील नाना लोक माऊंट अबूला भेट देतात आणि जगप्रसिद्ध संगमरवरी दिलवाडा मंदिराचं कोरीव काम पाहून जसे थक्क होतात, तसंच त्या सनसेट पॉइंटवर येऊन रमणीय सूर्यास्त पाहून धन्य झाल्याचा आनंद लुटतात.

मी ज्यावेळी त्या सनसेट पाइंटवर येऊन पोहोचलो तेव्हा रविराज मावळतीच्या क्षितिजावर क्षणभर थांबले होते. त्यांना निरोप देण्यासाठी अनेक ढग नटूनथटून आले होते. कुणी हिरवे-पोपटी मखमली अंगरखे घातले होते, तर काहींच्या कुडत्याला सोनेरी किनार कमालीची शोभून दिसत होती. केशरी, गुलाबी वस्त्रांच्या झिरझिरीत पायघड्या जिकडे तिकडे पसरल्या होत्या. त्याचप्रमाणे ठायी ठायी जांभळ्या, पिवळ्या, लाल रंगाच्या कमानी बांधून तयार झाल्या होत्या. पाचदहा फुटावर असलेली खोल दरी धुक्यानं तुडुंब भरली होती आणि ते धुकं वाऱ्याच्या झोतानं अस्ताव्यस्त होत होतं. सायंप्रार्थनेनंतर जाळलेला धूपच जणू आस्ते आस्ते वर येत होता. नवरंगात बुडालेल्या क्षितिजाखाली रविराज गेले असं पाहून मी तिथून परतणार तो काय आश्चर्य ?

लालबुंद चेंडू एखाद्या बालकानं जमिनीवर आपटावा अन् तो क्षणभर वर उधळला जावा तसा सूर्याचा लाल गोळा अचानक वर आला. क्षणार्धात साऱ्या ढगांच्या गालांवर लाली चढली. ते हसले. त्यांच्या हास्यात हास्य मिसळत असताना डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच पुन्हा रविराजाची मूर्ति नाहीशी झाली.

मनाला रिझविणाऱ्या अशा किती तरी निगेटिव्हज् माझ्या संग्रही आहेत.

यमुनेच्या तीरावर दशकानुदशके उभा असणारा आणि तिला पावन करणारा, सूर्यास्ताच्या वेळी टिपून घेतलेला ताजमहाल मला प्रिय आहे.

कोजागिरीच्या चांदण्या रात्री आणि सूर्य माथ्यावर येऊन विसावला असता पाहिलेला ताजमहाल मला अजूनहि निगेटिव्हमुळे प्रत्यक्ष भेटीइतकाच आनंद देतो.

प्रयागच्या त्रिवेणी संगमाची, एलिफंटा लेण्यातील त्रैमूर्तीची, वेरूळच्या लेण्यांची व पुरातन घृष्णेश्वर मंदिराची – अशा संस्मरणीय स्थलांच्या निगेटिव्हज्‌वरून माझी नजर धावत असता पत्नीच्या शब्दांकडे माझं लक्ष राहत नाही. हूं..हूं करणंहि आपोआप बंद होतं. त्यामुळे ती चिडते अन् मग खटक्याला सुरुवात होते.

"ती म्हणते, आणखी किती वर्षं जपून ठेवणार आहात ही काळी कपटं ?"

"काळी कपटं ? अग लाखांच्या नोटा आहेत या. समजलीस ?"

"पुरे पुरे ! फेकून द्या त्या. निष्कारण अडचण मेली पेटीत. द्या इकडे. मीच काडी लावते त्यांना."

मग माझा संताप अनावर होतो अन् म्हणतो,

"माझ्या लाखांच्या नोटांना काडी लावणारी तू कोण ? वेळ आली तर फेकून देईन तुझ्या ह्या साड्या..ही पोलकी.."

माणसाच्या वाट्याला सुखाचे क्षण आधी येतातच किती ? फार थोडे ? मग त्यांच्या पुनरावृत्तीची तर गोष्टच नको. अशा वेळी शाश्वत आनंद देणाऱ्या ह्या निगेटिव्हज् लाखांच्या नोटासमान वाटणं स्वाभाविक नाही का ? जीवनानंदाचा फार मोठा पुनःप्रत्यय व सहप्रत्यय यातून मिळतो. त्यात रतिभरहि फरक पडत नाही. ज्या क्षणांनी मला धरतीवरल्या त्रिविध स्थळांच्या सौंदर्याचा आनंद कोणे एके काळी मनसोक्त लुटू दिला, त्याची पुनरावृत्ति करणाऱ्या ह्या निगेटिव्हज् – लाखांच्या नोटा – माझ्या जीव की प्यार आहेत. त्यांना डोळ्यासमोर धरतच त्या त्या स्थळाभोवती माझं मन प्रदक्षिणा घालू लागतं.

★ ★

# रंगीत कपडे–रंगीत माणसं ▲ ▲ ▲ : ९ :

**अकारण** घडणाऱ्या संभाषणातूनहि कधी कधी असे उद्गार बाहेर पडतात की आपण त्याला वायफळ बड-बड म्हणणं मिथ्या वाटतं. उलट यातूनच कधी अण्वस्त्र शक्तीचं मूर्तिमंत रूप पाह्यला मिळतं, तर काही वेळा सत्य धरतीवर साकार झाल्याचं आढळून येतं. फार काय, विविध फुलांचे गंधहि मुलायम सौंदर्याच्या मुशीतून सरूप बाहेर पडून डोळयांचं पारणं अखंड फिटतंय असं वाटू लागतं.

माझ्या बाबतीत काल सकाळी असाच प्रकार घडला. आजच्या यंत्रयुगानं सकाळच्या सोनेरी किरणांचा, तरल उत्साही वातावरणाचा, फुलांप्रमाणे उमलणाऱ्या मनांचा आणि भावनांचा चुराडा करून त्यांना घाण्याचं बैल बनविलं आहे. सकाळ झाली, डोळे उघडले अन् प्रकाशाचं दर्शन घडलं की सूर्याला, झाडांच्या शेंड्यांना, पक्षांच्या किलकिलाटाला पाहून माणसानं सुखाचा निश्वास टाकण्याऐवजी बघायचं कुठं तर घड्याळा-कडे. एक लांब आणि दुसरा आखूड हात असलेल्या मुक्या सैतानाकडे ! आणि पुटपुटायचं काय तर... ‘बापरे, साडे सात ? अगऽऽ, चहा झाला का ? झाला असेल तर कुकर लाव हं ! आणि आंघोळीचं पाणी गरम केलंस ?”

नव्या युगाच्या नव्या गीतेचा एकोणविसावा अध्याय म्हणतात तो हा ! त्याचा मी एक उपासक असणं अपरिहार्य नाही का ? त्या अध्या-याचं पारायण म्हणून मी विहिरीचं पाणी भरीत होतो. शेजारच्या आजी जवळच डबे घाशीत होत्या. वास्तविक त्यांच्याशी बोलायला मला वेळ नव्हता, तसं काही प्रयोजनहि नव्हतं. रहाटानं बादल्यामागून बादल्या पाणी काढायचं अन् घरातल्या बंबात–भांड्यात भरारा टाकायचं. त्यामुळे

मला धाप लागली होती. दोनचार वाक्यं एका दमात बोलणं सुतराम् शक्य नव्हतं. आजी डालडाचा दहा पौंडी रिकामा डबा घाशीत होत्या. त्यांचे हात भरून आले होते अन् त्या क्षणभर विसावल्या होत्या. ते पाहून माझ्या तोंडून नकळत उद्‌गार बाहेर पडला,

"आजी, ह्या डब्यांना रंग का देत नाही हो ?"

आजी नुसत्या हसल्या.

मी पुन्हा म्हटलं, "डब्यांना रंग दिले की मोठे छान दिसतात. द्यायचा का रंग ? मी करीन मदत तुम्हाला."

आजींचं हास्य निवळलं आणि त्या म्हणाल्या,

"किती हो हौस आहे तुम्हाला ? रंगीत डबे खरंच का छान दिसतील ?"

"नक्कीच ! अहो, रंगीत पातळं, रंगीत कपडे बायका वापरतात म्हणूनच छान दिसतात त्या. गुणांची उणीव रंगानं भरून काढणं फार सोपं जातं त्यांना. खुलून दिसतो की नाही त्यांना कोणताहि रंग ? विविध रंग वापरण्याच्या बाबतीत भाग्यवान् फक्त दोनच. एक रिकामे डबे आणि दुसऱ्या स्त्रिया. आम्ही माणसं मात्र असेच..."

अकारण घडलेलं संभाषण जसं अचानक सुरू झालं, तसंच ते संपलं. आजी आपल्या घरात गेल्या, कामाला लागल्या. माझं पाणी भरून झालं, स्नान झालं आणि गणपतीला अभिषेक करू लागलो. नेहमीप्रमाणे म्हटलं जाणारं गणपति अथर्वशीर्ष काही केल्या स्वच्छ स्वरात बाहेर पडेना. पदोपदी मी अडखळू लागलो; विसरू लागलो.

माझ्या मनातला विचार मला सांगू लागला, '... खोटं बोललास तू मघा आजींशी ! डबे रंगीत करता येतात. बायकांना रंगीत कपडे वापरता येतात, हे जसं खरं तसंच तुम्ही पुरुषहि रंगीत कपडे वापरता. रंगीत कपडे वापरण्याच्या बाबतीत तुम्ही पुरुष तर रिकाम्या डब्यांवर अन् स्त्रियांवरहि ताण मारता..'

रंगीत कपडे—रंगीत माणसं.

जन्माला आलेला प्रत्येक जीव – मग तो प्रासादात जन्माला आलेला असेल, नाहीतर घनदाट अरण्यातील प्रचंड वृक्षच्छायेखाली. जन्मल्यावर चांदीचा चमचा सदैव मुखी राहण्याचं भाग्य त्याला प्राप्त झालं असेल, नाहीतर ससेहोलपटीची भयंकर शिक्षा चित्रगुप्तानं त्याच्या ललाटी कोरली असेल – असं काहीहि असलं तरी तो मूलतः निष्पाप असतो, निरागस असतो. त्याच्या बालबोध, किलकिल्या नजरेला सारंच काही अस्पष्ट, अबोध आणि अथांग असतं. ज्ञानाची, दृष्टीची क्षितिजं त्याच्या देहापलीकडे मुळीच पसरलेली नसतात. राग, लोभ, मोह, मद, मत्सर, दंभांचे निवडुंग त्याच्या सभोवताली उगवायला धजलेले नसतात.

याचा अर्थ असा की तो धवलरंगी असतो. 'सत्यं' च्या धरतीनं त्याला पोटाशी घेतलेलं असतं. 'शिवं' च्या वस्त्रानं ऊन-वारा-पावसा-पासून त्याचं रक्षण करण्याचं ठरविलेलं असतं. आपल्याच दुधावर त्यानं बाळसं धरावं, गुटगुटीत दिसावं, साऱ्या जगाचं लक्ष वेधून घ्यावं अशी 'सुन्दरं' ची प्रामाणिक एकमेव इच्छा असते.

ह्या एक ना अनेक जीवनसत्त्वांवर पोसला जाणारा मानव जसजसा आपल्या जीवनग्रंथाची पानं उलटवू लागतो, अनिमिष नेत्रांनी सभोवतालच्या जगाकडे पाहू लागतो, अन् कधी ओठावरून जीभ फिरवीत तर कधी दातांखाली ओठ दाबत पुटपुटायला लागतो, तेव्हा धवलरंगाला न कळत गचांडी मिळते अन् त्याची जागा घेतात विविध रंग !

वाढत्या वयाबरोबर त्याच्या आवडी बदलतात, त्याचबरोबर रंगहि बदलले जातात आणि एक दिवस तो स्वतः जगाला विश्वासानं, अधिकार-वाणीनं नि काहीशा अहंकारानं सांगायला सुरुवात करतो, 'जीवन हे रंगवायचं असतं.'

दैवदुर्विलास म्हणतात तो असा की माणूस ह्या वाणीला आता अलिखित घटना मानू लागला आहे आणि ह्या आधाराचा प्रतोद हवेत वरचेवर वाजवीत त्यानं आयुष्यरथाला चौखूर उधळण्यासाठी दशदिशा मोकळ्या करून दिल्या आहेत. म्हणूनच खेडोखेडी, गावोगावी फार, काय रस्तोरस्ती रंगीत कपड्यातील रंगीत माणसांची खैरात झाली आहे. प्रेमाची

गुलाबी कोडी सोडविणारी माणसं जशी या यात्रेत मिसळली आहेत, तशीच ध्येययज्ञाची अखंड पूजा करणारीहि. काळवेळ पाहून मंत्रतंत्र बदलणारे किती तरी पुरोहित आहेत. असूयेच्या कावीळीनं पछाडलेली अन् सारं जग पिवळं आहे, असं म्हणणारी काही माणसं जशी रस्त्याच्या कडेला उभी आहेत, तशीच सूडानं भारावून जाऊन स्वार्थाच्या कटात मग्न झालेलीहि अगणित आहेत.

घोटाळा म्हणा किंवा दुर्दैव समजा ह्याला, पण ह्या जनसागरातल्या जलबिंदूंना कळत नाही फक्त एकच आणि ते म्हणजे आपल्याला कोणता रंग खलून दिसतो ते !

★ ★

## येरे येरे पावसा ▲▲▲ : १० :

दिलीपला असं सांगण्यात, मी कुठे चुकलो हे अजून मला मला कळत नाही. परंतु माझ्या पत्नीला ते रुचलं नाही एवढं खरं ! ती रागानं म्हणाली, " मुलांना भलतंच काय शिकवायचं ? सारी मुलं पावसात धावू लागली, नाचू लागली म्हणून आपल्याहि मुलाला तसं नाचायला सांगायचं का ? सर्दी खोकला झाला म्हणजे ? वाटलं तर तुम्हीच जा पावसात बागडायला."

तिच्या शब्दांनी राग येण्याऐवजी मला हसू आलं.

हसू नको तर काय करू ?

खरंच, वनस्पतिशास्त्र अन् मानसशास्त्र यात कितीहि अंतर असलं तरी एका गोष्टीत मात्र साम्य आहे ते हे की माणसांची मनं ही अनियमित वाढणाऱ्या फांद्यांसारखी असतात. एकाची आवड दुसऱ्याशी तंतोतंत जुळेल असं मुळीच नाही. चैत्रपालवीच्या दर्शनानं नववर्षाची सुरुवात काहीना भासतच नाही. पण सणांचा धुमधडाका सुरू झाला म्हणजे ते म्हणतात, ' हां, झाली नववर्षाला सुरुवात '.

मलादेखील अस्संच वाटतं, पण थोडं निराळं. सणांच्या आगमनानं मला नववर्षाला सुरुवात झाल्यासारखं वाटत नाही. कारण वैशाखाच्या तीव्र उन्हानं शरीर असं काही भाजून निघालेलं असतं अन् जीव असा काही कासावीस झालेला असतो की चैत्रपालवीचा मला फारसा आनंद होत नाही. पण मृगाच्या आगमनाची टिपरी पडघमवर पडली अन् तिचा नादनिनाद दशदिशातून घुमू लागला म्हणजे अचानक सुखानं जसं हृदय भरून जातं ना, तसंच माझ्या मनाला त्या आवाजानं विरंगुळा वाटतो. 'आषाढस्य प्रथम दिवसे...' हा कालिदासाच्या मेघदूतातील श्लोक ओठांवर खेळू लागतो.

गुलाबी कोडी सोडविणारी माणसं जशी या यात्रेत मिसळली आहेत, तशीच ध्येययज्ञाची अखंड पूजा करणारीहि. काळवेळ पाहून मंत्रतंत्र बदलणारे किती तरी पुरोहित आहेत. असूयेच्या कावीळीनं पछाडलेली अन् सारं जग पिवळं आहे, असं म्हणणारी काही माणसं जशी रस्त्याच्या कडेला उभी आहेत, तशीच सूडानं भारावून जाऊन स्वार्थाच्या कटात मग्न झालेलीहि अगणित आहेत.

घोटाळा म्हणा किंवा दुर्दैव समजा ह्याला, पण ह्या जनसागरातल्या जलबिंदूंना कळत नाही फक्त एकच आणि ते म्हणजे आपल्याला कोणता रंग खलून दिसतो ते !

★ ★

## येरे येरे पावसा ▲▲▲ : १० :

दिलीपला असं सांगण्यात, मी कुठे चुकलो हे अजून मला मला कळत नाही. परंतु माझ्या पत्नीला ते रुचलं नाही एवढं खरं ! ती रागानं म्हणाली, "मुलांना भलतंच काय शिकवायचं ? सारी मुलं पावसात धावू लागली, नाचू लागली म्हणून आपल्याहि मुलाला तसं नाचायला सांगायचं का ? सर्दी खोकला झाला म्हणजे ? वाटलं तर तुम्हीच जा पावसात बागडायला."

तिच्या शब्दांनी राग येण्याऐवजी मला हसू आलं.

हसू नको तर काय करू ?

खरंच, वनस्पतिशास्त्र अन् मानसशास्त्र यात कितीहि अंतर असलं तरी एका गोष्टीत मात्र साम्य आहे ते हे की माणसांची मनं ही अनियमित वाढणाऱ्या फांद्यांसारखी असतात. एकाची आवड दुसऱ्याशी तंतोतंत जुळेल असं मुळीच नाही. चैत्रपालवीच्या दर्शनानं नववर्षाची सुरुवात काहींना भासतच नाही. पण सणांचा धुमधडाका सुरू झाला म्हणजे ते म्हणतात, 'हां, झाली नववर्षाला सुरुवात'.

मलादेखील अस्संच वाटतं, पण थोडं निराळं. सणांच्या आगमनानं मला नववर्षाला सुरुवात झाल्यासारखं वाटत नाही. कारण वैशाखाच्या तीव्र उन्हानं शरीर असं काही भाजून निघालेलं असतं अन् जीव असा काही कासावीस झालेला असतो की चैत्रपालवीचा मला फारसा आनंद होत नाही. पण मृगाच्या आगमनाची टिपरी पडघमवर पडली अन् तिचा नादनिनाद दशदिशातून घुमू लागला म्हणजे अचानक सुखानं जसं हृदय भरून जातं ना, तसंच माझ्या मनाला त्या आवाजानं विरंगुळा वाटतो. 'आषाढस्य प्रथम दिवसे...' हा कालिदासाच्या मेघदूतातील श्लोक ओठांवर खेळू लागतो.

बाहेर आकाश ढगांनी खच्चून भरलेलं आहे, थंड वारा बेछूटपणे घोंगावतो आहे, मेघांच्या गडगडाटांनी साऱ्यांची धावपळ शिगेला पोचते न पोचते तोच सरीवर सरी कोसळायला लागल्या आहेत. पन्हाळच्यात दाटलेलं पाणी मस्त धबधब्याप्रमाणे खाली उडी घेत आहे, रस्त्यावर पाणीच पाणी होऊन त्यानं तलावाचं नाहीतर ओढ्याचं रूप धारण केलं आहे आणि पाच-सात पोरं बिनधोकपणे पाण्यातून धावत आहेत, उड्या मारीत आहेत, ओरडत आहेत – असं दृश्य पाहिलं म्हणजे मला माझ्या वयाचा विसर पडतो, अन् 'येरे येरे पावसा, तुला देतो पैसाऽऽ पैसा पडला खोऽऽटा, पाऊस आला मोऽऽठ्ठाऽऽऽ' असं म्हणावंसं वाटतं.

अशा पावसात खेळताना आणि चिंब भिजताना मुलाना जेवढा आनंद होतो, तितकाच किंबहुना त्यापेक्षाहि अधिक त्या मुलांकडे पाहणाऱ्या मोठ्या माणसांना होतो; म्हणून तर मी माझ्या दिलीपला पावसात खेळण्याची परवानगी दिली. परंतु पत्नीचा आणि माझा मतभेद झाला अन् तीच म्हणाली, "वाटलं तर तुम्हीच जा पावसात बागडायला."

पत्नीच्या रागाची पार्श्वभूमि सोडली तर तिच्या शब्दात पुष्कळ सत्य आहे. चिमुरड्यांच्या खेळात, गमतीत जेव्हा मोठ्या माणसांचं मन रमतं अन् ते त्यांना प्रोत्साहन देतात, तेव्हा त्यांचं मन आतून त्याना खेळात नि गंमतीत भाग घ्यायला सांगत असतं, परंतु दुसरं मन लगेच वयाची, सभ्यतेची, बंधनाची नि जनलज्जेची जाणीव करून देतं. त्या जाणीवेचा अंमल चढू लागला म्हणजे मनाची वंचना करीत आपण मुलांना प्रोत्साहन देतो.

आत्ताच पहा ना. बाहेर कोसळणाऱ्या पावसात बागडणारी मुलं पाहून, त्यांचा आनंद आणि नृत्य पाहून माझं मन हर्षलं. दिलीपला खेळायला जा म्हणून सांगितलं म्हणजे एकपरीनं मलाच पावसात खेळायला जायची इच्छा अनावर झाली, त्यांच्यासारखं 'येरे येरे पावसा' हे पर्जन्यगीत म्हणण्याची लहर आली, असंच नाही का म्हणता येणार ?

धो धो कोसळणारा पाऊस पाहून कुणालाहि आपल्या बाल्यकाळाची आठवण झाल्याविना राहणार नाही. मग मी अपवाद कसा असेन ? निसर्गाच्या विशालतेत मानवी मनाची निरागसता ठायी ठायी विखुरलेली

असते, हेच खरं. झुळझुळ वाहणारी नदी आणि राक्षसी लाटांनी थैमान घालणारा सागर, ही जशी मनुष्य-स्वभावाची दोन चित्रं, तसंच सरींवर सरी उधळणारा पाऊस म्हणजे निष्पाप बालजीवांचं एक सहजसुंदर प्रतिबिंबच. म्हणूनच मोठ्या माणसांना पावसाकडे पाहून बालपणची आठवण होते. मुलांनी ‘ येरे येरे पावसा ’ म्हणायला सुरुवात करताच त्यात ते समरस होतात.

बालपणी मी ह्या पावसाची किती उत्सुकतेनं वाट पाहत असे. निळंनिळं आकाश काळयाकुट्ट, आक्राळविक्राळ ढगांनी भरून आलं, गडगडाट सुरू झाला, सौदामिनीच्या नर्तनाला सुरुवात झाली की मी बेभान होत असे. आईवडिलांच्या हातावर तुरी देऊन पावसात मनसोक्त हुंदडत असे. शाळेत गेल्यावर माझ्या या आवडीला निराळं वळण लागलं. परंतु ते यापेक्षाहि हृदयंगम होतं.

दुपारी अडीचला मधली सुटी होत असे. अशा वेळी अचानक आकाशात मेघांची दाटी होऊ लागे. विजा क्षणात मुरकून जात. जलधारा धरतीला बिलगू लागत. भिजण्याच्या भीतीनं मुलं शाळेच्या व्हरांड्यात थांबून राहत, त्यांचं हें थांबणं मला अजिबात आवडत नसे. पुस्तकं सदऱ्याखाली बगलेत लपवून मी तशा मुसळधार पावसात घरी जायला निघे.

वरून पावसाची वृष्टि चालू असायची, रस्त्यात ठिकठिकाणी डबकी साचलेली असायची, झाडांच्या पानांवर क्षणभर विसावलेले जलबिंदू टप्टप् खाली पडत. रस्त्यावर रहदारी बंद झालेली असायची. अशा वेळी रस्त्यातून जातांना मला केवढा आनंद होत असे. चिंब झालेले कपडे अंगाला चिपकलेले असत, हुडहुडीनं अंग कापू लागायचं. परंतु त्याहि स्थितीत पन्हाळ्यातून वाहणाऱ्या पाण्याखालनं मी जात असे. रस्त्याच्या कडेला थांबलेले लोक, खिडक्या दारातून डोकावणाऱ्या व्यक्तींना पाहून मला अधिकच स्फुरण येई.

अशा वेषात अस्मादिक घरात प्रवेश करताच आई सामोरी येई अन् चटकन् केस पुसत ती म्हणायची, “ अरे, एवढ्या पावसांतून यायचं काही अडलं होतं का ? थांबला असतास थोडा वेळ... निदान छत्रीतनं तरी यायचं कुणाच्या. ”

परंतु छत्री म्हटलं की मला चीड यायची पाऊस आणि छत्री म्हणजे दूध अन् मीठ यांचं मिश्रण नाही तर काय ? पावसाळ्यात जे छत्री वापरतात त्यांच्यासारखे अर्धवट × × तेच; असं म्हणायला काय हरकत आहे ? कारण धड ते पावसाचाहि आनंद उपभोगू शकत नाहीत की शरीर नखशिखान्त कोरडं ठेवू शकत नाहीत. डोक्यापासून कमरेपर्यंतचा भाग कोरडा ठेवण्याची धडपड करताना त्यांची कोण त्रेधा उडते. पण कमरेखालचा भाग ओला व्हायचा तो होतोच. या असल्या अर्धवट फजिती-पेक्षा ओलाचिंब होणाऱ्याला मी रसिक म्हणेन.

थरथर कापत आईला हे तत्त्वज्ञान समजावून सांगत असताना तिचं मात्र अजिबात लक्ष नसे. ती गरम चहा करून द्यायची अन् अंगावर पांघरुण घालून सक्तीनं झोपायला लावायची. गादीतले ते क्षण तर मला परमोच्च सुखाचे वाटायचे. बाहेर पाऊस पडत आहे, घरातील अंथरुणात दडी मारून कादंबरी वाचन अस्मादिकांचं चाललं आहे. बाळपणात मी या पावसाचे किती आभार मानले असतील !

तेच सुख आता या वयात लुटायचं म्हटलं तर...? तर...काय ?

लोक फिदीफिदी हंसतील. नवऱ्याला वेड लागलंय, असं म्हणायला बायकोसुद्धा कमी करणार नाही.

माणूस हा जसा सवयीचा गुलाम असतो, तसाच तो नैतिक बंधनांचा, सभ्यतेचा आणि जनलज्जेचा कैदी असतो. फाजील पोक्तपणा अन् सभ्य-तेच्या आहारी गेल्यानं त्याविरुद्ध वागण्याचं किंवा विचार करण्याचं धाडस त्याला होत नाही. किंबहुना ते त्याला कमीपणाचं वाटतं. यामुळेच खऱ्या सुखाची चव त्याला नीटशी चाखता येत नाही. एनकेन प्रकारेण ही एक वंचनाच म्हटली पाहिजे.

परंतु सभ्यतेची, नैतिक मर्यादेची, पोक्तपणाची अन् जनलज्जेची बंधनं सैल करणारा पाऊस हा एखाद्या सणासारखा मला वाटतो. होळीच्या-वेळी शंख करण्याची मुभा असताना किती सभ्य नि शिष्ट त्याचं अनुकरण करतात ? त्या मानानं पाऊस हाच सर्वांना बंधन सैल करण्याचं वातावरण निर्माण करतो.

माझ्या म्हणण्याची सत्यता पुण्या-मुंबई सारख्या शहरातल्या लोकाना अधिक पटेल. सकाळच्या सुमाराला आकाशात ढगाचा मागमूस आढळणार नाही. ऊन स्वच्छ पडलेलं दिसेल. अशावेळी नको ते छत्रीचं किंवा रेन-कोटचं ओझं म्हणून सगळे मोकळ्या हातानं कचेरीत येतात. परंतु कित्येक वेळा [चाराच्या सुमाराला चारहि बाजूंनी आकाशात ढग जमू लागतात, विजांचं तांडवनृत्य अन् मेघांचं मृदुंगवादन सुरू होतं, तुफानी झंझावातात पावसाला सुरुवात होते; नि मग ट्राम, बस, लोकल पकडायला आणि घर गांठायला सारेच उत्सुक झालेले असतात. वर्षा थांबेपर्यंत तिष्ठत राहणं त्यांना गैर वाटतं. त्यामुळे जनलज्जेची, सभ्यतेची पर्वा न करता तरुण-तरुणी पावसातनं घराला निघतात. साहेब आपल्या सुटाची पर्वा करीत नाही; स्त्रिया आपल्या आवडीच्या साडीचा विचार करीत नाहीत. जल-धारेतून उधळलेले मोती त्यांच्या केसांच्या बटात सामावलेले असतात. ते कपोलांवर हलकेच ओघळायला सुरुवात होते. ओलेतीची एक ना अनेक चित्रं अशा वेळी पाहायला मिळतात.

आपल्याला कोणी पाहतंय की नाही याचा चोरट्या नजरेनं मागोवा घेताना कित्येकांची दृष्टादृष्ट होते अन् मग सामुदायिक फजितीचा आनंद, समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विकसित झालेला दिसतो. हा खट्याळ पाऊसच रुबाबाची बंधनं सैल करीत नाही का ?

परंतु असं असूनहि वाढत्या वयांत, बालपणी पावसात हिंडून लुटलेलं सुख काही मिळत नाही. लहान मुलांप्रमाणे टाळ्या वाजवीत 'येरे येरे पावसा'चं गीत म्हणता येत नाही आणि गढूळ जलाशयात कागदाच्या होड्या सोडण्याचं धैर्यहि होत नाही.

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८०९३८ वि: निबंध
क्रमांक १६०४ नों: दि: २९।११४

# तिखट, मीठ अन् साखर ▲▲▲ : ११ :

त्या स्पर्धेच्या विषयाचं मला खरोखरच आश्चर्य वाटलं. मलाच काय, कुणालाहि नवल वाटावं असंच होतं तिच्यात. ती स्पर्धा मासिकानं जाहीर केली होती की साप्ताहिकानं हे जसं मला आता स्मरत नाही, तसंच तिला किती रुपयांची पारितोषिकं ठेवण्यात आली होती, हेहि आठवत नाही.

त्या दिवशी जेवण झालं आणि विडा चघळीत रेडीओवरलं सरल-संगीत ऐकत होतो. इतक्यात पदराला तोंड पुसत पत्नी बाहेर आली अन् टेबलावरील दैनिकं चाळू लागली. याचा अर्थ असा नव्हे की ती अग्रलेख वाचण्यात दंग झाली होती. जगात ज्या दोन गोष्टीत छत्तीसाचा आकडा दिसून येतो त्यात स्त्री अन् वृत्तपत्रातला अग्रलेख ह्यांच्यातील विळ्या-भोपळ्याचं सख्य यांचा समावेश होईल. स्त्रिया वृत्तपत्रातून काय वाचत असतील हे सांगायला म्हापणकर कशाला हवेत ? ते सांगणं काही फारसं कठीण नाही. कुणाची मुलगी लग्नापूर्वी पळाली, कोणत्या थिएटरात मराठी चित्रपट चालू आहे, नवीन पातळांचा जंगी स्टॉक कोणत्या दुकानात आहे अन् नवीन अलंकारांच्या किमतीत चढ उतार किती झाली आहे ह्या बातम्या स्त्रियांना अगदी ' सेन्सेशनल ' वाटतात.

रेडिओवर ज्योत्स्नाबाईंचं ' बोला ऽऽ, अमृत बोला ' हे गीत ऐन रंगात आलं असतांना पत्नीनं मला गदगदा हालवून वर्तमानपत्रातली एका स्पर्धेची बातमी वाचायला दिली. तिच्यांत म्हटलं होतं-- "... मराठी भाषेशी इतर भाषांचा संबंध येऊ लागल्यामुळे तिच्या शब्दभांडारात जशी भर पडत आहे, त्याचप्रमाणे वाक्प्रचारहि बदलत आहेत. ' गाव तिथं महारवाडा ' असं पूर्वी आपण म्हणत होतो. पण आता ' गांव तिथे निर्वा-सित ' म्हणतोच की नाही ? ऋषीचं कूळ अन् नदीचं मूळ शोधू नये '

तसंच 'पुढाऱ्यांच्या मालमत्तेचं मूळ उकरू नये' असंहि आपण म्हणू लागलोय. अशाच पद्धतीनं सुंदर वाक्प्रचार पाठविणाऱ्यांना बक्षिसं देण्यात येतील

मला वाटलं एवढं वाचल्यावर पत्नीचं समाधान होईल अन् मला गाणं ऐकायला मिळेल. पण झालं अगदी उलट. तिने रेडिओ बंद केला अन् स्वत: विचार करीत असता मलाहि विचार करायला भाग पाडलं. पाच सात क्षण घालविल्यानंतर मी तिला म्हटलं 'मुळावाचून झाड नसतं, पाण्याविना सागर नसतो, तसंच तिखट, मीठ अन् साखरेवाचून घर नसतं.

ते एकून माझ्या पत्नीला आनंद झाला. ती माझ्या लेखनाच्या खोलीत निघून गेली. मी पूर्ववत् रेडिओ चालू केला अन् 'अमृत बो ऽ ऽ ला' हे गीत ऐकू लागलो. पण का कुणास ठाऊक, माझं त्या गाण्याकडे अन् मधूर आवाजाकडे लक्ष लागेना. असं का व्हावं ? पत्नीनं नवा वाक्प्रचार विचारला, मी सांगितला. यात माझं काहीच चुकलं नव्हतं.

पण माणसाचं मन लहरी वाऱ्यासारखं असतं. तो वाहायला लागेल तर झुळझुळ अन् आल्हाददायक, नाही तर झंझावाताचं रूप धारण करील. मनाची हीच अवस्था असते. जीवनाचीहि पण तशीच. एक क्षणापूर्वी आवडलेली वस्तू अथवा कल्पना कालांतरानं मनातनं उतरून जाते. चंचलतेची जननी म्हणजे मन आणि मन म्हणजे जीवनाचं जुळं भावंड !

रेडिओवर चालू असलेल्या गीतात तरी काय म्हटलं होतं, '.... माणसाच्या आयुष्यात शुभसमय काही हरघडी निर्माण होत नाहीत. अन् झाले तरी त्याला अमृतमय बोलता येईलच, हे कसं सांगता येईल ? परंतु असं असूनहि माणसाला किती तरी वेळा सुखाचे क्षण जाणून बुजून निर्माण करावे लागतात. ते निर्माण झाले नाहीत तर त्याला तसे मानावे लागतात. नि मग त्याला दुसऱ्यासाठी अमृतमय बोलणं भाग पडतं.

ते अपरिहार्य आहे. कारण संसार काय किंवा जीवन काय हा दुःख आशा अन् समाधान या तीन अदृश्य गोष्टींनी खच्चून भरलेला आहे. दुःख

जास्त प्रमाणात साकार झालं की सुखाच्या शोधाच्या आमिषानं माणूस आशेचा आसरा घेतो. भोजनात भाजीतील तिखटानं तोंड भाजलं म्हणजे मिठाचा आधार घेतो ना, तस्सं !

एकाच्या घरात संसार चांदीचा असेल, दुसऱ्यानं तो स्टेनलेस स्टीलनं मांडला असेल, तिसरा त्या दोघांच्या मिश्रणातून जगत असेल. परंतु घरो-घर जशा मातीच्या चुली तस्संच घर तिथं तिखट, मीठ आणि साखर आलीच.

घराघरातून आढळणाऱ्या ह्या तीन वस्तू म्हणजे जगातली दुःखं, आशा, अन् समाधान यांची प्रतीकंच असाव्यात; असं नाही का म्हणता येणार ? कारण संसारात या तिघांपैकी एकाला वगळणं जसं अशक्य आहे, तसंच दुःख, आशा अन् समाधान यावाचून कुणाचंच जीवन रुळलेलं दिसणार नाही.

नित्याच्या जेवणात एखादा पदार्थ तिखट लागला की माणूस चट-कन् मिठाचा आधार घेतो, त्यामुळे भाजलेलं तोंड आस्ते आस्ते निवळतं. परंतु काही वेळा तिखट असं जहाल असतं की तिथं मिठाची मात्रा चालत नाही. अशा वेळी साखरेची फक्की मारण्याखेरीज गत्यंतर नसतं

पाकघरातील तिखट, मीठ अन् साखर हे जीवनातल्या दुःख, आशा नि समाधान यांचं प्रतिबिंब आहे असं माझ्या एका मित्राचं प्रामाणिक मत आहे. खरं म्हणजे तो असामान्य नट होणार होता. परंतु दैवानं त्याला मागे खेचून अंधारात नेलं अन् लाकडाच्या वखारीतल्या गल्ल्यावर बसवलं तेव्हापासून तो दुःखी आहे. आपली कला आता निस्तेज झालीय, असं तो मानतो. पण अधूनमधून होणाऱ्या नाटचप्रयोगात जेव्हा तो भूमिका करतो, त्या गाजतात, लोकांची मनं जिंकतात अन् अभिनंदनांचा वर्षाव होतो, तेव्हा त्याला आशा वाटते की आता आपला भाग्योदय होणार अन् या समाधानावरच आणि आशेवरच त्याचं वखारीतलं जीवन व संसारातील दिवस सुखाचे जातात. कधी मध्यरात्र तर केव्हा अस्फुट पहाट तर कधी माध्यान्ह – असं असतं त्याचं जगणं !

जीवन हे असंच असतं. निरनिराळ्या गोष्टींचं मिश्रण करण्यातच मानवाचं खरं कौशल्य आहे. तिखटाची दाहकता त्याला काही अपरिचित

नसते. उलट ती परिचित असते म्हणूनच तो मिठाला जवळ बाळगून असतो. संसारातल्या सौख्याची गुरुकिल्ली माणसाला अशाच रीतीनं हाती लागू शकेल. निराशा, दुःख हे टाळणं जरी त्याला अशक्य असलं तरीहि आशेच्या जोरावर त्याला पुष्कळ सुखी होता येईल. याहि पुढे जाऊन ज्याला समाधानाची संजीवनी सतत जवळ बाळगायला मिळते तोच खरा भाग्यवान.

पाकशास्त्राच्या किमयेत अन् जीवन जगण्याच्या कलेत हेच एक साम्य आहे !

एक महिन्यानंतर पत्नीनं एके दिवशी पेढ्यांची भरलेली बशी माझ्या हाती दिली. मी कारण विचारलं असता ती म्हणाली, "तुम्ही सुचविलेल्य 'तिखट, मीठ नि साखरेवाचून घर नसतं' या वाक्प्रचाराला पहिलं बक्षिस मिळालं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........

## मच्छरदाणी ▲▲▲ : १२ :

राजकीय क्षेत्रातील काही प्रश्न थोडया निराळया शब्दात संसारी जीवनात विचारले म्हणजे कसा गोधळ उडतो आणि त्याची उत्तरं देणं कसं कठीण जातं, याचा मासलेवाईक अनुभव मला काल आला. ' Desire me ' हा चित्रपट पाहून परत आल्यानंतर पत्नीनं बनविलेल्या कॉफीचा आनंद घेण्यात मग्न असताना तिनं मला विचारलं, " तुम्हाला एक विचारू ? "

मी मस्तक हलवून होकार दिला.

" शास्त्रीनंतर कोण हो ? या प्रश्नाचं उत्तर तुम्ही काय द्याल ? "

कॉफीचा कप खाली ठेवत मी म्हटलं, " मी काय खादीचे कपडे चढविलेला पांढरा बगळा आहे की दौरे काढून पैसा उकळणारा मंत्री ? आपल्याला नाही बुवा उत्तर सुचत. "

" बरं, राहिलं बाई ! मग दुसरा प्रश्न विचारते. त्याचं उत्तर मात्र निश्चित देता येईल ना ? " माझ्या नजरेला नजर देत ती काही क्षण थांबली अन् म्हणाली, " तुमच्या आयुष्यात पत्नीनंतर कोण ? "

पत्नीनंतर कोण ?

उन्हाळयात पूर्णपणे आटलेल्या नदीच्या वाळवंटातून जात असता एकाएकी महापुराचा लोंढा यावा अन् जीव वाचविण्यासाठी धावपळ करायलाहि उसंत मिळू नये, तशी माझी अवस्था झाली तो प्रश्न ऐकून ! अकारण माझ्या मनाची उलाघाल झाली. आजवर परस्परांशी एकनिष्ठ राहिल्याची तिला नि मला खात्री असूनहि मी काही क्षण गांगरलो. पत्नीकडे पाहण्याची हिंमत मला का झाली नाही कुणास ठाऊक ! कुठे तरी नजर वळवायची म्हणून मी पलंगाकडे पाहिलं. त्यावर असलेल्या गादीवर शुभ्र मुलायम चादर टाकलेली मला दिसत होती अन् वर बांधलेली दुधी रंगाची मच्छरदाणीसुद्धा !

त्या मच्छरदाणीकडे माझं लक्ष जाताच पत्नीच्या प्रश्नानं माझ्या मनात आकस्मिक निर्माण झालेला झंझावात क्षणार्धात थांबला. इतका वेळ झालेली अनाकलनीय अवस्था संपुष्टात आली अन् एकटक पत्नीकडे पाहत म्हटलं, “ हसणार नसशील तर सांगतो. माझ्या आयुष्यात पत्नीनंतर कोण असं विचारलंस ना ? सांगू ? मच्छरदाणी ! ! ”

त्या अनपेक्षित उत्तरानं तिला अनावर हसू लोटलं, ‘ हे काय उत्तर झालं ? ’ अशा अर्थानं तिनं मानेला हिसका दिला अन् म्हणाली, “ तुम्ही केवळ मलाच नव्हे तर स्वतःलाहि फसवीत अहात ! ”

इथेच आमचा संवाद संपला. मी मच्छरदाणीत शिरून गादीवर अंग टाकलं परंतु काही केल्या झोप येईना. गेली कित्येक वर्षं मच्छरदाणीत झोपायची सवय झाली असता चुकूनहि कधी मी मच्छरदाणीविषयी विचार केला नव्हता. आज मात्र ‘ केवळ मलाच नव्हे तर स्वतःलाहि फसवीत आहांत. ’ या आरोपानं तिचं माहात्म्य मला अनिवार वाटू लागलं.

अक्षरवाङ्मयात गणल्या गेलेल्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांपासून तर विपुल, शाश्वत, मौलिक विचार मांडलेल्या विवेकानंदांच्या साहित्याचा मागोवा घेतला असता अंतर्मुख होण्याचा संदेश जागोजागी आढळतो. हे विचार पुनः पुन्हा वाचणारे थोडेथोडके का वाचक आहेत ? तरीहि तो संदेश कृतीत उतरविणारे हाताच्या बोटाइतकेच सापडतील. आजच्या धावपळीच्या जगात माणसाला अंतर्मुख व्हायचं असेल तर मच्छरदाणीसारखं सोपं आणि अभिनव साधन नाही. आणि ते तरी किती कलात्मक आहे नाही ? बारीक बारीक जाळ्यातून जगाच्या साऱ्या हालचाली टिपणारी, पण स्वतःच्या हालचाली सहजासहजी कळू न देणारी मच्छरदाणी ही माणसाच्या मनाला असलेल्या चोर कप्प्याचं एक प्रतीक आहे, असं म्हटलं तर चूक ठरणार नाही.

इतरांचा मच्छरदाणीविषयी काय अनुभव असेल, तो त्यांनाच ठाऊक. परंतु कलासक्त मनाला सदैव फुलविण्याची कठीण कामगिरी पार पाडणारी,

संवेदनाशील मनाला अधिक कल्पक बनविणारी आणि जिथे (प्रेयसीची किंवा) पत्नीची बौद्धिक पात्रता थिटी पडेल तिथे ती उणीव भरून काढणारी मच्छरदाणी ही आधुनिक जगात परमेश्वरानं मानवाच्या स्वाधीन केलेली संजीवनी आहे

ह्या संजीवनीच्या साहचर्याची महति अजून ज्यांना कळली नसेल ते दुर्दैवी होत. वास्तविक सर्वसंग परित्याग वैयक्तिक जीवनात करूनहि स्थितप्रज्ञाच्या अवस्थेला पोहोचलेली ही ' महाश्वेता ' लोकभावनेशी किती पटकन् समरस होते, नाही? महिन्यांमागून महिने जाऊनहि प्रियतमेला कळून न् कळलेलं प्रेम व त्यामुळे प्रियकराच्या वाटेला आलेली विफलता जशी फुलांनी डवरलेली बाग कमी करू शकत नाही, तसंच नदीचा किंवा सागराचा किनाराहि !

अशा वेळी ही मच्छरदाणी त्या विरही पुरुषाच्या दुःखित मनाला गोंजारते, कुरवाळते अन् दिलासा देते. उद्याच्या स्वप्नांची, ध्येयांची साकारता करण्यासाठी जिवाचं रान करणाऱ्यांची ती शिक्षिका असते, कारण ही मच्छरदाणी त्याच्याकडून त्या स्वप्नांचा व ध्येयांचा परवचा म्हणवून घेण्यात थोडीहि कुचराई करीत नाही. कधी कधी ती आजारी माणसाची परिचारिका म्हणून भूमिका पार पाडते तर कधी कवि-कथाकारांची स्फूर्तिदेवता बनण्यात तिला कमालीची धन्यता वाटते. अपुऱ्या काव्यनिर्मितीची आणि अर्धवट सुचलेल्या कथांची व कादंबऱ्यांची जननी होण्यात मच्छरदाणीला परम भाग्य खास वाटत असावं.

प्रत्येक माणसाच्या उभ्या आयुष्यात असे किती तरी प्रसंग, घटना किंवा अपघात घडतात की त्यासंबंधी तो एक अक्षरहि अगदी जवळच्या व्यक्तीला सुद्धा सांगायला असमर्थ असतो. त्याला वाटत असतं की कुणातरी फार फार विश्वासातल्या व्यक्तीजवळ मन उघडं करावं. अशा वेळी त्याच्या इच्छेला, हाकेला सदैव कुणी धावून येत असेल तर ही मच्छरदाणीच !

आणि म्हणूनच मला ती कल्पवृक्षासारखी वाटते. अर्थात् हा कल्पवृक्ष जरा वेगळा आहे. संकटात, दुःखात धीर देणारी, प्रीतीचा गंध बरोबरीनं

लुटणारी, ध्येयसाकारतेच्या चित्रावर कोणते रंग खुलून दिसतील याचं मार्गदर्शन करणारी, अश्रू टिपणारी आणि हसू फुलविणारी ही मच्छरदाणी विश्वातील निश्चित कोणती शक्ति आहे, हे मला तरी कळेलेलं नाही. हिच्या रूपांची मोजदाद घेणं जिथं अंतराळात भ्रमण करणाऱ्या माणसाला अशक्य आहे, तिथं तुमची-आमची काय कथा ?

परंतु मानवी जीवनावर असीम प्रेम करणारी ही महाश्वेता तिचा स्वीकार करणाऱ्याशी सदैव एकनिष्ठ राहिलेली आहे. निरपेक्ष प्रेमाचे धडे गृहिणीनं घ्यावेत तर हिच्यापासूनच. वरपांगी ही दिसायला भोळी अन् अंतः-करणानं नवनीताला लाजविणारी मुलुखावेगळी, आदर्श ललना म्हणायला काय हरकत आहे ?

★ ★

अनिवार हसू लोटलं मला त्यावेळी. माझीच कशाला, तुमचीहि तीच स्थिति झाली असती. असं हसू माणसाला केव्हा येतं सांगू ? दोनदा. एक मूर्खपणाचा कळस घडतो तेव्हा किंवा बालिशतेची परमावधि गाठली जाते, त्यावेळी. माझ्या बाबतीत प्रकार घडला तो दुसरा.

म्हणजे असं झालं. त्या दिवशी दुपार टळली होती. पावसाळी हवेनं वातावरणात एक आगळाच उल्हास निर्माण केला होता. रविवार असल्यानं पत्नीच्या सहवासाइतकीच प्यारी असलेली दुपारची झोप नुकतीच झाली होती. तिला पुरेपूर हद्दपार करण्यासाठी पत्नीनं केलेला चहाहि ' ए वन् ' झाला होता. त्या चहाचा कप घशाखाली रिकामा करीत असता माझा मुलगा छोटया वैजाला चालायला शिकवत असल्याचं आढळून आलं. एरवी दर क्षणाला खेळाचा डाव बदलणारी ती चिमुरडी त्यावेळी अक्षरशः आज्ञाधारक बनली होती. वडील भावाचे हात घट्ट धरीत, मुळातच असलेले चमकदार, टपोर डोळे अधिक विस्फारीत, अवीट आनंदानं भारावून जाऊन एकेक पाऊल पुढे टाकीत होती. स्वतःच्या पावलांकडे पाहत होती अन् मागे जाणाऱ्या परंतु जाताना न दिसणाऱ्या जमिनीची तिला गंमत वाटत होती. अक्षरांच्या द्वित्तांच्या उच्चाराखेरीज तिला काही कळत नव्हतं म्हणूनच बरं. नाही तर एका कोवळया, मांसल, लुशलुशीत पावलाखाली नेपोलियनला अन् दुसऱ्याखाली शिकंदराला दाबत असल्याचा अभिनय तिनं अगदी बेमालूम केला असता नाही ?

तिला अभिप्रेत नसलेला तो आनंद मला मात्र जाणवला. अर्थात् क्षणमात्रच ! घरात असलेला पांगुळगाडा मी अंगणात आणला अन् मुलाला सांगितलं, " शिकव आता वैजाला चालवायला. "

तशी ती इवलीशी कलिका अधिकच खुलली. भावाच्या हातांचा आधार तिला नकोसा झाला. पांगुळगाड्याच्या गोलाकार पण ओबडधोबड चाकांकडे पाहत तिनं आपल्या हाताच्या मुठी दांड्यावर घट्ट आवळल्या आणि एक पाऊल पुढे टाकलं. त्याबरोबर पांगुळगाड्याची तीन चाकं फिरली. दुसरं पाऊल टाकताच त्यांना गति प्राप्त झाली अन् मग काय विचारता ?

बागेतील एका मोठ्या वाफ्यातील मोगऱ्याच्या फुलांचा गंध दश-दिशांना पुरून उरावा त्याप्रमाणे, किंवा पहाटेपूर्वीच्या काळोखातील आकाश-गंगेत मनसोक्त जलविहार करणाऱ्या सहस्र तारकांच्या एकत्रित तेजो-वलयाप्रमाणे ती किशोरी खुलली. तिच्या आनंदात मीहि बुडालो. तिच्या-सारखं चालली, हंसलो, खेळलो अन् पुनश्च भानावर आलो ते संध्या-काळची किरणं धरतीच्या आडोशाला नाहीशी झाली म्हणून नव्हे, तर पत्नीच्या शब्दांनी !

दाराच्या चौकटीत उभी राहून, पदराआड हसू लपवीत ती म्हणाली, " अहो, आता तुम्ही लहान का आहात पांगुळगाड्यानं चालायला ? "

" भलतंच ! अग मी वैजाला चालायला शिकवतोय. " पत्नीच्या आरोपाचं खंडन करीत पण पांगुळगाड्याच्या गतीवर चालण्याची क्रिया चालू ठेवीत मी दिमाखानं उत्तर दिलं.

" हे सारं खरं होऽ ! पण ती बसलीय इथं पायरीवर अन् पांगुळ-गाडा चालवीत आहा तुम्ही. " कसंबसं हसू दाबत पत्नीनं उत्तर दिलं.

पुरुषासारखा पुरुष मी, पण तिच्या हास्यातल्या गर्भितार्थानं माझा सपशेल पराभव केला होता. अवीट आनंदाची धुंदी साफ उतरवून टाकली होती; आणि तरीहि माझं मन पुन:पुन्हा सांगत होतं– 'तू निर्दोष आहेस.. '

या अनाकलनीय प्रश्नाचं उत्तर मला दुसरे दिवशी कचेरीत जातांना अचानक सापडलं अन् तेहि माझ्या बुद्धीमुळे नव्हे तर मुलाच्या बालीश हट्टातून ! ऑफिसचे कपडे करून मी सायकलवर टांग मारणार तशी तो म्हणाला, " रोज रोज काय हो सायकलनं ऑफिसात जाता, नाना ? "

" अरे मोटर घ्यायला खूप पैसे लागतात आणि खूप पैसे आणायला ऑफिसात ज़ावं लागतं. " ओठावर आलं ते मी बोलला.

" मोटार नसली तरी चालेल. आज वैजाची मोटार घेऊन जा."

" वैजाची मोटार ? कोणती ? "

" पांगुळगाडा ... ! काल तुम्ही कित्ती छान चालवत होता. सायकलपेक्षा लवकर जाल ऑफिसात."

अण्वस्त्र प्रक्षेपणा इतकी गति माझ्या पायात कुठून आली कोण जाणे. पण मी झटकन् सायकलवर बसलो अन् मुलगा, बायको, घर, दुकानं आणि रस्ते यांना भरारा मागे टाकीत जाऊ लागलो सुरुवातीला आलेलं हसू एकदम ओसरलं व माझ्या ओठावर शब्द आले, ' हरवलं ते गवसलं. '

काल सायंकाळी वैजाला मी पांगुळगाड्यावर चालायला शिकवत असताना पत्नीनं माझ्या आनंदाचा विचका केला होता. ( यापेक्षा आणखी कोणती भरीव कामगिरी स्त्री संसारात करणार म्हणा ! ) परंतु मनानं मला ' तू निर्दोष आहेस ' असं पुनःपुन्हा सांगितलं होतं.

पांगुळगाडा चालवायला एका विशिष्ट वयाची मर्यादा असते, अशी माझी कालपर्यंत कल्पना होती. परंतु ती साफ चुकीची ठरली. नीट चालण्याचा सराव व्हावा म्हणून काही काळ जरी बालपणी पांगुळगाडा हवासा वाटला तरी प्रत्येक माणसाला अखेरच्या क्षणापर्यंत पांगुळगाड्याची आवश्यकता असते, हेच खरं. त्याखेरीज तो उभा राहू शकत नाही, चालू शकत नाही, जगूहि शकत नाही आणि प्रगति तर करूच शकत नाही. ज्याला मी पांगुळगाडा म्हणतो, त्याला कुणी माध्यम म्हणेल, कोणी टोपीबदल म्हणेल. एखादा फटकळ खांदेपालट म्हणायलासुद्धा कमी करणार नाही. परंतु वस्तुस्थिति ही अशी आहे.

जीवनपथावरून जाणारा – मग तो नेता असो, नाहीतर सर्वोदयवादी; भिकारी असो, अथवा पुजारी; तत्वज्ञ राहो, नाहीतर अध्यात्मवादी – आज प्रत्येक जण कोणता ना कोणता पांगुळगाडा घेऊन चालत आहे. पुढे जाण्यासाठी गर्दीतून वाट काढीत आहे. लहान मुलांना नवी नवी रंगीत खेळणी नित्य हवी असतात. त्या खेळण्यांवर त्यांचं अधिक प्रेम असतंच की नाही ? वाढत्या वयाबरोबर आणि बदलत्या अपेक्षेनुसार माणूस आपला पांगुळगाडा असाच बदलवत असतो.

कोणे एके काळी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत गाजलेली सौंदर्यसम्राज्ञी ( अभिनेत्री ) आज सर्वस्वाचा त्याग करून अखंड राम-नामाच्या पांगुळगाड्यानं तीर्थक्षेत्री जीवनशुद्धि करीत असलेली अनेकांना सुपरिचित आहे. जेव्हा ती कलेच्या, कीर्तीच्या, वैभवाच्या शिखरावर होती तेव्हा ह्याच रामनामाला तिनं वेडेपणाचा कळस मानला नसेल कशावरून ? उलट त्यावेळचा हव्यास आता तिला वेडेपणापेक्षाहि अधिक काही वाटल्यामुळेच गेल्या काही वर्षांपासून ती मूर्तिपूजेच्या अन् जपा-तपाच्या साहाय्यानं ऊर्वरित आयुष्य सार्थकी लावण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे.

ह्याला कोणी नियतीचा खेळ म्हणेल. काही प्रमाणात हा खेळ तसा असेलहि. परंतु आपल्यापुरता पाहणारा, जगणारा अन् वावरणारा माणूस ज्या माध्यमांचा, साधनांचा आणि क्लृप्तींचा अवलंब करतो, तेव्हा तो त्याचा पांगुळगाडाच ठरतो, ह्यात शंका नाही. हजारो वर्षांपासून हे असंच चालत आलं आहे अन् पुढेहि चालू राहील.

★ ★

# बहिरे कान

: १४ :

मला आश्चर्य वाटलं ते गबाजीच्या निर्विकार चेहऱ्याचं. वास्तविक त्याच्या जागी जर दुसरा कोणी माणूस असता तर ? तर ते शब्द ऐकून रागानं लालबुंद तरी झाला असता किंवा लाजेनं वा अपमानानं हिरमुसला असता.

तसं पाहिलं तर गबाजीच्या हातून काही अक्षम्य गुन्हा घडला नव्हता. टेबल पुसत असताना त्याचा दौतीला धक्का लागला अन् साहेबाच्या पँटवर शाई सांडली. तशी शिव्यांची लाखोली नि वेंधळेपणाचा दोष साहेबानं तब्बल अर्धा तास त्याला सुनावला. तरीहि गबाजी गप्प ! ना त्याच्या चेहऱ्यावर राग ना खिन्नता ! अगदी निर्विकार चेहऱ्यानं तो लाकडी स्टुलावर बसला होता.

त्याच्याविषयी मला सहानुभूति वाटल्यामुळे साहेब जाताच मी म्हटलं " साहेबाची जात ही अशीच. माणसाच्या हातून चूक झाली म्हणून त्याला इतकं का फाडून खायचं ? किती बोलले रे तुला साहेब वाटेल तसं ! "

तशी तो मला म्हणाला, " खरंच की काय ? मला तर एकहि शब्द ऐकू आला नाही. "

मी आश्चर्यानं विचारलं, " म्हणजे ? "

" मी कानानं बहिरा आहे बाबू ! आणि खरं सांगू का ? हे बहिरे कान मला अशा वेळी मदत करतात. म्हणून मला वाईट वाटत नाही अन् दुःखहि होत नाही. बायकांच्या कानात शे-दीडशेच्या मोत्यांच्या कुड्या असतात. पण माझे बहिरे कान म्हणजे अजोड दागिना आहे.

गबाजीच्या या अजब विचारसरणीचं आणि समर्थनाचं ज्ञान पाहून माझी हसता हसता मुरकुंडी वळली. मलाच काय, कोणाहि स्त्री-पुरुषाला त्याच्या या मुलुखावेगळ्या शब्दांचं आश्चर्य वाटेल अन् त्याची वेड्यात गणना करायला कुणी कमी करणार नाही कदाचित्.

शरिराच्या एखाद्या अवयवात व्यंग निर्माण झालेलं असावं, थोड्या फार प्रमाणात ते लोकानाहि माहीत असावं. त्या व्यंगाची खंत मनाला सतत टोचत राहावी, ही माणसाच्या स्वभावाची अपरिहार्य घडण आहे. या घडणीवर उपाय म्हणून की काय तो आपल्या व्यंगावर मुलामा चढवितो.

गबाजीला आपल्या बहिऱ्या कानांचं भूषण वाटणं साहजिक आहे. कारण भूषण शब्दाचा अर्थ बाजूस ठेवला तरी अगदी तिखट कानाचा माणूससुद्धा सोयीनुसार बहिऱ्या कानाचं सोंग आणतो, हे कालच्या दोन प्रसंगावरनं मला पुरेपुर कळून चुकलं.

काल एका मित्राकडे सत्यनारायणाच्या प्रसादास गेलो होतो. तिथं पानसुपारी खात असता अन् गप्पा मारीत असता त्याची चार वर्षांची गुलजार छोकरी रागानं कोपऱ्यात फुरंगटून बसली होती. अधूनमधून चोरट्या नजरेनं वडिलांकडे पाहत होती. मला राहवलं नाही. मी तिला उचलून घेतलं अन् मांडीवर बसवीत म्हटलं, "काय झ्यालं शुनीला लागवायला ?"

तशी ती माझ्या गालांवर हात ठेवून म्हणाली, शांगू का ? मला किनई एवली एवली कचकल्याची बाहुली हवीय्. शेजालच्या इन्दीला आनली तशी. दहा लुपयाची तल आहे. पन हे आप्पा ऐकतच नाहीत. इक्क शांगितलं तली ऐकू न आल्याशालखं कलतात. बहिलत कुथले ..... "

बोबड्या बोलीत त्या बालिकेनं बापाविरुद्ध केलेली तक्रार आणि अखेरच्या 'बहिलत कुथले' या शब्दांनी केलेला निषेध ऐकून घरी येतो न येतो तोच शेजारच्या केशवरावांच्या घरातलं भांडण कानावर आलं.

केशवरावांची बायको भलतीच गरम झालेली होती. अन् तावातावानं म्हणत होती, "तुम्हा पुरुषांची जात ही अशीच. नसती आणायच्या कुड्या तर नका आणू. पण स्पष्ट नकार द्यायला काय हरकत आहे ? पण छे ! अगदी न ऐकल्यासारखं करायची कला तुम्हा पुरुषांना उपजतच येते की काय कुणास ठाऊक ? इतर वेळी खट् आवाज झाला तर चट्कन् ऐकू येतो. परंतु बायकोनं कशाचीहि मागणी केली की झाले तुमचे कान बहिरे ! छान कला साधली आहे बरं तुम्हाला !"

केशवरावांच्या पत्नीनं केलेल्या सरबत्तीनं माझ्या बायकोला धीर आला की काय कोण जाणे. हलकासा चिमटा काढीत ती मला म्हणाली, "खोटं नाही त्यांचं म्हणणं तीन महिन्यापासून अबोली पातळाची मागणी मी करत्येय. परंतु 'पुढचा महिना' काही संपत नाही. लबाड आहात तुम्ही पुरुष."

बोधी वृक्षाखाली बसून गौतमाला काय साक्षात्कार झाला असेल, त्यापेक्षा तो मला त्या क्षणी झाला. इतके दिवस कानांना मी फक्त महत्त्वाचं इंद्रिय समजत होतो आणि पुरुषाला सजायचं झालं तर त्याला फक्त कानात बिक्‌बाळी घालता येते असं मला वाटत होतं. उलट बायका केवढ्या भाग्यवान् ! त्यांना विविध तऱ्हेची कर्णफुलं घालता येतात अन् केसांचे नक्षिदार फुगेहि घेता येतात, म्हणून द्वेष वाटायचा मला.

पण कानांमुळे इतकी मोठी कला माणसाला सहजगत्या साध्य होते,हे प्रथमच मला उमगलं. काही कला अशा असतात की त्या आत्मसात् करायला जिवाचं रान करावं लागतं, रक्ताचं पाणी करावं लागतं. वेळप्रसंगी शरीर, मन, धन चंदनाप्रमाणे झिजवावं लागतं. केवढी तपश्चर्या करावी लागते. तिच्या चिंतनात अन् साधनेत आयुष्याचा बहुमोल काळ खर्च होतो. परंतु ' बहिऱ्या कानां ' ची कला अंगी बाणायला कष्ट का पडतात ?

मित्राच्या मुलीनं बापाचा बोबड्या भाषेत केलेला निषेध, केशवरावांच्या पत्नीनं पतीवर केलेली सरबत्ती पाहून मला वाटू लागलंय की जो तिखट कानांचा तोच दुर्दैवी. उलट बहिऱ्या कानांचा सर्वात सुखी.

कारण यांत्रिक युगात चाललेले अनीतीचे प्रयोग अन् त्यांचे पडसाद त्याला ऐकू येणार नाहीत. उलट तिखट कान म्हणजे शापच. मगरूर सत्तेनं जनमताची केलेली अवहेलना त्याला ऐकावी लागते. दारिद्र्य, विषमता अन् भूक ह्यांनी होणाऱ्या भीषण घटना ऐकून त्याला जागच्या जागीच फक्त हळहळावं लागतं.

जीवन जगण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी ज्या कानांची निर्मिति परमेश्वरानं केली, त्याला अस्वस्थ करणाऱ्या, मनाला पिळवटून टाकणाऱ्या घटना ऐकाव्या लागतात, हे केवढं दुर्दैव ! त्या मानानं बहिऱ्या कानांची माणसं अधिक भाग्यवान्, अधिक सुखी. बहिऱ्या कानांना गबाजीनं दागिना म्हटलं यात मला चूक वाटत नाही. तुम्हाला वाटते ?

★ ★

असेन त्यावेळी मी मराठी चौथी-पाचवीत. एका गोष्टीचं आश्चर्य अन् तितकीच चीडहि मला सारखी वाटायची एवढं मात्र खरं.

माझ्या वडील भावाचं हस्ताक्षर खूप चांगलं होतं. मोती ह्या वस्तूतलं सौंदर्य त्यावेळी मला अनाकलनीय होतं. अन् मूल्य जाणून घ्यायची बुद्धीहि नव्हती. परंतु घरातील मोठी माणसं आणि काही परिचित त्याच्या अक्ष‑राला मोत्याच्या दाण्याची उपमा देताना मी किती तरी वेळा ऐकलं होतं. त्यामुळे ' माझ्या भावाचं अक्षर मोत्याच्या दाण्यासारखं आहे ' हे प्रशस्ति पत्र मला तोंडपाठ झालं होतं. त्याच्या इतिहास-भूगोलाच्या वह्या उघडून मी तासन् तास एकेक पान पाहत असे. तो मोह टाळणं मला अशक्य होतं. परंतु ह्या वह्यांपैकी एक वही पाहायचं मी साफ टाळीत असे. तिला चुकूनहि स्पर्श करीत नसे मग पान उघडून पाहणं तर दूरच !

याचा अर्थ असा नव्हे की त्या वहीतलं अक्षर खराब किंवा गिचमिड होतं. परंतु माझ्या बालमनाला चीड आणणारी गोष्ट प्रत्येक पानावर विखुरलेली असावयाची. जागोजाग खाडाखोड केलेली असायची. मांडणी अन् कृति असे दोन भाग त्या वहीच्या प्रत्येक पानावर असत. मांडणीचा भाग सुवाच्य अक्षरात लिहिलेला असायचा. शेणानं सारवलेल्या अंगणात अठरा थेंबी रांगोळीनं शोभा यावी ना, त्याप्रमाणे. परंतु कृतीच्या भागात अशी खाडाखोड आढळून येई की पुसू नका. जागोजाग खड्डे पडलेलं मैदान. दरवेळी मी भावाला म्हणत असे,

" असे सुन्दर आकडे मांडल्यानंतर खाडाखोड करण्याची काय ही पद्धत ? त्यापेक्षा पाटीवर आधी गणित सोडवून घेतलं तर काही करावं लागणार नाही. "

माझी ही सूचना भावानं कधीच मान्य केली नव्हती. उलट हसून तो म्हणायचा, " तुला कळायचं नाही या खाडाखोडीतलं ! तू मोठा झालास आणि शाळेत जाऊन गणितं करूं लागलास की समजेल यातली गंमत "

भावाच्या म्हणण्याचा उलगडा मला त्याक्षणी झाला नव्हता. हळके हळके मी एकेक इयत्ता पास होत गेलो. मोठमोठ्या आकड्यांच्या अवघड गणितांशी माझी वरचेवर गाठ पडू लागली. कधी मी आकड्यांना लोळवलं (शिकंदरानं पौरसाचा पराभव ज्या तडफेनं केला, ती वीरश्री कधी कधी माझ्यात संचरलेली असायची.) परंतु बऱ्याच वेळा आकड्यांनीच माझ्या छातीवर नंगानाच घातला. दुर्दैव म्हणा की सुदैव– पण गणिताचं भरघोस पीक माझ्या मेंदूत कधीच आलं नाही. नेहमी खाडाखोड मात्र त्या निमित्तानं आयुष्यभर कपाळी आली. लहानपणी वडील भावाला ज्या खाडाखोडीबद्दल नावं ठेवली तीच मला आयुष्यभर करावी लागली. कमी अधिक प्रमाणात ती प्रत्येकाच्या आयुष्यात होत असते.

ती पाहून प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीत्या प्रत्येकजण हेच म्हणतो की, पाया शिवाय घर नाही, मुळावाचून झाड नाही, सूर्यावाचून पृथ्वीला जीवन नाही, तसं खाडाखोडीवाचून माणसाचं आयुष्य नाही. '

काही वर्षापूर्वी सांताक्रूझला समुद्रकिनाऱ्यावरील टुमदार बंगल्यात राहणाऱ्या एका ख्यातनाम अभिनेत्रीचं उदाहरण घ्या ना ! एके काळी रजतपटावर तिची कीर्ति सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली होती. मराठी, हिंदी, गुजराथी, इंग्रजी भाषांवर तिचं असामान्य प्रभुत्व होतं. कॉलेजात शिकत असताना तिच्या सौंदर्यानं सगळ्यांना जसं पागल केलं होतं, त्याचप्रमाणे तिच्या वक्तृत्वाची मोहिनी मोठमोठ्या व्यक्तींवर पडली होती. त्यात भर पडली होती ती अपूर्व नृत्यनैपुण्याची अन् असामान्य अभिनयाची.

तिची मुलाखत घेताना मी जे जे प्रश्न विचारले त्यांना तिनं मोकळ्या मनानं उत्तरं दिली. अखेरचा प्रश्न मी केला तो असा– " नटी झाल्यानं तुमची कीर्ति चौफेर पसरलेली पाहून जीवनाचं सार्थक झालं, असंच वाटत असेल आपल्याला. नाही का ? "

मला वाटलं 'अर्थातच.' असं उत्तर देईल ती. पण घडलं विपरीत. ती गंभीर झाली. पश्चात्तापानं माणूस निश्चल व्हावा, तशी ती स्तब्ध झाली. काही क्षणांनी हलक्या आवाजात तिनं उत्तर दिलं, " खरं सांगू ? शहाण्या स्त्रीनं ह्या सिनेमाच्या विषारी जगात पाऊल ठेवू नये. जिला सिनेमात शिरण्याचा मोह झाला, तिनं पक्कं समजावं की गत जन्मीचं पाप म्हणून हा मोह झाला."

काही अत्तरांचा गंध मंद असतो परंतु तो दीर्घकाळ टिकतो. उलट काही अत्तरं अशी असतात की त्यांच्या उग्र वासानं मन चटकन् धुंद होतं, पण वास लवकर उडून जातो. त्या अभिनेत्रीचे शब्द मला दीर्घकाल टिकणाऱ्या अत्तरासारखे वाटले.

तिच्या ह्या छोटया उत्तरात तिचा अनुभव होता. नटीचा पेशा पत्करण्याचा मोह झाला नसता तर ती ख्यातनाम डॉक्टर झाली असती. वैवाहिक जीवनात सुखी झाली असती. पण सिनेमात प्रवेश करताच प्रेमात पडली ती. अन् अवघ्या पंधरवडयातच तिला काडीमोड करावा लागला. तेव्हापासून आतापर्यंत पाच सहा तरी जीवनसाथी तिनं हाताळले पण पटलं मात्र एकाशीहि नाही.

वाटयाला आलेल्या दिवसांसाठी ठरवावं एक अन् घडतं मात्र निराळंच. न सुटणारं गणित सोडवितांना जी तारांबळ उडते, गोंधळ माजतो आणि पांढऱ्यावर काळयाच्या स्वरूपात जी खाडाखोड होते त्याचंच नाव आयुष्य !

पुराणातल्या प्रारब्ध शब्दालाच जीवनाच्या व्यवहारी भाषेत खाडाखोड म्हणतात. प्रारब्ध आणि खाडाखोड हे दोन शब्द म्हणजे आरशात दिसणाऱ्या वस्तूच्या प्रतिबिंबासारखे आहेत. ज्या गणितात खाडाखोड नाही ते गणित कसलं ? त्याचप्रमाणे ज्यात घडामोडी नाहीत किंवा अदलाबदल नाहीत ते जीवन कसलं ?

★ ★



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ०२३५ ३६०५ वि: [illegible]
क्रमांक ........ नों दि २८।।१५७

## दारं अन् खिडक्या ▲▲▲ : १६ :

**इथंच** माझा अन् माझ्या पत्नीचा मतभेद निर्माण झालाय्. अन् तो अशा तीव्र स्वरूपाचा आहे की त्यात समेट होईपर्यंत माझा नवीन बंगला काही बांधून पूर्ण होणार नाही. नि तो समेट कधी होईल, हे आज सांगता येणार नाही.

मतभेदाचं कारण अगदी खाजगी किंवा वैयक्तिक स्वरूपाचं नाही. परंतु व्यवहारात काय किंवा दैनंदिन जीवनात काय माणसाला कारणांचे उंबरठेच जास्त ओलांडावे लागतात. ते ओलांडण्याऐवजी माणूस थांबला अन् त्यांची उंची जाडी मोजण्याच्या प्रयत्नाला लागला की नकळत तो चक्रव्यूहात सापडतो अन् मग काही केल्या त्याला सुखरूपपणे बाहेर पडता येत नाही. मोठी केविलवाणी अवस्था होते त्याची.

माझ्याच बाबतीत पहा ना ! मी जो बंगला बांधायला घेतला आहे तो काही एखाद्या संस्थानिकाच्या प्रासादासारखा भव्य, वा संगमरवरी राहणार नाही. फार काय पाश्चिमात्य स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून कुणी कुतुहलानं पहावं असाहि तो असणार नाही. बोलून चालून पोटाला अन् आवडीनिवडींना चिमटा देऊन घामावर पैसा जमविलेल्या श्रमजीवी माणसाची ती कुटि ! तिच्या प्रत्येक खोलीला दारं अन् खिडक्या कशा नि किती असाव्यात, ह्या क्षुल्लक बाबीवर माझा पत्नीशी मतभेद झाला आहे.

माझं स्वतःचं मत असं की प्रत्येक खोलीला दोन दारं असावीत आणि एखादी खिडकी असली म्हणजे पुरे. पत्नीचं म्हणणं नेमकं विरुद्ध ! ती म्हणते, "दारं फार ठेवली की चोराचिलटांची भीति फार ! कोण, कसा अन् केव्हा आत शिरेल, याचा पत्ता लागायचा नाही. दारांपेक्षा खिडक्या अधिक सुरक्षित. प्रकाश तर मिळतो पण दारं बंद ठेवून हवाहि खेळती राहू शकते. बाहेरची दृश्यं पाहणं सोपं असतं. याहिपेक्षा मोठा फायदा म्हणजे आपण घरात काय करतो हे सहजासहजी दिसत नाही." माझी पत्नी आपलं म्हणणं अगदी तावातावानं पटवून देण्याचा प्रयत्न करीत असते.

स्थापत्यशास्त्रात घराला दारं आणि खिडक्या किती, कशा अन् कुठे असाव्यात यासंबंधी काही नियम आहेत. मला वाटतं असेच नियम परमेश्वरानं माणसाच्या मनाला, माणुसकीला, दारं अन् खिडक्या कशा असाव्यात यासंबंधी केलेले असतात ते अलिखित असतील म्हणूनच माणसाला ते कळले नसावेत. म्हटलं तर ती त्याची सोय झाली अन् म्हटलं तर त्याच्या माणूस ह्या उपाधीला कलंक लागला.

माणसानं दयेनं वागावं, जास्तीत जास्त निःस्वार्थी असावं, परस्परांशी स्नेहानं वागावं, स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याचा बळी घेऊ नये, हे सगळं तो दुसऱ्याला सफाईनं सांगतो; स्वतःच्या बाबतीत मात्र तो त्यानुसार क्रियाशील असतोच असं मुळीच नाही. घराला जशा दारं-खिडक्या असतील त्याच प्रमाणात हवा आणि प्रकाश खेळता राहील की नाही ? खिडक्या लहान आणि दारं ठेंगणी असली तर स्वच्छ हवा मिळणार नाही, पुरेसा प्रकाश लाभणार नाही. परंतु सर्वच घरं इतक्या प्रमाणबद्धतेनं थोडीच बांधलेली असतात ? अप्रमाणबद्धता हेच वैशिष्टच आहे जगातल्या अणुअणूतलं.

याचा परिणाम माणसावर झाला की घरादारांच्या अप्रमाणबद्धतेमुळे माणसाच्या माणुसकीत हा दुर्गूण शिरला हे सांगणं कठीण आहे. परंतु स्वतःच्या सोयीसाठी, मनाच्या, माणुसकीच्या, अन् सहानुभूतीच्या दारंखिडक्या लहानमोठ्या करायची त्याला चटकच लागली आहे.

ज्या ठिकाणी स्वतःला बळी जावं लागणार नाही, त्यागाच्या आगीत उडी घ्यावी लागणार नाही किंवा माणुसकीच्या साकारतेचं प्रतीक उभारावं लागणार नाही, तिथं मनुष्य आपल्या दयेची, मायेची दारं सताड उघडी ठेवतो. परंतु सत्य सांगण्याची, बोलण्याची किंवा ऐकण्याची पाळी आली की त्या दारांचं खिडक्यात रूपांतर झालंच म्हणून समजा.

काय गंमत पहा ! साऱ्या जगाला सामावून घ्यायची ताकद माणसात आहे, त्याच्या रक्तात आहे. परंतु त्याच्या संकुचित मनाच्या दारंखिडक्या कमालीच्या अप्रमाणबद्ध असतात, हाच दैवदुर्विलास ! !

स्वतःच्या मालकीचं घर बांधतांना माणूस जसं प्रमाणबद्धतेकडं लक्ष पुरवतो तसं त्यानं व्यावहारिक जीवनात वागताना केलं तर... ? ...तर जगातील अर्धेअधिक मतभेद आणि दुःखाची कारणं नाहीशी होतील. ★★

## करू नये तो केला व्यापार ▲ ▲ ▲ : १७ :

लहानपणी ऐकलेल्या एका साधूची गोष्ट हल्ली मला वरचेवर आठवत असते. मोठी मजेदार आहे ती.

एक होता साधू. नदीकाठच्या एका झोपडीत तो राहत असे. सूर्योदयापूर्वी तो स्नान उरकून घ्यायचा; मग ईश्वरचिंतन; ते संपलं की पोटापुरतं अन्न मिळविण्यासाठी म्हणून गाव प्रदक्षिणा. सायंकाळ होऊ लागली की पुन्हा स्नान करून आणि छताला बांधलेल्या बांबूवर लंगोटी वाळत घालून भगवंताचं नामस्मरण करीत तो झोपी जाई.

गावापासून आणि जन व्यवहारापासून अलिप्त राहणारा हा साधु रोज सकाळी स्नान करून आला नि आदल्या रात्री वाळत घातलेली लंगोटी हातात घेतली म्हणजे संतप्त होई.

व्हायचं काय, तर साधु झोपला की उंदीर जागे व्हायचे आणि बांबू-वरल्या लंगोटीला भोकं पाडायचे. या खटचाळ उंदरांचा त्रास नाहीसा व्हावा म्हणून त्यानं एक मांजर पाळलं. हलके हलके उंदीर कमी होऊ लागले. पण साधू निर्धास्त होतो न होतो तोच मांजर रोडावत असलेलं त्याच्या लक्षात आलं. त्यासाठी दुधाची व्यवस्था करणं अपरिहार्य झालं. कर्मधर्मसंयोगानं म्हणा वाटलं तर, त्याला एक गाय दान मिळाली. आता उंदीर कमी झाले, गाईच्या दुधावर मांजर पुष्ट होऊं लागलं; परंतु चाऱ्याच्या अभावी गाय रोडावू लागली, दिवसेदिवस दूध कमी देऊ लागली. तिला चारा पुरविण्यासाठी साधूला रानावनात हिंडणं भाग पडू लागलं. या अव्यापारेषु व्यापारात त्या साधूच्या ईश्वरचिंतनात अडथळा येऊ लागला त्याचं मन उद्विग्न झालं आणि अखेरीस तो हिमालयात चालता झाला.

ईश्वर चिंतनार्थ जीवन वाहिलेल्या एका साधूला सामान्य लंगोटीच्या रक्षणाकरिता एवढा खटाटोप करावा लागला. आणि अल्पावधीतच 'करू नये तो केला व्यापार' असं म्हणायची वेळ येऊन हिमालयाचा रस्त धरावा लागला.

त्या साधूवर 'करू नये तो केला व्यापार' म्हणायची जशी वेळ आली तशी प्रत्येकाच्या वाट्याला वरचेवर येतच असते. जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाच्या पहिल्या श्वासापासून तर अखेरच्या घटकेपर्यंत घडणाऱ्या सर्व अनपेक्षित घटना किंवा स्थित्यंतरं ही या व्यापारापेक्षा वेगळी का आहेत ? सराफ बाजारात, धान्य बाजारात किंवा शेअरबाजारात जसे तेजीमंदीचे फलक लागलेले असतात, तशाच प्रकारचे फलक प्रत्येकाच्या ललाटी असतात. ते दिसत नाहीत एवढंच काय ते. खरं म्हटलं तर यात दुःख आहे अन् म्हटलं तर सुख.

परंतु पंचेंद्रियांचा मानव घडविताना विधात्याच्या हातून एक घोडचूक झाली. ती अशी की, त्यानं बुद्धी दिली, प्रमाणबद्ध अवयव दिलेत, नाक, कान, डोळेहि दिलेत. या डोळ्यांनी जगातील बरं बाईट, सत्यासत्य सारं काही पाहता येतं. परंतु हेच दोन (किंवा चष्मा लावत असतील त्यांचे चार) डोळे जसे परस्परांना पाहू शकत नाहीत, त्याचप्रमाणे कपाळावरला फलकहि वाचू शकत नाहीत.

असं असल्यामुळे संतांनी सज्जनांनी, विद्वानांनी आणि वडीलधाऱ्यांनी कितीहि कळकळीनं आणि तळमळीनं सांगितलं तरी माणसाला पटत नाही.

कसं पटेल ?

कारण स्वतःच्या डोळ्यांना समाजातील, व्यक्तीच्या जीवनामधील भल्याबुऱ्या घटता पाहायला मिळाल्या तरी आपल्या ललाटी असं येणारच नाही, असं त्याचं छांदिष्ट मन त्याला आतून सांगत असतं. नदीला आलेल्या पुरात पोहायला येत असलेला माणूस पाण्याला ओढ किती आहे, खोली किती आहे, यांजा अंदाज न घेता अति विश्वासानं उडी घेतो; परंतु त्यातील भोवऱ्यात अडकून हैराण झाला अन् धीर सुटला की मग कसाबसा दम टिकवून कुठे तरी किनाऱ्याला लागण्याचा प्रयत्न करतो ना ? तसंच होतं माणसाचं.

माझ्या चाळीत राहणाऱ्या एका मित्राची अशीच गत झालीय. तो अगदी कोवळ्या वयात असताना त्याचे वडील निवर्तले. अपुऱ्या व उघड्या पडलेल्या संसाराची जबाबदारी बिचाऱ्या आईवर पडली आणि चार लोकांकडे स्वयंपाकाला लागून लेकराना पोसू लागली. त्या मुलानं मन लावून

शिक्षण घेतलं असतं अन् मॅट्रिकचा टिळा लावून नोकरी धरली असती तर त्या माउलीला केवढा दिलासा मिळाला असता.

परंतु इंग्रजी दुसरीत असतांनाच मास्तरांनी राजेश्रींना एक दिवस थोडं दाटलं, तशी त्या स्वारीनं शाळेला कायमचा रामराम ठोकला. तेवढ्याच शिक्षणावर (अन् मागील जन्माच्या पुण्याईनं) त्याला तीन मैलांवर असलेल्या खेड्यात मास्तरकीची नोकरी मिळाली. तिथं जरी हे महाशय चिकटून राहते तर त्यांचे आज दोनाचे चार ( कदाचित् आठ दहा ) हात झालेले मातेला पाहायला मिळाले असते. परंतु तसंहि झालं नाही.

तिच्या ललाटी काय होतं ते तिला कळत नव्हतं नि मुलाच्या ललाटी जे दिसत होतं ते कंठरवानं सांगूनहि मूलाच्या डोक्यात प्रकाश पडत नव्हता. असा चालू होता दोघांचा दैवदुर्विलास !

शेवटी त्यानं मास्तरकीला देखील लाथ मारली आणि फोटोग्राफीच्या धंद्याकडे वळला. थोडं फार यश त्यानं कमावलं, नाही असं नाही. परंतु अंथरूण पाहून पाय न पसरणारीच माणसं जगांत अधिक. त्यातले हे एक महाशय ! साकारतेपेक्षा कल्पनाच फार. कृतीपेक्षा शब्दच जास्त अस्सा कॅमेरा आणायचा नी तस्सा स्टूडिओ खोलायचा ! धंद्यातल्या वक्तशीरपणाच्या बाबतीत मात्र छत्तीसाचा आकडा !

झालं काय तर त्यानं कायम झालेली मास्तरकी सोडली अन् आज ह्या गावाला स्टूडिओ तर सहा-आठ महिन्यांनी दुसऱ्या गावाला ! आज इथल काम मिळव तर उद्या ते अर्धवट सोडून दुसऱ्या गावी दौरे. शब्द पाळण्याबाबत मात्र शून्य !

अखेरी पिंपळावरल्या मुंजाप्रमाणे चाळीस वर्षांचं आयुष्य जगून मग दोनाचे चार हात केले आणि आता सकाळ संध्याकाळ देवघरात असलेल्या तुकाराम महाराजांच्या फोटोला हार घालीत, निरांजनं ओवाळीत, भक्तिभावानं नमस्कार करीत म्हणत असतो," करूं नये तो केला व्यापार."

माऊलीहि हेच म्हणते. पण कपाळाला हात लावून अन् अश्रूंनी पदराचा काठ भिजवून ! स्वत:च्या ललाटी लिहिलेलं माणसाला वाचता येत नाही, हा शाप तर नसेल ना ? ह्या शापाच्या पोटीच तुकारामाच्या अभंगानं जन्म घेतला असावा, हेच खरं.

★ ★

# माणसाला दात चौसष्ट ▲▲▲ : १८ :

आता त्या मासिकाचं नांव मला आठवत नाहीं. तसंच ते देशी होतं की विदेशी, हेहि स्मरत नाही. परंतु त्यात फोटोसहित छापून आलेली बातमी अजूनहि अक्षर न् अक्षर माझ्या डोळ्यासमोर येत. सूतिकागृहात प्रसूतीसाठी आलेल्या एका बाईला मुलगा झाल्याची ती बातमी होती. बाईला मूल होण्यात काडीचं आश्चर्य उरलेलं नाही; म्हणून एवढ्यावरच थांबून ती बातमी प्रकाशित करणाऱ्या संपादकाला आपण खास वेड्यात काढाल. फार काय त्याच्या बुद्धीची कीवहि कराल, होय ना ? निदान मी तरी केली असती.

'बाईला मुलगा झाला' अशा अर्थाच्या त्या बातमीत आश्चर्य होतं ते हे की नुकत्याच जन्मलेल्या तिच्या लुसलुशीत मुलाला चौसष्ट दात होते.

आम्रवृक्षावर एकवेळ सीताफळ येईल, गुलाबाच्या ताटव्यावर गुलाबाऐवजी चाफा येईल, त्याचा गंध सर्वत्र दरवळेल. फार काय हिऱ्याच्या खाणीत मोतीहि सापडतील. पण नव्यानं जगात प्रवेश केलेल्या अन् किलकिल्या नजरेनं आईला नीटसं न पाहता येणाऱ्या चिमण्याला दात यावेत ? हे जसं अशक्य तसंच चौसष्ट दात येणं तर सुतराम् अशक्य !

जगाच्या अंतापर्यंत कुणाचाहि ह्या बातमीवर विश्वास बसणार नाही.

इतरांप्रमाणे मीहि 'त्रिवार अशक्य' असा उद्गार काढला होता. मला आश्चर्य वाटलं होतं, मति कुंठित झाली होती, तर्कबुद्धीनं हात टेकले टेकले होते.

पुढे किती तरी वर्षं फुरसतीच्या काळात या बातमीचा मी अधूनमधून विचार करीत होतो. देवाची करणी आणि नारळात पाणी या न्यायावर थांबून मनाची समजूत घालीत होतो. पण त्या बालकाच्या तोंडात विधात्यानं चौसष्ट दातांची रचना कशी केली असेल, याचा काही उलगडा

झाला नव्हता. डोळ्यासमोर चित्र आणायचं ठरवूनहि जमलं नव्हतं. आणि जे काही अस्पष्टसं समोर आलं होतं त्यामुळे तर अंगाला दरदरून घाम सुटला होता.

जगाच्या अंताचा प्रश्न जरी क्षणभर बाजूला ठेवला तरी माझं जीवन संपुष्टात येईपर्यंत मला त्या बातमीच्या रहस्याचा उलगडा झाला नसता. परंतु मागील रविवारी एक घटना घडली. ती पाहून मी थक्क झालो, आणि शेवटी मला पटलं की त्या मासिकात आलेली चौसष्ट दात असलेल्या मुलाची बातमी काही खोटी नाही. त्या मुलाला जन्मतःच चौसष्ट दात आलेले ऐकून प्रत्येकाला आश्चर्य वाटावं, विश्वास बसू नये हे साहजिक आहे. परंतु मुलाप्रमाणे प्रत्येक माणसाला चौसष्ट दात असतात हेहि तितकंच खरं ! ते कसं यासाठी वाद न घालता जी घटना घडली ती जशीच्या तशी सांगतो. मग तुम्हीहि म्हणाल, खरंच माणसाला दात चौसष्ट असतात.

त्याचं असं झालं, माझ्या ओळखीचे एक थोर कथाकार आहेत. त्यांच्या शैलीमुळे महाराष्ट्रानं त्यांना बहुमान दिला आहे. त्यांच्या अनेक कादंबऱ्या लोकांच्या अंतःकरणात घर करून बसल्या आहेत. लाघवी भाषा, विलक्षण शब्दमाधुर्य अन् चटकदार निवेदन-पद्धतीमुळे जसे उगवते लेखक आकर्षित झाले आहेत, तशाच काही स्त्री लेखिकाहि. ह्या थोर कथाकाराच्या प्रेमजाळ्यात एक गर्भश्रीमंतीत वाढलेली लेखिका सापडली. अल्पावधीत त्यांच्या प्रेमाराधनेला गोंडस स्वरूप आलं. त्या लेखिकेला वाटलं आपणच ह्याच्या लेखणीचे, शैलीचे वारसदार. त्या उभयतांची प्रीति ही अल्पावधीत ' उघड गुपित ' स्वरूपाची झाली. परंतु माशी कुठे शिंकली कोण जाणे. त्या लेखिकेचं एका गर्भश्रीमंत पण अति पोक्त माणसाशी लग्न झालं. ह्यानंतर एक-दीड तपाचा काळ वाऱ्यावर गिरक्या घेत जाणाऱ्या पानासारखा उडत गेला.

यानंतर मागील रविवारची गोष्ट. हे थोर कथाकार आपल्या अभ्यासिकेत अमेरिकन मासिक वाचण्यात मग्न होते. त्यांची पत्नी खाली हिंदोळ्यावर बसून आपल्या मुलीकडून नृत्याचे तोडे म्हणवून घेत होती. इतक्यात एक स्त्री तिथं आली आणि तिनं स्वतःची ओळख करून दिली. ते ऐकून

कथाकाराची पत्नी म्हणाली, " आलाच आहात घरी तर मी तुम्हाला ' मिस्टरांचा ' परिचय करून देते. "

त्या स्त्रीला नेमकं हेच हवं होतं.

आपल्या पत्नीबरोबर आलेली स्त्री पाहून ह्या थोर कथाकाराला कमालीचं आश्चर्य वाटलं. एक क्षण मनात गोंधळ उडाला. परंतु दुसऱ्याच क्षणी त्यानं तिचा नमस्कार साळसूदपणे स्वीकारला. मनसोक्त गप्पा मारल्या. तिच्या लेखनाची तारीफ तर केलीच. पण स्वत:ची एक दोन पुस्तकं सप्रेम भेट देऊन आनंद व्यक्त केला. शेवटी तिचा निरोप घेताना स्वारी उद्गारली, आपल्या परिचयानं मला हार्दिक आनंद झाला. पुन्हा कधी इकडे आलात तर जरूर या आमच्याकडे. नुसतं चहाला नव्हे तर जेवायलाहि.

आता सांगा, एक दीड तपापूर्वी जी त्याची प्रियतमा होती, ज्या प्रीतीनं अनेक सुखक्षण भरगच्च लुटले होते, तिला दीर्घ कालावधीनंतर पत्नीबरोबर पाहून तिऱ्हाईताशी बोलत असल्याची बतावणी त्यानं किती सफाईनं अन् बेमालूम केली नाही ?

बाकी या थोर कथाकारालाच दोष देण्यात काय अर्थ आहे ? माणसाचा स्वभावच असा आहे की तो मनात ठरवितो एक अन् बाहेर दाखवितो तें निराळंच ! खायचे दात निराळे, दाखवायचे दात निराळे ! याला तुम्ही कला समजा की कौशल्य. परंतु अगदी लहानापासून तर बत्तीशी गळून तोंडाचं बोळकं झालेल्या वृद्धापर्यंत जो तो ह्या कलेशी वा कौशल्याशी परिचित असतो.

स्टालिन मेला त्यावेळचीच गोष्ट घ्या ना ! तो आसन्नमरण असल्याची बातमी कळताच बड्या बड्या राष्ट्रांच्या पुढाऱ्यानी दुःखोद्गार काढले, चिंता व्यक्त केली. परंतु त्यांच्या अंतर्यामी उसळलेल्या ऊर्मि का दुसऱ्यांना कळल्या नव्हत्या ? एकीकडे जागतिक शांततेच्या घोषणा करावयाच्या, शपथा घ्यायच्या, वाटाघाटी करावयाच्या, संयुक्त पत्रकांवर सह्या करून करार मदार करायचे आणि दुसरीकडे.. ?

..शस्त्रास्त्रांची प्रचंड प्रमाणात निर्मिति करावयाची अण्वस्त्रांचे प्रयोग करून जगाच्या कानाकोपऱ्यात घबराट निर्माण करावयाची, दुसऱ्यांच्या

रहस्यांचा स्फोट करावयाचा अन् स्वतःच्या साधुत्वाचा मात्र डंका वाजवायचा.

मुत्सद्दी काय, सामाजिक हितांचा ढोल बडविणारे समाजसुधारक काय किंवा समाजवादी समाज रचनेचा जयघोष करणारे पुढारी काय सर्वांचे खायचे दात वेगळे अन् दाखवायचे वेगळे !

एकूण माणसाला दात चौसष्ट असतात हेच खरं. याला तुम्ही पासष्टावी कला म्हणा हवी तर. परंतु तिच्या आधारावरच तो आपल्या व्यक्तिमत्वाचं जतन करतो.

आमच्या नानाजींच्या बाबतीत असंच घडलं. गेल्या फेब्रुवारीत ते नोकरीत कायम झाले. इतक्या थोड्या अवधीत ते कायम होतील अशी त्यांच्या सहकाऱ्यांची मुळीच कल्पना नव्हती. परंतु एक दिवस त्यांना नोकरीत कायम केल्याचा हुकूम अचानक मिळाला तशी बाकीचे सहकारी आतल्या आत धुमसले, – ज्वालामुखीसारखे ! नानाजीच्या आधी लागलेला अंतूजी तर सपशेल रडायलाच लागला. नानाजीच्या सहकाऱ्यांनी चेहऱ्यावर नकली हास्य आणून व अभिनंदनाचं नाटक करून पार्टीची मागणी केली. त्या पार्टीचा आस्वाद घेताना हे सहकारी, अंतूजी मागे राहिला म्हणून हळहळत होते. नानाजींच्या भाग्याचा द्वेष मनोमन करीत होते, पण बाहेरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करींत होते. ‘ नोकरीत अशीच बढती मिळो, भरभराट होवो ’ अशी शुभेच्छा व्यक्त करीत होते.

पण त्यांची ही कला नानाजींना समजली नव्हती असं थोडंच म्हणता येईल. ? ‘ चौसष्ट दातांची भाषा ’ त्यांना मुळीच अपरिचित नव्हती.

* *

# प्रवास अन् पुस्तक ▲▲▲



इतरांपेक्षा माझी मोठी गाळण उडते पहा प्रवासाला निघताना ! याचा अर्थ असा नव्हे की प्रवासाची तयारी करताना माझे हातपाय थरथरायला लागतात. किंवा ज्या अपरिचित प्रदेशात जाणार तेथील माहिती नसल्यानं भीति निर्माण होते.

काहींच्या बाबतीत असं होतं खरं. त्यांची छाती धडधडायला लागते. प्रवासात झोप अगदी अनावर येते; तिचं शासन म्हणून त्यांची पादत्राणे कोणीतरी लांबवितात, तर काहींचा खास आवडीच्या पदार्थांनी तयार करून दिलेला डबाच नाहीसा होतो.

माझ्या बाबतीत असं काही घडत नाही, तरीहि गाळण उडते एवढं खरं. गाडी गाठण्यापूर्वी दोन तास अगोदर माझ्या खोलीत भलताच पसारा पडलेला असतो. परिटाकडून धुवून आणलेल्या स्वच्छ कपड्यांची चळत उघड्या पेटीशेजारी एकाद्या आज्ञाधारक नोकराप्रमाणे उभी असते. फराळाचे निरनिराळे पदार्थ आई आतल्या खोलीत तयार करीत असते अन् तिथूनच सुनेला सांगते, "अग, त्याच्या होल्डॉलमध्यें एक गरम ब्लँकेट ठेव हं."

सासूची ही आज्ञा पाळावयाची म्हणून की काय किंवा प्रवासात मला काडीइतका त्रास होऊ नये म्हणून म्हणा, माझी पत्नी एकेक कपडा पेटीत ठेवीत असता अनेक प्रश्नांचा वर्षाव करीत असते.

परंतु तिच्या ह्या सवालांकडे माझं मुळीच लक्ष नसतं. टेबलावरील सेल्फात मी जी पुस्तकं रचलेली असतात, त्यांपैकी कोणती प्रवासात बरोबर घ्यावीत, अशा भोवऱ्यात मी सापडलेला असतो. कोणती पुस्तकं वाचायला

घ्यायची याचा उलगडा मला काही नीटपणे होत नाही; अन् म्हणून गाळण उडते माझी !

अभिप्रायार्थ आलेली पुस्तकं वयात आलेल्या नाजुक पण काहीशा घाबरट मुलींच्या नजरेनं माझ्याकडे पहात असतात. दलालांच्या कुंचल्यातून कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठावर चितारल्या गेलेल्या युवती क्षणभर सजीव होऊन (पेटीत कपडे भरीत असलेल्या पत्नीला ऐकू जाणार नाही, अशा आवाजात) म्हणतात, " मला घेऊन चलायचं हं प्रवासाला; असं काही रंजन करीन आपलं की..."

त्यांचे शब्द पूर्ण होण्यापूर्वीच फुलांफळांनी डवरलेल्या लतावेली कानाजवळ ओठ आणून विनवितात, "फुलांच्या गंधानं अन् फलांच्या रसानं आपल्याला प्रवासात थोडादेखील शीण येऊ देणार नाही."

टीका ग्रंथ, काव्यसंग्रह, लघुनिबंधसंग्रह, कादंबऱ्या आशाळभूत नजरेनं माझ्याकडे पहात असतात. कुणाची निवड करावी अन् कुणाची करू नये, असा विचित्र यक्षप्रश्न माझ्यासमोर निर्माण होतो अन् मग हाती येतील त्यांना भराभर पेटीत ठेवून माझी प्रवासाला सुरुवात होते.

अस्मादिकांची स्वारी गाडीत बसलेली असते. स्टेशनवरील उतारूंची धावपळ, गडबड नजरेला पडत असते. डब्याच्या खिडकीबाहेर पत्नी उभी असलेली आढळते. तिचा रडवा चेहरा नजरेतून काही केल्या सुटत नाही. डोळ्यांच्या कडांवर आलेले अश्रू मोठ्या शिताफीनं मागे रेटीत ती पुनःपुन्हा सांगते, "काळजी घ्यायची हं प्रवासात. खायचे हाल करायचे नाहीत. थंडीवाऱ्यात भटकू नका. अन् पोहोचल्याचं पत्र न विसरता लिहिणार ना ?"

तिच्या भावनांचा कोलाहल मला स्पष्टपणे दिसतो. माझ्याहि मनात त्यामुळे कालवाकालव होतेच. पण तेवढ्यात माझा डावा हात जवळ पडलेल्या तीनचार पुस्तकांना लागतो अन् का कुणास ठाऊक मनाला एक आगळा विरंगुळा मिळतो, समाधान लाभतं. आपण काही एकटेच प्रवासास निघालेलो नाहीत, हा काव्यसंग्रह, ही कादंबरी, हा गाजलेला टीकाग्रंथ आहेच की सोबत.

अखेरीस गाडी स्टेशन सोडते. निरोप द्यायला आलेल्या पत्नीच्या डोळ्यातील विरह दृष्टीआड होतो. हवेत फडफडणारा तिचा रुमालहि

काही क्षणानंतर दिसेनासा होतो. मग माझी नजर डब्यातील उतारूंकडे वळते. अन् हे घडत असतानाच एखादं पुस्तक हाती घेतलं जातं.

परंतु हाती घेतलेलं पुस्तक मी लगेच वाचायला सुरुवात करतो असं म्हणाल, तर तेहि नाही ! त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाकडे, लेखकाच्या नावाकडे, आणि प्रस्तावना लेखकाच्या सहीकडे माझी नजर जाते. दुसरी जी पुस्तकं जवळ पडलेली असतात, त्यांनाहि असंच हाताळतो. आपल्याला ही पुस्तकं वाचायची आहेत याचा एक अवीट आनंद मनाभोवती पिंगा घालत असतो.

सुखाचा आस्वाद कसा घ्यावा याचा नियम समाजाच्या ठरीव आणि रेखीव चालीरितींसारखा नाही हे फार बरं; नाही तर केवढा गोंधळ उडाला असता, नाही ?

कारण सुखास्वादाच्या कल्पना ह्या व्यक्तीच्या मनाच्या ठेवणीवर अवलंबून असतात. एखाद्या भोजनप्रसंगी बासुंदीचा बेत असावा आणि वाटचावर वाटच्या फस्त कराव्यात अशा तऱ्हेनं काही माणसं सुखास्वाद घेतात. मला वाटतं तो आनंद खरा नाही. उलट बटाटयाच्या सुक्या भाजीची एक फोड तोंडांत घ्यावी, तिच्यानं तोंड भाजलं की केळाची कोशिंबीर खावी, तिनंहि तोंडाची आग न थांबल्यास बासुंदीवर तरंगणाऱ्या पाचसात चारोळ्या खाव्यात आणि शेवटी बासुंदीचे एकदोन घोट घ्यावेत. अशा पद्धतीनं घेतलेला आस्वाद अगदी मजेशीर असतो नाही ?

पदार्थांच्या रसास्वादाप्रमाणेच पुस्तकांच्या वाचनसुखाचा आनंद असतो. जे वाचक गर्वानं किंवा फुशारकीनं सांगतात, "अहो, ते पुस्तक ना, मी अगदी दोन तासात वाचून पूर्ण केलं. एका बैठकीत पुस्तक वाचणं हा माझ्या हातचा मळ आहे."

अशांना वाचक म्हणणं जिवावर येतं.

निदान मी तरी अशा रीतीनं वाचन करीत नाही. ना घरी, ना प्रवासात! प्रवासात घेतलेली पुस्तकं माझ्या पुढ्यात असतात, गाडी धावत असते, झाडं मागे जात असतात, टिपूर चांदणं असलं की मला हटकून काव्यसंग्रह वाचावासा वाटतो. तो मी चाळू लागतो. प्रस्तावना-लेखकानं ज्या काव्यपंक्ति उधृत केलेल्या असतात, त्या वाचून माझं

प्रस्तावना-वाचन थांबतं अन् उधृत केलेली कविता चाळू लागतो. पाठोपाठ पुढल्याहि पाच-सात कविता वाचल्या जातात नि मग पुन्हा मी प्रस्तावनेकडे वळतो.

गाण्याची मैफल चालू असता गवयानं ख्याल गावा, आपल्या वजनदार स्वरांनी रंग भरून प्रेक्षकांना तल्लीन करावं आणि तो संपताच चहाची तल्लफ भागविण्यासाठी बाहेर आलेल्या श्रोत्यांनी त्या रागाच्या सुराच्या सौंदर्याचं मनसोक्त कौतुक करावं, तस्संच माझं होतं.

प्रवासात घेतलेला काव्यसंग्रह वाचून पूर्ण होण्यापूर्वीच, कादंबरीच्या वाचनाला सुरुवात झालेली असते. त्यातील पात्रांची जानपहचान दृढ व्हायला सुरुवात होते, तेवढ्यात एकादं निसर्गवर्णन किंवा 'हलका' संवाद मनात घर करून जातो. ती पात्रं तर मला सोबत करतातच, पण लेखकाच्या यशाचा मंत्र आणि तंत्र मला गवसलेला असतो. मी त्याच मननात मग्न होतो.

प्रवासात घेतलेली सारी पुस्तकं एकदम वाचण्याचा आनंद काही वेगळाच असतो, अपूर्व असतो. काव्यसंग्रहातील चार दोन कविता, कादंबरीतील एखादी स्वभावरेखा, नितांतसुंदर निसर्गवर्णन आणि टीकाग्रंथातील सिद्धांत हे सर्व मनात हिंदकळत असतात.

ह्या समाधीत मुक्कामाचं ठिकाण केव्हा येतं ते कधी कधी कळत नाही. ज्यांच्याकडे मुक्काम असतो त्या व्यक्ति मला हवापाण्याचा प्रश्न प्रथम विचारतात अन् मग पुसतात, " ही बरोबर आणलेली पुस्तकं कशी काय आहेत ?"

त्यांचा हा प्रश्न मी अपेक्षिलेला असतो. तो कानी पडताच मला एकदम आनंद, समाधान आणि अभिमान वाटू लागतो.

भव्य अशा सभागृहात दोन-चार हजार श्रोते वक्त्याचं भाषण तन्मयतेनं ऐकायला उत्सुक आहेत, अशा पद्धतीनं मी त्या पुस्तकांसंबंधी बोलत असतो. कवीच्या काव्यशैलीची प्रशंसा करीत असता, समीक्षणात्मक विचार हलकेच त्यांना ऐकवतो. कादंबरीच्या तंत्रमंत्राची स्तुति करतो.

वास्तविक ही पुस्तकं आपण पूर्ण वाचलेली नाहीत, याची जाणीव असतेच. तरीहि 'प्रभाव पाडण्याची कला' विसाव्या शतकात रानवेली-प्रमाणे भरारा फोफावू लागली आहे ना ?

आजचं जग ह्या कलेवर धावत आहे, जगत आहे, हे नाकबूल करता येणार नाही. एका टीकाकारानं दुसऱ्याच्या मताचं खंडन हिरीरीनं करावं, एका पक्षानं दुसऱ्या पक्षाच्या कार्यपद्धतीपेक्षा आपली कार्यपद्धति अधिक प्रभावी आहे हे घसा फोडून सांगावं त्याचप्रमाणे अजिबात न वाचलेल्या किंवा वरवर हाताळलेल्या पुस्तकांची भरमसाट स्तुति किंवा निंदा करावी आणि आपल्या वाचनकलेचा प्रभाव दाखवावा असंहि पदोपदी आढळून येतं.

या कलेशी समरस होऊन प्रवासात घेतलेल्या पुस्तकांविषयी मी बोलतोच असं नाही. पण अर्धवट वाचनात मला आगळं समाधान वाटतं खरं. कारण ती वाचायची आहेत, हा विचार जसा मनात घोळत असतो, त्याचप्रमाणे त्यातील काही भाग वाचल्यानं ती फार वाचनीय पुस्तकं आहेत, असं मला सतत वाटत असतं. अपूर्णत्वाची ओढ आणि अल्पशा वाचनातील आस्वादाचा ध्यास सदाफुलीप्रमाणे सदैव उमललेला असतो.

प्रवासाहून परतल्यावर ही पुस्तकं टेबलावरील सेल्फमध्ये पुनश्च आपापली जागा घेतात. मग मोठ्या आपुलकीनं त्यांच्याकडे पाहत मी म्हणतो, "या प्रवासात ही पुस्तकं वाचता आली नाहीत म्हणून काय झालं ? पुढल्या प्रवासात मात्र वाचून हातावेगळी करायची एवढं नक्की !"

REFBK-0014395
दा. क्र. ९८३९५
अनुक्रम ७०९३५ दि. १९८५
१६०५ नों. दि. २१।१५।८५

● ऐतिहासिक कादंबऱ्या :

| | रु. | पैसे |
|---|---|---|
| रावबाजी - वालचंद शहा | ६ | ०० |
| रत्नगड - सहृदय - २ री आ. | ८ | ०० |
| गोकर्ण दुर्ग - अज्ञात २ री आ. | ८ | ०० |
| सम्राट अशोक - वालचंद शहा - ४ थी आ. | ८ | ०० |
| विजयनगर - दातार - २ री आ. | ८ | ०० |
| पाटणचा संग्राम - कै. मो. गु. व्होरा २ आ. (कन्हयालाल मुन्शी) | ८ | ०० |
| पावागड - सौभद्र - २ री आ. | ८ | ०० |
| मुक्तिदूत - प्रा. सोनटक्के | ८ | ०० |
| रक्ताचे गालबोट - परांजपे ३ री आ. | ८ | ०० |
| चंद्रराव - नरवणे - २ री आ. | ३ | ०० |
| शनवारवाडा - वालचंद शहा - २ री आ. | ६ | ०० |
| पहिला सम्राट - सौ. वासंती शहा | २ | ०० |
| गुजराथचा नाथ - कन्हयालाल मुन्शी | ८ | ०० |

★

# सुरस ग्रंथमाला, सोलापूर

★